उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक




# गांवकरी

स्वातंत्र्यवीर
वि. दा.
सावरकर
यांना विनम्र
अभिवादन!



■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : १६० ■ नाशिक, बुधवार, दि. २६ फेब्रुवारी २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

## महत्त्वाचे

### तरुणाचा मंत्रालयात आत्महत्येचा प्रयत्न

**मुंबई :** पुन्हा एकदा एका तरुणानं मंत्रालयात आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. त्याने मंत्रालयाच्या चौथ्या मजल्यावरून उडी मारली आहे. सुदैवानं तो मंत्रालयात लावण्यात आलेल्या सुरक्षा जाळीत अडकल्यानं मोठा अनर्थ टळला आहे. अंदाजे ४० ते ४५ वर्षांच्या आसपास या तरुणाचं वय आहे. या घटनेनं एकच धावपळ उडाली. तिथे उपस्थित असलेले पोलीस या तरुणाला जाळीतून बाहेर काढण्यासाठी धावले.

### पुणे रेल्वे स्थानकावर सुरक्षा यंत्रणेत वाढ

**पुणे :** पुणे रेल्वे स्थानकावर कडेकोट सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. प्रवासी पिशव्यांची तपासणी करण्यासाठी अत्याधुनिक तपासणी यंत्र (स्कॅनर मशीन) आणण्यात आले असून, रेल्वे पोलिसांकडून संशयास्पद हालचालींवर करडी नजर ठेवली जात आहे. रेल्वे स्थानकावर दिवसभरात २०० पेक्षा अधिक गाड्यांची वर्दळ असते. रेल्वे प्रवास करताना ज्वलनशील वस्तू, स्फोटक साहित्य किंवा शस्त्रांची वाहतूक करण्यास मनाई आहे.

### महिलेवर अत्याचार; उद्योगपतीविरोधात गुन्हा दाखल

**ठाणे :** अभिनेत्री होण्याचे स्वप्न दाखवून ठाण्यातील एका महिलेवर वारंवार लैंगिक अत्याचार करण्यात आले. यानंतर सदर पीडित महिलेने पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली नाही. अखेर मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतर न्यायालयाने सदर प्रकरणी एफआयआर दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार कापूरबावडी पोलीस ठाण्यात उद्योगपती श्याम भारतिया आणि इतर तीन लोकांविरोधात बलात्कार, धमकावणे आणि जातीय शिवीगाळ करणे, असे विविध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### बेस्ट कंत्राटी कर्मचारी आंदोलनाला गालबोट

**मुंबई :** बेस्ट उपक्रमातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेळेत आणि कामानुसार पगार मिळत नसल्याने; तसेच बेस्ट उपक्रमातील कर्मचाऱ्यांप्रमाणे सुविधा देण्यात येत नसल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांनी मंगळवारी आंदोलन पुकारले. या आंदोलनामुळे मुंबईतील लाखो प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. सकाळपासून नोकरदार, विद्यार्थी, छोट्या व्यापाऱ्यांना इच्छितस्थळी पोहचण्यास प्रचंड दमछाक झाली. मुलुंड, वडाळा आणि अन्य काही आगारांमधील बेस्टच्या भाडेतत्त्वावरील बसगाड्यांची तोडफोड करण्यात आल्याने आंदोलनाला गालबोट लागले.

### गुजरात इन्फोटेक कंपनी चालवणार ई-सेवा केंद्र

**सावंतवाडी :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आठ तालुक्यांसह सिंधुदुर्गनगरीमधील ई सेवा (सेतू सुविधा) केंद्र गुजरात कंपनी चालविणार आहे. तसा जिल्हा सेतू समिती अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अनिल पाटील यांनी कार्यारंभ आदेश काढला आहे. सिंधुदुर्ग जिल्हा सिंधुदुर्ग नगरी व प्रत्येक तालुक्यात तहसील कार्यालयात ई सेवा केंद्र सुरू आहेत. अशा एकूण ९ सेतू सुविधा केंद्रे गुजराती कंपनीकडे सुपूर्द करण्यात आली आहेत.

### पाक जिंदाबादच्या घोषणा; मालवणात थेट बुलडोझरच चालवला

**सिंधुदुर्ग :** टीम इंडियाने चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत पाकिस्तानला धूळ चारली. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण येथे काही जणांनी पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा दिल्या. शिवसेना आमदार नीलेश राणे यांनी त्या व्यक्ती विरोधात कारवाई करण्याची मागणी केली. प्रकरण वाढल्यानंतर मालवण नगर परिषद प्रशासनाने आरोपी व्यावसायिकाच्या भंगाराच्या दुकानावर बुलडोझर चालवला.

# महाराष्ट्र विधिमंडळ समित्यांची घोषणा

## भाजपच्या नेतृत्वाखाली नव्या सदस्यांची नियुक्ती

**मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये महाराष्ट्र विधिमंडळाच्या सन २०२४-२०२५ या कार्यकाळासाठी विविध समित्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांसह भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि भाजप विधिमंडळ मुख्य प्रतोद रणधीर सावरकर यांच्या संमतीने या समित्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपच्या नेतृत्वाखाली नव्या सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**



सार्वजनिक उपक्रम समितीच्या अध्यक्षपदी पुणे जिल्ह्यातील दौंड मतदारसंघातील भाजपचे नेते राहुल कुल यांची वर्णी लागली आहे. तर पंचायत राज समितीच्या अध्यक्षपदी रावसाहेब दानवे यांचे पुत्र संतोष दानवे-पाटील यांची वर्णी लागली आहे. आश्वासन समितीच्या अध्यक्षपदावर रवी राणा यांची तर अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अध्यक्षपदी नारायण कुचे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अनुसूचित जमाती कल्याण समितीवर राजेश पाडवी, तर महिला हक्क व कल्याण समितीवर मोनिका राजळे या अध्यक्ष राहणार आहेत. इतर मागासवर्गीय कल्याण समितीवर किसन कथोरे, मराठी भाषा समिती पदावर अतुल भातखळकर, विशेष हक्क समितीवर राम कदम, धर्मादाय खासगी रुग्णालय तपास समितीवर श्रीमती नमिता मुंदडा आणि आमदार निवासव्यवस्था समितीच्या अध्यक्षपदावर सचिन कल्याण शेट्टी हे अध्यक्ष म्हणून कारभार पाहणार आहे.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या समित्यांवर भाजपच्या ११ नव्या सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विधानसभा अध्यक्षांनी विविध समित्यांच्या संदर्भात नव्या नियुक्त्या सर्वपक्षीयांकडून होत नसल्याने नाराजी व्यक्त केली होती. तर मंत्रिपद हुकलेल्या भाजप आमदारांचे समितीच्या मार्फत राजकीय /-...४

### महापालिका निवडणुका ४ मार्चला सुनावणी

**नवी दिल्ली :** महापालिका निवडणुकीच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेवर आता ४ मार्च रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे राज्यातील महापालिकेच्या रखडलेल्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. त्यामुळे इच्छुकांचा हिरमोड झाला आहे. महापालिका निवडणुका रखडल्याने राज्यातील मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवडसह तब्बल २३ महापालिकांवर प्रशासकीय राजवट आहे. प्रभागरचना, लोकसंख्येत १० टक्के वाढ धरून निश्चित केलेली सदस्य संख्या आणि ओबीसी आरक्षण यावरून तब्बल ५७ वेगवेगळ्या याचिका सुप्रीम कोर्टात दाखल आहेत. त्यावर एकत्रित सुनावणी २२ जानेवारी रोजी होणार होती. मात्र, बुधवारी होणाऱ्या सुनावण्यांच्या यादीत या याचिकांचा समावेश नव्हता. त्यानंतर २८ जानेवारी रोजी सुनावणी /-...४

## महागाई भत्त्यात तीन टक्के वाढ

# राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची होळी आधीच दिवाळी

**मुंबई :**

राज्यातील १७ लाख सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात तीन टक्के वाढ करण्यास मंजुरी देण्यात आल्याने होळी आधीच कर्मचाऱ्यांची दिवाळी होणार आहे. विशेष म्हणजे, महागाईचा फरक जुलैपासून देण्यात येणार असून, तो फेब्रुवारीच्या पगारासोबत दिला जाणार आहे. महागाई भत्ता आता ५३ टक्क्यांवर पोहोचला आहे. सरकारच्या निर्णयाचा १७ लाख सरकारी कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे.




राज्यातील १७ लाख सरकारी कर्मचारी-शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांकडे गेले तीन महिने राज्यातील महायुतीचे सरकार दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या मध्यवर्ती संघटनेने करीत आंदोलनाचा इशारा दिला होता. नवीन सरकार येऊन ८ महिने झाले तरी महागाई भत्तावाढीचा निर्णय अद्याप सरकारने घेतला नाही. लाडक्या बहिणी, शेतकरी यांच्याबाबत जी आर्थिक धोरणे वेगाने राबविली आहेत. त्याच गतीने राज्य हाताळणाऱ्या सरकारी कर्मचारी-शिक्षकांची देखील आर्थिक निकड पूर्ण करण्याची मागणी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी केली होती. महागाईला तोंड देण्यासाठी भत्ता वाढविण्याची मागणी राज्य सरकारी कर्मचारी संघटनेने केली होती. या वाढीव महागाई भत्त्याचा प्रश्न सुटल्यामुळे सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सध्याच्या घरभाडे भत्त्यात देखील सप्रमाण वाढ मिळाली आहे. ही वाढ न मिळाल्याने राज्यभर कर्मचारी-शिक्षकांमध्ये प्रक्षोभ निर्माण झाला होता. /-...४

# शीखविरोधी दंगलप्रकरणात सज्जन कुमार यांना जन्मठेप

**नवी दिल्ली :**

१९८४ मध्ये शीखविरोधी दंगली दिल्लीत उसळल्या त्या प्रकरणी काँग्रेसचे माजी खासदार सज्जन कुमार यांना नवी दिल्लीच्या राउज ॲव्हेन्यू न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. सज्जन कुमार यांना १ नोव्हेंबर १९८४ या दिवशी सरस्वती विहार या ठिकाणी झालेल्या वडील व मुलाच्या हत्येप्रकरणी न्यायालयाने दोषी ठरवले होते. १२ फेब्रुवारीला हा निर्णय न्यायालयाने दिला होता. त्यानंतर काल त्यांना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात सीबीआय आणि तक्रारदारांनी सज्जन कुमार यांना फाशी देण्याची



मागणी केली होती. मात्र, रोज ॲव्हेन्यू न्यायालयाने सज्जन कुमार यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

पंजाबमध्ये झालेल्या ऑपरेशन 'ब्लू स्टार'नंतर ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्याच अंगरक्षकांनी गोळ्या झाडून हत्या केली. त्यानंतर १ नोव्हेंबरच्या दिवशी /-...४

# जयंत पाटील-बावनकुळेंची भेट

## भाजपात जाण्याची जोरदार चर्चा, पाटलांकडून इन्कार

**मुंबई :**

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यात काल मध्यरात्री भेट झाली. या भेटीनंतर जयंत पाटील हे भाजपाच्या वाटेवर असल्याची चर्चा पसरली होती. मात्र, जयंत पाटील यांनी याचा इन्कार केला असून, महसूलशी संबंधित कामांसाठी ही भेट घेतल्याचा दावा त्यांनी केला आहे.

याबाबत जयंत पाटील यांनी सांगितले की, सोमवारी संध्याकाळी बावनकुळे आणि माझी त्यांच्या निवासस्थानी भेट झाली. सांगली जिल्ह्यातील काही



महसूल प्रश्नांवर मी त्यांना १० ते १२ निवेदने दिली. ती निवदेनं देण्यासाठीच मी भेट मागितली होती. महसूल विभागात काही गोष्टी ऑनलाइन केल्या आहेत. त्याचा त्रास शेतकऱ्यांना होतो आहे. त्याकडे त्यांचं लक्ष वेधले. आमच्या जिल्ह्यातले बरेच प्रश्न होते. मला ६ वाजण्याची वेळ दिली गेली होती. आमच्यात २५ मिनिटं चर्चा झाली. राधाकृष्ण विखे पाटीलही होते. आमची कुठलीही राजकीय चर्चा झालेली नाही. मी इतर चर्चा कुठलीही केलेली नाही. सुमारे १३ ते १४ निवेदनं दिली आहेत. /-...४

# कृषिमंत्री कोकाटे यांच्या शिक्षेवरील निकाल राखीव

## सुनावणी पूर्ण; १ मार्चला सुनावणी

**नाशिक : प्रतिनिधी**

सदनिकाप्रकरणी दोन वर्षांची शिक्षा सुनावलेल्या माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेच्या स्थगितीबाबत कालही कोर्टात काहीच निर्णय झाला नाही. त्यामुळे त्यांच्यावरील निलंबनाच्या कारवाईची टांगती तलवार कायम आहे. काल झालेल्या सुनावणीत सरकारी वकिलांनी स्थगितीच्या मुद्यावर विरोध दर्शविला. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेत आता १ मार्चला सुनावणी ठेवली आहे. शिक्षेच्या स्थगितीवर सुनावणी घेण्यात आली. जिल्हा न्यायाधीश



नितीन जीवने यांच्यासमोर सरकार पक्षातर्फे ॲड. कोतवाल तर कोकाटे यांच्यातर्फे ॲड. अविनाश भिडे यांनी युक्तिवाद केला.जिल्हा न्यायालयाने मंत्री कोकाटे यांच्यासह त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांना कागदपत्रांची फेरफार अन् फसवणूक /-...४

# अरविंद केजरीवाल सरकारच्या मद्यधोरणात २००२ कोटी बुडाले

## कॅगचे ताशेरे; मुख्यमंत्री गुप्ता यांनी मांडला अहवाल

**दिल्ली :**

विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या बहुमतानंतर दिल्लीत नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर सोमवारपासून विशेष अधिवेशन सुरू झाले. अधिवेशनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या दिवशी मोठा गदारोळ पाहायला मिळाला. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्या कार्यालयामधून शहीद भगतसिंग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो हटवल्याचा दावा विरोधी पक्षनेत्या अतिशी यांनी केला. यावरून चांगलंच



राजकारण तापलं. यातच काल दिल्ली सरकारने कॅगचा अहवाल विधानसभेत सादर केला आहे.

या अहवालात 'आप' सरकारच्या कारभाराच्या संदर्भात मोठा खुलासा करण्यात आला आहे. यामध्ये शीशमहल, मोहल्ला क्लिनिक, मद्य धोरणासह आदी महत्त्वाच्या गोष्टी मांडण्यात आल्या आहेत. दिल्लीत आम आदमी पक्षाचं सरकार सत्तेत असताना मद्य धोरणाच्या अंमलबजावणीमुळे तब्बल २००२ कोटींचा महसूल बुडाल्याचा दावा या /-...४

### छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत पुरस्कार जाहीर

**मुंबई :** कवी मनाचे महान योद्धे छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने यावर्षीपासून दिला जाणारा पहिला राज्य प्रेरणा गीत पुरस्कार स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या अनादी मी अनंत मी.. या गीताला देण्यात येत असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी फ्रान्सच्या मार्सेलिस समुद्र किनाऱ्यावरून काल केली. ज्या पद्धतीने महाराष्ट्रभूषण आणि अन्य सन्मानाचे पुरस्कार महाराष्ट्र शासनातर्फे देण्यात येतात, त्याच पद्धतीने दरवर्षी एका प्रेरणा गीताला महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे छत्रपती संभाजी /-...४

# शिंदे सरकारमधील मंत्र्यांच्या ओएसडीने ५ लाख मागितले : अमोल मिटकरी

**अकोला :**

राज्यातील मंत्र्यांच्या ओएसडींची नावे निश्चित करण्यावरून सध्या मंत्रालय व राजकीय वर्तुळात घमासान सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी देखील मंत्र्यांच्या ओएसडींकडून पैशांची मागणी होत असून, मलाही त्याचा अनुभव आल्याचे म्हटले. यावेळी शिवसेना मंत्र्यांच्या ओएसडींकडून मला ५ लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती, असा धक्कादायक दावा केला आहे.

मंत्र्यांचे ओएसडी आणि स्वीय सहाय्यकांच्या संदर्भात



राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी गौप्यस्फोट केला आहे. आपल्यालाही एका मंत्र्यांच्या ओएसडींकडून ५ कोटींच्या एका कामासाठी ५ लाख रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप अमोल मिटकरी यांनी केला आहे. तत्कालीन रोजगार हमी योजना /-...४

**स्वीय सहायकांवर सीएमओंची नजर**

मंत्र्याकडे सध्या जे पीए, पीएस, ओएसडी नेमले गेले आहेत ते पुढील पाच वर्षे राहतीलच असे नाही. त्यांच्याविषयी तक्रारी आल्या आणि त्यात तथ्य आढळले तर त्यांना मध्येच घरी बसावे लागणार आहे. याशिवाय 'उसनवारी' (लोन) तत्त्वावर आपापल्या मंत्री कार्यालयात अनेकांची भरती केलेल्या मंत्र्यांना चाप बसविला जाण्याची शक्यता आहे.

# महिलांची एसटी सवलत कायम राहणार

## ना. प्रताप सरनाईक यांनी केले स्पष्ट

**मुंबई :**

महायुती सरकारमधील परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काही दिवसांपूर्वी एका कार्यक्रमात बोलताना राज्यातील महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना एसटीच्या बस प्रवासात दिलेल्या सवलतींमुळे एसटी तोट्यात असल्याचे विधान केले होते. त्यांच्या या विधानामुळे महिलांना दिली जाणारी ५० टक्के सवलत बंद होणार का? याबाबत चर्चा रंगल्या होत्या. या चर्चांसंदर्भात काल परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्टीकरण दिले.

महिलांना एसटी प्रवासात तसेच ज्येष्ठ नागरिकांना मिळणारी सवलतदेखील बंद होणार नसल्याचे ते म्हणाले.

महामंडळाच्याबाबतीत आणि राज्याच्या हिताच्या अनुषंगाने मुख्यमंत्री म्हणून कार्यरत असताना शिंदे यांनी जे काही निर्णय घेतलेले आहेत, त्या निर्णयात कोणताही बदल करण्यात येणार नाही. तसेच ज्या योजना शिंदे यांनी सुरू केलेल्या आहेत त्यातही बदल होणार नाही. एसटीच्या प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत देण्याचा तसेच ७५ वर्षांच्या पुढील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाचा निर्णय झाला होता. आता या निर्णयात कुठेही बदल होणार नाही, अशी माहिती मंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



**'अनेकजण आमच्या पक्षात'**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेक नेते आमच्या पक्षात येत आहेत. तसेच अजून देखील काही कार्यकर्ते, माजी आमदार, माजी खासदार, विद्यमान आमदार, विद्यमान खासदार जर आमच्या पक्षात येणार असतील तर आम्ही त्यांचं स्वागतच करू. तसेच एकनाथ शिंदे यांची शिवसेना हीच खरी शिवसेना आहे. हे विधानसभेच्या निवडणुकीत जनतेने दाखवून दिलेलं आहे, असंही मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले.

### अंजली दमानियांचा सरकारवर निशाणा

**मुंबई :** बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात असणाऱ्या मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची क्रूर हत्या होऊन तीन महिने उलटून गेले तरी अद्याप आरोपी पोलिसांच्या ताब्यात आला नसल्याने बीड हत्या प्रकरणावरून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पुन्हा एकदा सरकारवर निशाणा साधला आहे. कृपा करून मस्साजोग ग्रामस्थांना न्याय द्या, असं म्हणत अंजली दमानिया यांनी सरकारकडे ही मागणी केली आहे. मस्साजोग ग्रामस्थांचं अन्नत्याग आंदोलन पाहून दुःख होत असल्याचेही अंजली दमानिया यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात अंजली दमानिया यांनी एक ट्वीट केले असून, त्यात सामान्य /-...४

# मस्साजोगमध्ये ग्रामस्थांचे अन्नत्याग आंदोलन

**बीड :**

जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली आहे. या घटनेनंतर राज्यात वातावरण चांगलेच तापले आहे. या घटनेला आता दोन महिन्यांहून अधिक काळ झाला आहे, मात्र तरीदेखील आरोपींना अद्याप शिक्षा झालेली नाही, तसेच या प्रकरणातील एक आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आता मस्साजोगच्या ग्रामस्थांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. दरम्यान, मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे देखील मस्साजोगच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी बोलताना त्यांनी



पुन्हा एकदा सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

उपोषणकर्त्यांच्या जीवाला धोका झाला तर गाठ मराठ्यांसोबत आहे. इथे जर आसपास काही झाले तर ती जबाबदारी गावकऱ्यांची नाही. तुम्ही १४४ लावा नाहीतर १४५ लावा, तुमच्या हातात सत्ता आल्यावर तुम्ही लोकशाही मारून टाकली का? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी /-...४

## महत्त्वाचे

### महिलांसाठी मोफत प्लंबिंग मेंटेनन्स प्रशिक्षण

**नाशिक : प्रतिनिधी**
गळक्या नळाचे वॉशर कसे बदलावे, त्यामधील गळती मागे अजून कोणती कारणे आहेत, घरामधील प्लंबिंग व सांडपाण्याचे नियोजन कसे असते, प्लंबिंगच्या विविध साहित्याची ओळख अशा व अनेक उपयुक्त माहिती महिलांना देण्यासाठी इंडियन प्लंबिंग असोसिएशनच्या नाशिक चॅप्टरच्या वतीने महिलांसाठी मोफत प्लंबिंग मेंटेनन्स प्रशिक्षणाचे १ मार्च, शनिवार रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ५ दरम्यान संदीप तंत्रनिकेतन, त्र्यंबक रोड येथे आयोजन केले असल्याची माहिती अध्यक्ष विक्रम खैरनार यांनी दिली. या प्रशिक्षणात प्रशिक्षक घनश्याम बडगुजर हे महिलांना प्रशिक्षण देतील. सदर प्रशिक्षण हे पूर्णपणे मोफत असून, नावनोंदणीसाठी ९३५९९६७००५ यावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

### एन्झोकेम विद्यालयात शिवजयंती उत्साहात



**येवला : प्रतिनिधी**
येथील सेनापती तात्या टोपे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन्झोकेम विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक बापू कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य दत्तकुमार उटवाळे, उपप्राचार्य कैलास धनवटे, पर्यवेक्षक अनिल शेलार व अध्यक्षांच्या हस्ते छत्रपतींच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी विद्यार्थ्यांपैकी मोहिनी पानसरे, वैष्णवी मोरे, प्रा. डॉ. सुहासिनी शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ज्येष्ठ शिक्षक बापू कुलकर्णी यांनी शिवरायांचे गुण अंगी बाणावेत असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेरणा जोशी व कु. कल्याणी पुंड यांनी केले तर आभार सारिका चौधरी यांनी मानले. कार्यक्रमाला प्राचार्य दत्तकुमार उटवाळे, उपप्राचार्य कैलास धनवटे, पर्यवेक्षक अनिल शेलार, उच्च माध्यमिक विभाग प्रमुख कैलास पाटील व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### जायदरे प्राथमिक शाळेत शिवजयंती साजरी



**येवला : प्रतिनिधी**
तालुक्यातील जायदरे येथील प्राथमिक शाळेत राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी. सदर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना युवा नेते दत्तू देवरे उपस्थित होते. शाळेच्या प्रांगणात सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. या वेळी शिवसेना युवा नेते दत्तू देवरे, सोसायटी चेअरमन माधव शेजवळ, ग्रा.पं. सदस्य दत्तू शेजवळ, शिवाजी जाधव, रामदास शेजवळ, लक्ष्मण शेजवळ, बंडू ढोकणे, रोहिदास पवार, दौलत शेजवळ आदींसह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

### थोरात विद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकरांना विनम्र अभिवादन

**दिंडोरी : प्रतिनिधी**
मविप्र संचलित कर्म. रावसाहेब थोरात विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मोहाडी येथे स्वातंत्र्यवीर सावरकरांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामनाथ गडाख होते. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. इयत्ता सहावी ब चे विद्यार्थी अनुष्का जाधव व गौरी जाधव यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष रामनाथ गडाख यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुंदर असे नियोजन इयत्ता सहावी ब च्या वर्गाने वर्गशिक्षिका प्रतिभा पाटील यांच्या मार्गदर्शनाने केले. या कार्यक्रमासाठी फलकलेखन कलाशिक्षक कृष्णा जाधव व धनंजय जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुतेशा देशमुख हिने केले तर आभार विदुला देशमुख हिने मानले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

### स्वा. सावरकर पुण्यतिथीनिमित्त प्रा. उज्ज्वल शेलार यांचे व्याख्यान

**लासलगाव : वार्ताहर**
स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर पुण्यतिथीनिमित्त लासलगाव येथील स्वा. सावरकर व्याख्यान समितीच्या वतीने स्वा. सावरकर या विषयावर दरवर्षी व्याख्यान आयोजित केले जाते. गेल्या दहा वर्षांपासून सदर उपक्रम आयोजन समितीच्या वतीने सुरू आहे. याही वर्षी गुरुवार दि.२७ फेब्रुवारी रोजी प्रा. उज्ज्वल शेलार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले असून, त्यांच्या उपस्थितीत स्वा. सावरकरप्रेमी नागरिकांच्या हस्ते वीर सावरकरांच्या प्रतिमेचे पूजन होणार आहे. लासलगाव येथील संत श्री नामदेव महाराज मंदिरात गुरुवारी रात्री ८ वा. स्वा. सावरकरांच्या प्रतिमापूजनासाठी आणि प्रा. उज्ज्वल शेलार यांचे व्याख्यान ऐकण्यासाठी या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन स्वा. सावरकर व्याख्यान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# औरंगजेबाचे थडगे तत्काळ हद्दपार करा

## करण गायकर : 'छावा'चा आंदोलनाचा इशारा

**नाशिक : प्रतिनिधी**
**छत्रपती संभाजी महाराजांनी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी बलिदान दिले. त्यांच्यावर अमानुष अत्याचार करणाऱ्या औरंगजेबाच्या थडग्याला त्यांच्या भूमीत स्थान का आहे? असा थेट सवाल छावा क्रांतिवीर सेनेने उपस्थित केला आहे.**

छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी, हिंदू धर्माच्या अस्मितेसाठी रक्त सांडले. औरंगजेबाने त्यांना पकडून क्रूर छळ केला. डोळ्यांत गरम लोखंड ओतले. जीभ छाटली, कातडी सोलली, पण तरीही त्यांनी हर हर महादेवचा जयघोष सोडला नाही. आज त्यांच्या भूमीतच त्यांच्या शत्रूचे थडगे असणे म्हणजे महाराष्ट्राच्या अस्मितेचा घोर अपमान आहे, असे छावा क्रांतिवीर सेनेने म्हटले आहे. औरंगजेबाचे थडगे तातडीने हटवा अन्यथा छावा हटविल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा छावा क्रांतिवीर संघटनेचे संस्थापक करण गायकर यांनी दिला आहे.

छत्रपती शिवरायांचे हिंदवी स्वराज्य नष्ट करण्यासाठी औरंगजेबाने आयुष्यभर प्रयत्न केले. त्याने काशीविश्वनाथ, मथुरा केशवदेव यांसारखी हजारो हिंदू मंदिरे उद्ध्वस्त केली. हिंदूंवर जबरदस्ती जिझिया कर लादला. तलवारीच्या टोकावर धर्मांतर घडवले. असा अत्याचारी शत्रू ज्या भूमीवर छत्रपती संभाजी महाराजांनी वीरमरण स्वीकारले, त्या भूमीत त्याच्या थडग्याचे अस्तित्व का? असा सवालही छावा क्रांतिवीर सेनेने उपस्थित केला आहे.



> औरंगजेबाच्या थडग्याबाबत सरकारने त्वरित निर्णय घ्यावा, अन्यथा संपूर्ण शिवभक्त समाज रस्त्यावर उतरेल. हिंदू धर्मविरोधी क्रूरकर्म्याच्या कबरीला महाराष्ट्रात स्थान असू शकत नाही! जर सरकारने निर्णय घेतला नाही तर शिवभक्त स्वतः कारवाई करतील. ही हिंदवी स्वराज्याची भूमी आहे, येथे छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्यच वंदनीय असेल, त्यांच्या शत्रूचे नाही! संभाजी महाराजांची नगरी औरंगजेबाला सहन करणार नाही.
>
> – **करण गायकर**, संस्थापक, छावा

## नववी-दहावीच्या विद्यार्थ्यांना जीवन केशरी समूहतर्फे आवाहन

**नाशिक : . प्रतिनिधी**
**मागील वर्षीप्रमाणे यंदाही जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूह, नाशिक यांच्या वतीने इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तक उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे सर्व नववी-दहावीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे.**

इयत्ता दहावीच्या परीक्षा सुरू असून, १७ मार्च रोजी संपणार आहेत. त्यामुळे परीक्षेनंतर दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपली पाठ्यपुस्तके विक्री न करता गरजू विद्यार्थ्यांना दान करावीत. त्याचप्रमाणे नववीच्या विद्यार्थ्यांनीही आपल्या परीक्षा झाल्यानंतर पुस्तके दान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. दान करण्यात आलेली पुस्तके संकलित करून गरजू विद्यार्थ्यांना मोफत वितरित केली जाणार आहेत. विशेषतः, जे विद्यार्थी पुस्तके दान करतील त्यांच्या हस्तेच गरजू विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात येईल.

विद्यार्थ्यांकडून विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम असून, समाजातील दानशूर व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी, विविध संस्था आणि नागरिकांनी यामध्ये सहकार्य करावे. अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी किंवा योगदान देऊ इच्छिणाऱ्यांनी ९५२९१९५६८८ या क्रमांकावर संपर्क करावा.

## रोहित्र अन् कृषिपंपांचे नुकसान टाळण्यासाठी कॅपॅसिटर बसवा

### महावितरणचे शेतकऱ्यांना आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**
**कृषिपंप तत्काळ सुरू करण्याच्या उद्देशाने ग्राहक ऑटोस्विच बसवतात. त्यामुळे परिसरातील सर्व कृषिपंप एकाच वेळी सुरू होऊन रोहित्रावरील भार अचानक वाढतो. परिणामी, रोहित्र जळणे, वीजवाहिन्या बंद वा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढते. यातून होणारी गैरसोय व नुकसान टाळण्यासाठी तसेच सुरळीत व योग्य दाबाचा वीजपुरवठा मिळावा यासाठी शेतकऱ्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विच टाळून सोबत कॅपॅसिटर बसवून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.**

प्रत्येक कृषिपंपास क्षमतेनुसार कॅपॅसिटर बसवणे हा रोहित्र जळणे वा नादुरुस्त होण्याचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी एक सोपा व चांगला उपाय आहे. कमी दाबाचा वीजपुरवठा, रोहित्र जळाल्यास वा नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती कालावधीतील खंडित वीजपुरवठा या समस्या सुटण्यास कॅपॅसिटरमुळे मदत होणार आहे.

> **ऑटोस्विचचा वापर टाळा**
> महावितरणकडून कृषिपंपांना दिवसा व रात्री अशा चक्राकार पद्धतीने वीजपुरवठा करण्यात येतो. वीजपुरवठा सुरु झाल्यानंतर शेतात जाऊन कृषिपंप चालू करण्याचा त्रास वाचवण्यासाठी काही ठिकाणी शेतकरी कृषिपंपांना 'ऑटोस्विच' लावतात. त्यामुळे वीज येताच कृषिपंप आपोआप चालू होतो. परिणामी, रोहित्रांवरील भार एकाच वेळी वाढत असल्याने रोहित्र जळण्याचे किंवा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढू शकते. त्यामुळे कृषिपंपांना कॅपॅसिटर बसवून सोबत ऑटोस्विचचा वापर टाळावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.



## व्यसनमुक्तीसाठी वारकरी सेवाभावी संस्थेचा पुढाकार

**दिंडोरी : प्रतिनिधी**
**दिंडोरी तालुक्यातील ग्रामीण भागात तरुणवर्ग मोठ्या प्रमाणात व्यसनाच्या आहारी गेला असून, राजरोसपणे तरुण वर्ग हा दारूबरोबर गांजा, इतर पदार्थ शरीरास घातक ठरणारे व्यसन करत असून, यासाठी दिंडोरी तालुक्यातील जोरणपाडा येथील वारकरी सेवाभावी संस्थेच्या मार्फत व्यसनमुक्ती मोहीम राबविण्याचे संस्थेचे अध्यक्ष नामदेव गावित यांनी ठरविले.**

याबाबत दिंडोरी पंचायत समिती गटविकास अधिकारी भास्कर रेगडे तसेच दिंडोरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रघुनाथ शेगर यांना निवेदन देण्यात आले. याबाबत माहिती अशी की, दिंडोरी तालुक्यातील ग्रामीण भागासह इतर ठिकाणच्या भागात व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असून, तरुणवर्ग हा दारूसह गांजा व इतर मानवी शरीरास घातक ठरणारे पदार्थ यास बळी पडत असून, यामुळे राजरोसपणे नशेच्या आहारी जाऊन भांडणास प्रतिउत्तर मिळत आहे.

दारूच्या घातक सेवनाने अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले असून, याचा परिणाम घरातील महिलांवर होत असून, त्यांना आपल्या व्यक्तीकडून मारहाण, शिवीगाळ या दुष्टचक्रास सामोरे जावे लागत आहे. ठाणे बीट अमलदार यांना सूचना करून संस्थेस सहकार्य करण्यात यावे, अशी मागणी देखील करण्यात आली आहे.

## लासलगाव येथे दिवसा कडक ऊन, तर रात्री थंडी

**लासलगाव : वार्ताहर**
**लासलगाव व परिसरात गेल्या आठवड्यापासून आकाश निरभ्र झाल्याने दिवसाच्या तापमानात वाढ तर रात्रीच्या तापमानात सरासरीपेक्षा घट झाली आहे. त्यामुळे दिवसा कडक ऊन तर रात्री थंडी असे वातावरण निर्माण झाले आहे. या बदलत्या वातावरणाचा परिणाम मनुष्याच्या आरोग्यावर ही पडत आहे. या वातावरणामुळे सर्दी, पडसे, ताप व खोकल्याच्या आजारात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.**

गेल्या काही दिवसांपासून दिवसाच्या तापमानात व रात्रीच्या तापमानात बराच फरक पडत आहे. आपल्याकडे फेब्रुवारी महिना सुरू झाला की, उन्हाळा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या महिन्यात दिवसा कडक ऊन असते. परंतु हवामानातील बदलामुळे दुपारी ऊन तर रात्री थंडी असा अनुभव सध्या लासलगावकर घेत आहे.

या हवामानातील बदलामुळे सर्दी, थंडी वाजून ताप येणे, खोकला, डोके दुखणे, अंग दुखणे आदी आजारांत वाढ झाली आहे. दुपारी कडक ऊन तर रात्री थंडी यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. या बदलत्या वातावरणाचा परिणाम वृद्ध आणि लहान मुलांवर लगेच होत असतो. दमा असलेल्या रुग्णांना या बदलत्या वातावरणाचा अधिक त्रास होत आहे. गेल्या आठवड्याभरात लासलगाव व परिसरात विचित्र हवामानाचा अनुभव येत आहे. प्रारंभी थंडी कमी होत गेली. पारा ३३ अंशांपर्यंत वाढला. यामुळे कमाल तापमानातही वाढ होत गेली. अचानक थंडीचा जोर वाढला. या थंडीचा कडाका चांगलाच वाढला. थंडी आणखी एक आठवडा राहणार असे हवामान अभ्यासकांचे मत आहे.

> दिवसा ऊन आणि रात्री थंडी पडणे हे वातावरणात होणाऱ्या बदलाचे कारण असू शकते. यामुळे ताप, सर्दी, खोकला आणि व्हायरल आजार वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे वेळीच योग्य ते निदान करणे आणि औषधोपचार करणे आवश्यक आहे.
>
> – **डॉ. दत्तात्रय जगताप**



## स्व. शशिकांत ठोंबरे शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी निकम

**येवला : प्रतिनिधी**
**येवला येथील स्व. शशिकांत ठोंबरे शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी शंकर निकम यांची तर व्हा. चेअरमनपदी मनीषा गांगुर्डे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेच्या सभागृहात निवड सभेचे आयोजन करण्यात आले होते.**

दरम्यान, निवडीनंतर नवनिर्वाचितांचा संस्थेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. सभासदांना पूर्वीप्रमाणेच लाभ देऊन संस्थेच्या विकासाला हातभार लावू, असे नवनियुक्त चेअरमन निकम व व्हा. चेअरमन गांगुर्डे यांनी निवडीनंतर बोलताना स्पष्ट केले.

सदर निवडीप्रसंगी प्रा. शिक्षक संघाचे राज्य सदस्य बाजीराव सोनवणे, जिल्हा कार्याध्यक्ष शांताराम काकड, राजेंद्र ठोंबरे, कृष्णा गरुडे, संदीप शेजवळ, एकनाथ घुले, किरण जाधव, विजय परदेशी, दिनेश मानकर, नवनाथ कांगणे, नाना गोराणे, गोकुळ वाघ, जयराम नळे, राजेंद्र कोतकर, दादा वाघमोडे, गोरख पागिरे, श्रीमती राठोड, रणजित परदेशी, चंद्रभान पवार, किशोर गायकवाड, राहुल गांगुर्डे, सुरेश तागड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, येवला तालुक्यातील शिवसेनेचे युवानेते संभाजी पवार यांनी नवनियुक्त चेअरमन शंकर निकम, मनीषा गांगुर्डे यांचे अभिनंदन करून यथोचित सत्कार केला तसेच पाटोदा बीटातर्फे पाटोदा केंद्राचे केंद्रप्रमुख राजेंद्र कुशारे, सोमठाण देश केंद्राचे केंद्रप्रमुख शशिकांत पानगव्हाणे व संतोष लोहाकरे, उखा व्हनमने यांनीदेखील नवनिर्वाचितांचा सत्कार केला.

## राजेंद्र दिघे यांच्या बालकवितासंग्रहाचे प्रकाशन

**नाशिक : प्रतिनिधी**
**येथील साहित्यिक, आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष उपक्रमशील शिक्षक कवी राजेंद्र दिघे यांच्या 'पाखरांची गाणी' या बहुरंगी बालकवितासंग्रहाचे प्रकाशन दिल्ली येथील तालकटोरा स्टेडियमवर छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरी येथे सुरू असलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रकाशित झाले.**

पुस्तक प्रकाशनाच्या कट्ट्यावर महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती नीलमताई गोऱ्हे, ज्येष्ठ पत्रकार तथा राजकीय विश्लेषक भाऊ तोरसेकर, साहित्य अकादमी विजेते बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड, 'किशोर'चे संपादक किरण केंद्रे, 'सरहद'चे संजय नहार, साहित्य संमेलन प्रकाशन समितीचे अध्यक्ष, 'चपराक'चे घनश्याम पाटील, शिक्षणतज्ज्ञ संदीप वाघचौरे, सावानाचे संजय करंजकर, प्रशांत कापसे, नाशिकचे साहित्यिक प्रकाश होळकर, प्रा. लक्ष्मण महाडिक, राजेंद्र सोमवंशी, संदीप देशपांडे, प्रशांत केंदळे, रतन पिंगट या मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.



**दिल्ली : येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कवी राजेंद्र दिघे यांच्या 'पाखरांची गाणी' बालकवितासंग्रहाचे प्रकाशन करताना विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, पत्रकार भाऊ तोरसेकर, बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड, किरण केंद्रे, संजय नहार, घनश्याम पाटील.**

यावेळी संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी मराठी साहित्यातील चाळीस विविध पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. जिल्ह्यातील पाच लेखकांच्या पुस्तकांना संमेलनात प्रकाशन होण्याचा सन्मान मिळाला आहे. पुणे येथील 'लाडोबा' प्रकाशनाने राजेंद्र दिघे यांचा काव्यसंग्रह प्रकाशित केला आहे.

# येवला शहरातील अतिक्रमण उद्ध्वस्त

## नगरपालिकेची कारवाई; टपऱ्या, हातगाड्या जप्त

**येवला : प्रतिनिधी**
**येवला शहरात सातत्याने अतिक्रमण होत आहे. हे अतिक्रमण उद्ध्वस्त करण्यासाठी नगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने युद्धपातळीवर शहरातील अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली असून, काल शहरातील फत्तेबुरूज नाका भागातील अतिक्रमण नगरपालिकेने उद्ध्वस्त केले आहे.**



**येवला : नगरपालिकेच्या वतीने येवला शहरातील फत्तेबुरूज नाका परिसरातील अतिक्रमण उद्ध्वस्त करण्यात आले असून, ट्रॅक्टरच्या माध्यमातून टपऱ्या, हातगाड्या जप्त करण्यात आल्या आहेत. (छाया : विलास पगारे)**

दरम्यान, या अतिक्रमण मोहिमेत अतिक्रमण केलेल्या विक्रेत्यांचा दोन टपऱ्या, तीन हातगाड्या तसेच इतर साहित्य नगरपालिकेच्या पथकाने ट्रॅक्टरच्या माध्यमातून नगरपालिकेत जमा केले आहे. सदरची मोहीम नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. येवला शहरातील अतिक्रमण हे वाहतुकीला नेहमीच अडथळा निर्माण करणारे आहे. शहरातील वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये यासाठी अतिक्रमण विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे, अशी माहिती पालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर यांनी बोलताना दिली.

फत्तेबुरूज नाका परिसरातील सर्व अतिक्रमण उद्ध्वस्त करण्यात आले असून, ज्या ज्या ठिकाणी अतिक्रमण करण्यात येईल त्या ठिकाणाचे अतिक्रमण उद्ध्वस्त करण्यात येणार असून, अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी आहेर यांनी बोलताना सांगितले. दरम्यान, या परिसरातील अतिक्रमण काढीत असताना काही अतिक्रमणधारकांनी पालिका कर्मचाऱ्यांबरोबर हुज्जत घालून आपला राग व्यक्त केला तसेच अतिक्रमण काढण्यासाठी विरोधदेखील दर्शविला, मात्र या विरोधाला न जुमानता पालिकेच्या वतीने अतिक्रमण काढण्यात आले. यावेळी पालिकेचे उपमुख्याधिकारी चंद्रकांत भोये, कर निरीक्षक रोहित पगार, स्वच्छता निरीक्षक पूनम भामरे, शहर समन्वयक गौरव चुंबळे, पथक प्रमुख दीपक जावळे, संदीप बोढरे, संजय लाहुंडे, राजेंद्र जांभूळकर, अशोक कसारे, सुनील जाधव आदींसह पालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

> येवला शहरात सातत्याने होणारे अतिक्रमण रोखण्यासाठी नगरपालिकेच्या वतीने कडक अतिक्रमण मोहीम राबविण्यात येत आहे. विक्रेत्यांनी शहरात कुठेही आपली दुकाने थाटू नये किंवा कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करू नये. यापुढे शहरात अतिक्रमण केल्यास पालिकेच्या वतीने कडक कारवाई करण्यात येईल.
>
> – **तुषार आहेर**, मुख्याधिकारी, नगर परिषद, येवला

## भाजप बुद्धिजीवी प्रकोष्ठतर्फे नाशकात भव्य काव्यसंमेलन

**नाशिक : प्रतिनिधी**
**माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी 'राष्ट्रभक्ती' या विषयावर आज भव्य काव्यसंमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती बुद्धिजीवी प्रकोष्ठचे उत्तर महाराष्ट्र संयोजक चंदन पवार यांनी पत्राद्वारे दिली आहे.**

हे भव्य काव्यसंमेलन भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते ७ वाजेपर्यंत विशाखा सभागृह, कुसुमाग्रज स्मारक, विद्या विकास सर्कल, गंगापूर रोड, नाशिक येथे पार पडणार आहे. संमेलनात नाशिकमधील सुप्रसिद्ध २० निमंत्रित मराठी कवी व ६ हिंदी कवी आपली काव्यप्रतिभा सादर करणार आहेत. स्वर्गीय अटलजींच्या पावन स्मृतीनिमित्त कवितांचा जागर करून राष्ट्रभक्ती गीतांवर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नाशिककरांनी मोठ्या संख्येने या काव्यसंमेलनास हजेरी लावावी, असे आवाहन नाशिकचे बुद्धिजीवी प्रकोष्ठचे संयोजक डॉ. श्रीधर व्यवहारे व नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी केले आहे.

या कार्यक्रमास भाजप प्रदेश सहमुख्य प्रवक्ते व भाजप बुद्धिजीवी प्रकोष्ठचे प्रदेश संयोजक अजित चव्हाण, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, भाजप प्रदेश बुद्धिजीवी प्रकोष्ठचे सहसंयोजक रोहन देशपांडे, उत्तर महाराष्ट्र संयोजक चंदन पवार, नाशिक महानगर यांची उपस्थिती असणार आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शशिकांत जाधव, विपुल मेहता, प्रवीण जोशी प्रयत्नशील आहेत.

## महत्त्वाचे

### गर्भातील बाळासह आदिवासी महिलेचा मृत्यू

**भंडारा :** प्रसूती कळा असह्य झाल्यामुळे गर्भवती महिला प्राथमिक आरोग्य केंद्रात आली. डॉक्टरांनी प्रसुतीला वेळ आहे असे सांगून 'तिला' घरी परत पाठवले. दुसऱ्या दिवशी तिला तीव्र प्रसूती कळा सुरू झाल्याने तुमसर उप जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रसूती दरम्यान बाळाचा आणि मातेचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संतापाची लाट पसरली असून डॉक्टरांच्या चुकीने निष्पाप मायलेकाचा जीव गेल्याचे हळहळ व्यक्त केली जात आहे. तुमसर तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या नाकाडोंगरी प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येत असलेल्या आष्टी येथील नऊ महिन्याच्या गरोदर महिलेचा गर्भातील बाळासह तुमसर उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना २४ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री एक वाजतादरम्यान समोर आली. सुनिता दुर्गेश सोयाम (२४) रा.आष्टी ता. तुमसर, असे मृतक गरोदर आदिवासी महिलेचे नाव आहे.

### तीन वेगवेगळ्या नावाने भोसरीत वास्तव्य करणारा बांगलादेशी अटकेत

पिंपरी : तीन वेगवेगळ्या नावाने बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या एका बांगलादेशी व्यक्तीला भोसरी पोलिसांनी अटक केली. ही कारवाई रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास बनाचा ओढा, भोसरी येथे करण्यात आली. अटक केलेल्या आरोपीकडे नयन रतन सरकार (वय २१, रा. क्रिष्णापूर, लोहागारा, जि. नराईल, बांगलादेश), राकेश रतन सरकार (रा. घोला नादिया, पश्चिम बंगाल), सुमित शंकर भक्ता (रा. नाकाशी पारा, पश्चिम बंगाल) अशा तीन नावाची कागदपत्रे आढळून आली. त्याचे मूळ नाव नयन सरकार असे आहे. तो सध्या दिघीतील कामगार वसाहतीत वास्तव्य करत होता. त्याने बांगलादेश मधून पश्चिम बंगाल मध्ये अनधिकृतपणे घुसखोरी करून प्रवेश केला. त्यानंतर तो कामाच्या निमित्ताने भोसरीत आला होता. भोसरी पोलिसांकडून दररोज रात्री सहा ते नऊ या कालावधीत नाकाबंदी लावली जाते. रविवारी नाकाबंदी सुरु असताना नयन संशयितपणे जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याच्या बोलण्यात तफावत आढळून आली. त्याच्याकडील पिशवीची तपासणी केली असता त्यामध्ये वेगवेगळ्या नावाची कागदपत्रे आढळून आली. तो बांगलादेशी असल्याचे निदर्शनास आले. पश्चिम बंगाल येथील भारतीय मतदान ओळखपत्र, बांगलादेश येथील लोहागारा, जि. नराईल येथील लक्ष्मीपाशा आदर्श सेकंडरी स्कुल या शाळेचा दाखला आढळून आला. पोलिसांनी नयन याला अटक केली. परकीय नागरिक आदेश, परकीय नागरिक कायदा यासह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो मागील एक वर्षापासून पिंपरी-चिंचवड शहरात बेकायदेशीर वास्तव्य करत असल्याचे पोलिसांनी सांगितले. उपहारगृह आणि बांधकाम प्रकल्पावर काम करत होता. त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे. पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत गुरव तपास करीत आहेत.

### मुलानेच चोरले वडिलांच्या तिजोरीतील तीन कोटी रुपयांचे हिरे

**मुंबई :** ऑपेरा हाऊस येथील पंचरत्न इमारतीमधील ५७ वर्षीय हिरे व्यापाऱ्याच्या कार्यालयातील तिजोरीतून तीन कोटी रुपयांचे हिरे चोरीला गेले असून याप्रकरणी सीसी टीव्हीची तपासणी केली असता चोर दुसरा-तिसरा कोणी नसून व्यापाऱ्याचा मुलगाच असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी डॉ. दादासाहेब भडकमकर मार्ग (डी.बी. मार्ग) पोलिसांनी आरोपीला अटक केली. आरोपीने चौकशीत दिलेल्या माहितीवरून लवकर चोरीला गेलेले हिरे हस्तगत करण्यात येतील, असे अधिकाऱ्याने सांगितले. याप्रकरणी आरोपीला न्यायालयापुढे हजर केले असता न्यायालयाने त्याला २७ फ ब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.लोअर परळ येथील सेनापती बापट मार्गावरील लोढा वर्ल्ड क्रेस्ट या इमारतीत वास्तव्यास असलेले तक्रारदार विपूल धीरजलाल जोगाणी (५७) हिऱ्यांचे प्रसिद्ध व्यापारी असून त्यांचे ऑपेरा हाऊस येथील पंचरत्न इमारतीत कार्यालय आहे. या कार्यालयातून हिऱ्यांची खरेदी-विक्री केली जाते. त्यामुळे कार्यालयात तिजोरी ठेवण्यात आली आहे. त्यात मौल्यवान हिरे ठेवण्यात येतात. पंचरत्न इमारतीत हिरे व्यापाऱ्यांची कार्यालये असल्यामुळे इमारतीत सुरक्षा व्यवस्था तैनात आहे.

### कृषीपंपाची चोरी; चोरट्यांसह पंप विकत घेणारे पोलिसांच्या ताब्यात

**धुळे :** जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून शेतात लागण्यात आलेले कृषी पंप चोरी करण्याच्या घटना वाढल्या होत्या. या प्रकरणी दाखल तक्रारींवरून पोलिसांनी टोळीचा शोध सुरु केला. पोलिसांनी कृषी पंप चोरी करणाऱ्या चोरट्याना ताब्यात घेतले. या सोबतच चोरट्यांकडून कृषी पंप विकत घेणाऱ्याच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. धुळे तालुक्यातील धामणगाव शिवारामध्ये शेतकऱ्यांच्या शेतातून कृषी पंप चोरी गेल्याची तक्रार धुळे तालुका पोलीस ठाण्यात दाखल झालेली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने धुळे तालुका पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. या तपासात चोरट्याबाबत माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे धुळे तालुका पोलिसांनी चोरट्याच्या मुसक्या आवळल्या. तसेच त्याने चोरी केलेले कृषी पंप ज्या इसमास विक्री केले होते. त्याला देखील पोलिसांनी ताब्यात घेतले शेतकऱ्यांच्या शेतातून कृषी पंपाची चोरी करणाऱ्या चोरट्याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता चोरट्याने जवळपास पाच कृषी पंप चोरल्याची कबुली दिली आहे. या चोरट्याकडून त्याने चोरलेले पाच कृषी पंप मोटर्स पोलिसांनी हस्तगत केले असून पुढील कारवाई धुळे तालुका पोलीस करीत आहेत.

### चोपड्यात १३ किलो गांजा जप्त

**जळगाव :** चोपड्याकडून धरणगावकडे गांजाची वाहतूक करण्यात येणार असल्याची माहिती एलसीबीला मिळाली. या माहितीवरून चोपडा ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कावेरी कमलाकर यांना सांगितल्यानंतर एलसीबी व ग्रामीण पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांनी सापळा रचत कारवाई केली. चोपड्याकडून धरणगाव रस्त्याकडे स्कूटीवरती प्लास्टिक पिशवीमधून गांजा वाहतूक करताना आढळून आला. यात १३ किलो गांजा व दुचाकी असा दोन लाख ४४ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### तरुणाने मेट्रो स्टेशनवरून उडी मारली, नंतर रस्त्यावर गाडीने चिरडले

**पुणे:** एका २१ वर्षीय विद्यार्थ्याने मेट्रो स्टेशनवरून उडी घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. उडी मारल्यानंतर रस्त्याने जाणाऱ्या एका वाहनाने त्याला चिरडले. यात त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. ही घटना सोमवारी २४ फेब्रुवारीला सायंकाळी ६ वाजेच्या दरम्यान घडली आहे. पिंपरी चिंचवडमधील संत तुकाराम नगर मेट्रो स्टेशनवर एका २१ वर्षीय तरूणानं आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्याने मेट्रो स्टेशनवरून उडी घेतली. उडी घेतल्यानंतर रस्त्याने जाणाऱ्या एका वाहनाने त्याला चिरडलं. सुजल संजय मानकर असं मृत तरूणाचे नाव आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कडलक यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुजल मानकर डीवाय पाटील कॉलेजमध्ये शिकत होता. त्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. सोमवारी सायंकाळी तो संत तुकाराम नगर मेट्रो स्टेशनवरील प्लॅटफॉर्मवर चढला आणि थेट रस्त्यावर उडी मारली.क रस्त्यावर पडल्यानंतर त्याला एका वाहनाने चिरडलं. मुलाला गाडीने चिरडल्यानंतर स्थानिकांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. त्याला तातडीने वायसीएम रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. दरम्यान, आत्महत्या करण्यापूर्वी त्यानं एक चिठ्ठी लिहिली होती. त्यात त्याने कुटुबांच्या आर्थिक परिस्थितीमुळे आत्महत्या करून मृत्यू करत असल्याचं नमूद केलं.

### कारची दोन वाहनांना धडक; तिघे जखमी

**कोल्हापूर :** शाहू टोलनाक्याजवळ मंगळवारी रात्री एक वाजता भरधाव कार चालवून रस्त्याकडेला थांबलेल्या दोन वाहनांना धडकून तिघांना जखमी केले. याप्रकरणी कारचालक सिद्धांत सुनील पोवार याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. त्यामध्ये चालक सिद्धांत आणि करण जयसिंग भंडारी, वैभव भाले हे तिघेजण जखमी झाले.पोलिसांनी सांगितले की, सिद्धांत पोवार याने आपल्याकडील वाहन भरधाव चालवून बाजीराव दत्तू ओंबासे यांच्या चारचाकी वाहनास पाठीमागून धडकली.

# प्रवासी बसमध्ये क्षयरोगाबाबत जनजागृती

**नाशिक : प्रतिनिधी**

मालेगाव तालुक्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र सौंदाणे येथे टीबीमुक्त भारत जनजागृती अभियान जिल्हाधिकारी जलज शर्मा, आशिमा मित्तल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांच्या मार्गदर्शनानुसार १०० दिवस हा कार्यक्रम चालू आहे. त्याचाच एक भाग म्हणून सार्वजनिक ठिकाणी बस स्टॅण्ड येथे बसस्थानकामध्ये उपस्थित प्रवाशांमध्ये क्षयरोग या आजाराबाबत समाजामध्ये जनजागृती करण्याकामी आरोग्यसेवक विजय अहिरे, आरोग्य सेविका पवार सिस्टर, तसेच आशा वर्कर यांनी महाराष्ट्र परिवहन मंडळाची बस थांबवून त्यातील प्रवासी, ड्रायव्हर, कंडक्टर यांना पोस्टर, बॅनर, हस्तपत्रिका



देऊन व दाखवून, तसेच गावामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी पोस्टर्स लावून, प्रवासी गटामध्ये हस्तपत्रिका वाटून टीबी या आजाराविषयी जनजागृती करण्यात आली. यामध्ये ड्रायव्हर, कंडक्टर, तसेच नागरिकांना वाहनांमध्ये कोणत्याही प्रकारचे धूम्रपान, तसेच थुंकणे याबाबत लोकांना माहिती दिली. थुंकण्यामुळे सर्व ठिकाणी टीबी पसरू शकतो. त्यामुळे प्रवासी वाहनामध्ये कोणत्याही प्रकारे थुंकू नये, तसेच आपले वाहन व्यवस्थित ठेवावे, तसेच टीबी आजाराविषयी माहिती देण्यात आली तसेच हस्तपत्रिका देऊन व सध्या १०० दिवस जो कार्यक्रम टीबी या आजाराबाबत आरोग्य विभागामार्फत घेण्यात येत आहे, त्यामध्ये सर्वांनी सहभागी होऊन लवकरात लवकर क्षयरोग रुग्णांना उपचाराखाली आणणे तसेच १०० टक्के उपचार पूर्ण करून घेणे याबाबतचे महत्त्व याप्रसंगी आरोग्यसेवक विजय अहिरे, श्रीमती पवार सिस्टर यांनी या ठिकाणी केले.

जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रवींद्र चौधरी, डॉ. हर्षल नेहेते, डॉ. राजेंद्र बागुल, डॉ. दीपक लोणे, डॉ. युवराज देवरे यांनी अशाप्रकारे जनजागृती केल्याबद्दल या चमूचे विशेष कौतुक केले आहे.



## महाशिवरात्रीनिमित्त नाशिकमध्ये महादेव-पार्वती विवाह सोहळ्याचे आयोजन

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**महाशिवरात्रीच्या पवित्र मुहूर्तावर भगवान शिव आणि माता पार्वती यांच्या विवाह सोहळ्याचे भव्य आयोजन श्री नागेश्वर महादेव मंदिर, सावतानगर, सिडको येथे करण्यात आले आहे. २५ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक विधी आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून हा शुभ विवाह साजरा केला.**

कार्यक्रमाची सुरुवात २५ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ५ वाजता हळद समारंभाने झाला. त्यानंतर गणेशयाग आणि रुद्रयाग यांसारखे पवित्र यज्ञ २६ फेब्रुवारी रोजी सकाळी पार पडतील. दुपारी ४ वाजता भगवान शिवाची मिरवणूक मोठ्या भक्तिभावाने निघेल, ज्यामध्ये शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले

संध्याकाळी ६.३० ते ६.४५ या वेळेत महादेव आणि पार्वती यांचा विवाह विधी पार पडला. त्यानंतर ६.४५ वाजता महाआरती झाली. या विवाह सोहळ्यानंतर रात्री ७ ते ११ या वेळेत भजनसंध्या आयोजित केली. मध्यरात्री १२ वाजता महाकाल आरती झाली. यावेळी पदाधिकारी विशाल जाधव, अरविंद पारखे, विनायक वाघोदे, जीवन पगारे, आदित्य सूर्यवंशी, आयोजकांसह मोठ्या संख्येने भक्तगण उपस्थित होते.

## नाशिक मनपातर्फे प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनांतर्गत अर्ज भरण्याचे आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**

**भारतीय अर्थव्यवस्थेत विविध पारंपरिक कारागिरांचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे.**

हे कारागीर आणि कारीगर समाजाचे एक महत्त्वाचे घटक असून, ते आपल्या हाताने आणि अवजारांचा वापर करून विविध व्यवसाय करतात. यामध्ये लोहार, सोनार, कुंभार, सुतार, चांभार, बांबूच्या टोपली बनवणारे, झाडू तयार करणारे, हातांनी खेळणी बनवणारे, फुलांचे हार व डेकोरेशन करणारे, धोबी, मासे पकडण्याची जाळी तयार करणारे, न्हावी, लाकडी होड्या तयार करणारे मूर्तिकार, विविध शेतीउपयोगी हत्यार तयार करणारे जसे की, कुऱ्हाड, खुरपी, विळे इ. यासारख्या पारंपरिक व्यवसायांमध्ये कार्यरत असलेले कारीगर मुख्यतः समाविष्ट आहेत. प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनांतर्गत पारंपरिक कारागिरांना योग्य प्रकारे मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि वित्तीय सहाय्य मिळविण्याची संधी देण्यात येते. यामुळे त्या क्षेत्रातील कारागिरांची कामकाज क्षमता आणि आर्थिक स्थिरता वाढविण्यास मदत होते. सदर योजनेंतर्गत हाती उपकरणांनी काम करणारा किंवा कुटुंब आधारित पारंपरिक व्यवसाय करत असलेला कारीगर, तसेच लाभार्थी कुटुंबातील एक सदस्य या योजनेसाठी पात्र ठरेल. अर्ज करणाऱ्याचे वय १८ वर्षे किंवा त्याहून अधिक असावे. अर्जदाराने मागील ५ वर्षांत पीएमईजीपी, पीएम स्वावलंबन किंवा राज्य व केंद्र सरकारच्या कोणत्याही आर्थिक योजनेंतर्गत कर्ज घेतलेले नसावे. सरकारी सेवेत कार्यरत असलेल्या व्यक्तींना आणि त्यांचे कुटुंबीय या योजनेसाठी पात्र नाहीत. योग्य पात्र लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना अर्ज भरून योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहिती किंवा सहाय्य प्राप्त करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या विश्वकर्मा योजनेच्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन मनपा समाजकल्याण उपायुक्त नितीन नेर यांनी केले आहे.

## संधी आणि गुंतवणुकीवर शुक्रवारी निमा हाऊसमध्ये व्याख्यान

**नाशिक : प्रतिनिधी**

**नुकताच जाहीर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पानंतरच्या संधी आणि गुंतवणूक या विषयावर शुक्रवारी (२८ फेब्रुवारी २०२५) दुपारी ४.३० वाजता त्र्यंबकेश्वर रोडवरील निमा हाऊस येथे व्याख्यान आयोजित केले आहे. विज्डम एक्स्ट्राच्या वतीने आयोजित या व्याख्यानात एनएसडीएल (ई-गव्हर्नन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.) मुंबईचे माजी उपाध्यक्ष तथा अर्थतज्ज्ञ चंद्रशेखर टिळक हे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महानगरपालिकेच्या आयुक्त मनीषा खत्री असतील. तर नाशिक इंडस्ट्रिज ॲण्ड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष आशिष नहार, विज्डम एक्स्ट्रा कन्सल्टंटचे संचालक मेहुल देसाई तसेच एएमएस अश्युरन्स आयएमएफचे प्रिन्सिपल ऑफिसर अमरिश सोनी यांची विशेष उपस्थिती राहाणार आहे.

या कार्यक्रमासाठी निमा, एएमएस, गोदा फार्मस्, स्वयंशक्ती स्त्री उद्यमी फाउंडेशन यांचे सहकार्य मिळते आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन विज्डम एक्स्ट्राच्या संचालिका दीपाली चांडक, शाल्मली शेट्टी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी निखिलेश काळे यांच्याशी ९५७९९३२४७६, ९४२३७८५०५४, ९८८१०६५००१ संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## रब्बी हंगामासाठी पालखेड डावा कालव्याचे दुसरे आवर्तन देण्यात यावे : गायकवाड

**येवला : प्रतिनिधी**



**रब्बी हंगामासाठी पालखेड डाव्या कालव्याचे दुसरे आवर्तन लवकरात लवकर देण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश किसान काँग्रेस पक्षाचे सचिव एकनाथ गायकवाड यांनी एका प्रसिद्धीला दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.**

सदर निवेदनात गायकवाड यांनी म्हटले आहे की, रब्बी हंगाम सुरू असून, फेब्रुखारी महिना संपत आला आहे तरी पालखेड डावा कालव्याचे अद्यापही दुसरे आर्वतन देण्यात आले नाही. रब्बी हंगामातील मका, गहू, हरभरा, कांदा आदी पिकांना पाणी देण्याची अत्यंत गरज आहे. आवर्तनाला उशीर झाल्याने शेतातील उभे असलेली पिके करपू लागले आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे. पाटबंधारे विभागाकडून अद्यापही पाण्याचे नियोजन जाहीर करण्यात आले नाही. दरम्यान, पिकांची परिस्थिती लक्षात घेता पाण्याचे आवर्तन देणे गरजेचे आहे. म्हणून कोणत्याही प्रकारचा विलंब न करता पाटबंधारे विभागाने दुसरे आवर्तन लवकरात लवकर सोडून शेतकऱ्यांना सहकार्य करावे, अशी मागणी एकनाथ गायकवाड यांनी निवेदनात शेवटी केली असून, सदर निवेदनाच्या प्रती विविध विभागांना पाठविण्यात आल्या आहेत.

# सुपर फिफ्टी विद्यार्थ्यांची करण्यात आली आरोग्य तपासणी

**नाशिक : प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या सुपर- ५० उपक्रमातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व प्राथमिक आरोग्य केंद्र सय्यदपिंपरी येथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने करण्यात आली. नाशिक जिल्हा परिषदेच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या सुपर-५० उपक्रमातील २३० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.**

आरोग्य तपासणी सोबतच विद्यार्थ्यांना आरोग्य शिक्षणाबद्दल समुपदेशन करण्यात आले. यामध्ये सिकलसेल आजार, वैयक्तिक स्वच्छता, मासिक पाळीतील काळजी, स्वच्छता, आहार, व्यायाम याविषयी समुपदेशक प्रीती मगर यांच्याकडून माहिती देण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या



कल्पनेतून सुपर फिफ्टी हा कार्यक्रम राबविण्यात येतो. या विद्यार्थ्यांना उपाध्ये कॉलेज ऑफ सायन्स यांच्या सहकार्याने त्याची अंमलबजावणी करण्यात येते. गटविकास अधिकारी डॉ. सोनिया नाकाडे , तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शैलेश निकम उपस्थितीत व मार्गदर्शनानुसार या कार्यक्रमांमध्ये सहभागी झालेले सर्व विद्यार्थी विविध गावांतील असून, या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी आरबीएसके टीम व प्राथमिक आरोग्य केंद्र सय्यद पिंपरी यांच्या संयुक्त विद्यमाने २३० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी यावेळी करण्यात आली.

यामध्ये विद्यार्थ्यांची पूर्ण शारीरिक तपासणी करण्यात आली तसेच काहींचे ब्लड टेस्ट करण्यात आल्या कॉलेजच्या आवारातील मोकळ्या वातावरणात त्यांना आरोग्य शिक्षण देण्यात आले यामध्ये सिकलसेल आजार, वैयक्तिक स्वच्छता, मासिक पाळीतील काळजी, स्वच्छता,आहार, व्यायाम, याविषयी श्रीमती समुपदेशक श्रीमती प्रीती मगर यांच्याकडून विशेष माहिती देण्यात आली वैद्यकीय अधिकारी डॉ. नाईकवाडे, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. जयश्री पाटील, डॉ. सरोज निकम, डॉ. सोनाली गायकवाड, डॉ. दीपिका वाघ, डॉ. उमाकांत मोरे, डॉ अभिजीत गाडे ,डॉ. अविनाश देवरे यांनी विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी केली तसेच शाहिद खा देशमुख, सार्थक रोकडे, औषध निर्माण अधिकारी वृषाली चव्हाण, दीपिका महाले, यांचे मार्फत त्यांना मोफत औषध उपचार करण्यात आला महा लॅब टेक्निशियन रोहिणी लबडे, दीपक साठे यांच्यातर्फे काही विद्यार्थ्यांचे रक्त, लघवी तपासणी करण्यात आली. अत्यंत उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कॉलेजचे अधिकारी, कर्मचारी, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य सहाय्यक भामरे नाना, कुमावत सिस्टर, आरोग्य सेविका श्रीमती फुला भोये, आरोग्य सेवक नीलेश कांबळे , वीरेंद्र बागुल, वाहनचालक संतोष गरगटे यांनी विशेष प्रयत्न केले.

## ग्राहक संरक्षण समिती पुरस्कारांचे आज वितरण

**नाशिक : प्रतिनिधी**

**केंद्र सरकार नोंदणीकृत ग्राहक (उपभोक्ता) संरक्षण समितीच्या' चौथा वर्धापनदिन आज दिनांक २६ रोजी रामलीला बॅक्वेट हॉल या ठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा होत आहे.**

यानिमित्त राज्यस्तरीय ग्राहक हक्क जनजागृती अभियान मेळावा व राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. समितीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष दादाभाऊ केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली व ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे व न्या. एस पी तावडे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे राष्ट्रीय सचिव डॉ.अविनाश झोटिंग व राष्ट्रीय प्रवक्ता डॉ.साहेबराव निकम यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजसुधारक व समाजसेवकांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण न्या एस पी तावडे, न्यायाधीश.सचिन शिंपी, ना गिरीश महाजन, ना. नरहरी झिरवाळ, ना. योगेश कदम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान केले जाणार आहेत. न्यायाधीश सचिन शिंपी,अशोक आव्हाड ,ॲड. प्रेरणा काळुंखे- कुलकर्णी, ॲड.महेश ढाके, ॲड.हेमत भंगाळे ॲड.भुषण गोरे, माया भिका सोनवणे, इगतपुरी, डॉ.साहेबराव जगन्नाथ पवार आदींसह विविध मान्यवरांना हे पुरस्कार देण्यात येणार आहेत. पुरस्कार निवड समितीचे डॉ.अविनाश झोटिंग व डॉ.साहेबराव निकम, महादेव मस्के, डॉ.अर्चना झोटिंग, रोहिणी जाधव, अक्षय कोठावदे,नम्रता कायस्थ, वर्षा बोरसे यांनी पुरस्कारार्थींची निवड केली.

## नवीन नाशिकमध्ये पाणीपुरवठा आणि ड्रेनेज समस्यांमुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष

**सिडको : विशेष प्रतिनिधी नवीन नाशिक तसेच प्रभाग क्रमांक २४ मधील नागरिकांना गेल्या अनेक दिवसांपासून पाणीपुरवठा आणि ड्रेनेजच्या समस्या भेडसावत आहेत. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या निष्क्रिय कारभारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.**

स्थानिक नागरिक आणि महिला वर्ग वारंवार या समस्यांकडे लक्ष वेधत आहेत, मात्र प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारचे ठोस नियोजन केले जात नाही. परिणामी, परिसरात सांडपाण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. पिण्याच्या पाण्याचा अपुरा आणि अनियमित पुरवठा हा देखील नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. यासंदर्भात अनेक वेळा तक्रारी करूनही महापालिका अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत असून, समस्या सुटण्याऐवजी अधिकच वाढत आहे. त्यामुळे आता महानगरपालिका आयुक्तांनी या प्रश्नाची गंभीर दखल घेऊन संबंधित हलगर्जी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### जिल्ह्यांना आज आणि उद्या उष्णतेच्या लाटेचा इशारा

**नागपूर :** होळीनंतर सुरू होणारा उन्हाळा यंदा महिनाभर आधीच सुरू झाला आहे. उन्हाळ्याची नुसती सुरुवातच झालेली नाही तर उन्हाच्या तीव्र झळा आणि उकाड्याने नागरिकांना त्रस्त केले आहे. अशातच आता भारतीय हवामान खात्याने राज्यातील काही जिल्ह्यांना आज आणि उद्या उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे.महाराष्ट्रच नाही तर देशाच्या अनेक भागांमध्ये उन्हाच्या तीव्र झळा जाणवू लागल्या आहेत. देशाची राजधानी दिल्लीत रात्री आणि पहाटेच्या सुमारास थंडी असली तरीही दिवसा तापणारे उन्ह मात्र चटका देणारेच आहे. साधारण होळीला उन्हाची सुरुवात होते आणि एप्रिल व मे महिन्यात उन्हाचा तडाखा जाणवायला सुरुवात होते.


**टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका निफाड पैकी मौजे ओझर गांव या गावचे शिवारातील बिनशेत जमिन मिळकत यांसी **सर्वे नंबर नं २३०६/२/२३०७/२/प्लॉट/५३ यांसी क्षेत्र १६०.८१ चौ.मी. यांसी आकार रू. १६.०८ पैसे** ही मिळकत, यांसी चतुः सिमा रेकॉर्ड ऑफ राईटस् प्रमाणे.

वर वर्णन केलेली मिळकत ही **कु. कोमल वसंत कानकाटे** यांचे मालकीची व कब्जे उपभोगातील अशी मिळकत असून सदर मिळकत मालक यांनी मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची असल्याचे खात्रीशिररित्या सांगून त्यांनी आमचे पक्षकारांबरोबर खरेदीबाबत व्यवहार पक्का केलेला आहे. तथापी सदर मिळकतीचे निर्वेधपणाची खात्री करणेसाठी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सबब उपरोक्त नमुद बिनशेत जमिन मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे जसे गहाण, दान, तारण, लिन, लिज, अन्नवस्त्र, बक्षीसपत्र, मुखत्यारपत्र, जप्ती, भाडेकरू हक्क, बारस, बँक करारनामा, साठेखत, विसारपावती, खरेदीखत, बँक बोजा, तारण, गहाण, जामिनकी, कोर्ट वाद अगर अन्य कोणताही बोजा, हक्क, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध केलेपासून **१५(पंधरा)** दिवसांचे आत आमचे कार्यालयात समक्ष येवून कागदपत्रांसह पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजले जाईल. तसेच मिळकत मालकांना सदर मिळकतींबाबतचे टायटल व्हेरिफिकेशन प्रमाणपत्र आमचे मार्फत अदा करण्यात येईत. मुदतीनंतर तसेच लेखी पुरावा नसलेल्या तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती विधीग्राह्य धरल्या जाणार नाही. तसेच परस्पर पोस्टाने पाठविण्यात आलेल्याविनापुरावा हरकतींचा विचार केला जाणार नाही.

नाशिक
दिनांक २६/०२/२०२५

सही/-
सचिन भाऊसाहेब वराडे
ॲडव्होकेट
बी-१७, पहिला मजला, मेघदुत शॉपींग सेंटर,
हॉटेल प्रियाचे वर, जुने सीबीएस, नाशिक.
मो.नं. ९३७३०५२६७५

पक्षकार
(कोमल वसंत कानकाटे)
(सदर नोटीस प्रसिद्ध करण्यास आमची कुठल्याही प्रकारची हरकत नाही )



**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
मु.पो. शिर्डी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर, पिन कोड ४२३१०९
फोन नं. (०२४२३) २५८५००/२५९१८०/२५९३०२
(Website - www.sai.org.in)
E-Mail-saiashram@sai.org.in,dwarawati@sai.org.in, saidharmshala@sai.org.in

**ई-निविदा सूचना जाहिरात**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डीचे साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विभागातील इमारत व परिसरामध्ये यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे तसेच व्दारावती भक्तनिवास विभागातील इमारत व परिसरामध्ये यांत्रिकीकरणासह हाऊसकिपिंगची कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेसाठी **सन २०२५-२६** या कालावधी करीता ई-निविदा मागविणेत येत आहेत.

१. ई निविदेचे निकष अटी/शर्ती व ई-निविदेचे माहितीसाठी श्री साईबाबा संस्थानचे **www.sai.org.in/tender** या अधिकृत संकेतस्थळावर भेट द्यावी.
२. सदर ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींग साठी दि. २६/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.१७/०३/२०२५ सायं.०५.०० वा पर्यत **www.mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध राहील.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,

आरओसी-2024-25/क्र-5/C६६७१



**मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लि.**
रजि-ऑफिस : मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी रोड, परळ एस.टी. डेपो समोर, प्रभादेवी, मुंबई ४०००२५,
सीएस : ८२९११८८९८९८, बेबसाईट : www.motilaloswalhf.com ईमेल : Email : hfquery@motilaloswal.com

**ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)**
(सुरक्षित व्याज (सक्त वसुली) नियम २००२ च्या ८ (१) प्रमाणे)

ज्या अर्थी खाली सही करणार प्राधिकृत अधिकारी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लि. (पूर्वी ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड) यांनी **SARFAESI** कायदा २००२ (२००२ चा ५४) व सुरक्षित व्याज (सक्त वसुली) नियम २००२ च्या कलम १३ (१२) नियम ३ सह प्राप्त अधिकारानुसार खालील कर्जदारांना त्या तारखाप्रमाणे व त्यामध्ये उल्लेखिलेल्या रकमेचा भरणा करणेकामी मागणी सूचना (डिमांड नोटीस) मिळाल्यापासून ६० दिवसाच्या मुदतीत भरण्याची मागणी केलेली आहे.

खाली उल्लेखिलेल्या कर्जदारांनी ती रक्कम भरणेस कसूर केल्यामुळे या व्दारे कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, खाली सही करणार यांनी वर्णन केलेल्या मालमत्तेचा उपकलम (४) कलम १३ नियम ८ प्रमाणे सुरक्षित व्याज सक्त वसुली नियम २००२ प्रमाणे दिलेल्या तारखेपासून ताबा घेतलेला आहे.

| अ.क्र. | कर्जदार क्र/कर्जदारांचे नांव/सहकर्जदार/जामीनदारांचे नाव | मागणी सूचना दिनांक व येणे रक्कम | ताबा घेण्याची तारीख | मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|---|
| १) | LXNAS00315-160016079<br>कर्जदार: वसंत उत्तम कुदळे<br>सहकर्जदार: रामभाऊ उत्तमराव कुदळे | ३१-१०-२०१७<br>रु. २१५४२७८/- | २१-०२-२०२५ | फ्लॅट क्र.०४, पहिला मजला, शुभलाभ अपार्टमेंट, एसएसडीनगर अपार्टमेंट मागे, दिंडोरी, हिरावाडी, पंचवटी, नाशिक-४२२००३, नाशिक, महाराष्ट्र, भारत. |
| २) | LXNAS00315-160016090<br>कर्जदार: पांडुरंग माधवराव माळी<br>सहकर्जदार: कल्पना पांडुरंग माळी | २६-०३-२०१९<br>रु. १८२६१६५/- | २२-०२-२०२५ | फ्लॅट क्र.१०, दुर्वांकुर अपार्टमेंट, मेट्रो झोन, पाथर्डी शिवार, सर्व्हे नं.३३१/१ बी/१/२१, प्लॉट नं.२४, मेट्रो झोन कंपाऊंडजवळ, नाशिक- ४२२००९, महाराष्ट्र. |

कर्जदारांना विशेषत: व सर्वसामान्य जनतेस याव्दारे सावध करण्यात येते की, या मालमत्ता संबंधी कोणताही व्यवहार करू नये. तसे केल्यास तो मोतीलाल ओसवाल होम फायनान्सच्या वरील देय रक्कम व त्यावरील व्याजासह बांधील राहील. कर्जदारांचे कायद्याच्या उपकलम (८) कलम १३ कडे रक्कम परतफेडीच्या व मालमत्ता सोडविण्याच्या मुदतीकडे लक्ष वेधण्यात येत आहे.


स्थळ : महाराष्ट्र
दिनांक : २६/०२/२०२५
भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.
सही/- प्राधिकृत अधिकारी
मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लि.

# गोखले फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद उत्साहात

**नाशिक : गोखले एज्युकेशन सोसायटी संचलित सर डॉ. मो. स. गोसावी औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय व संशोधन तसेच ए.पी.टी. आय. केंद्रीय शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.**

परिषदेचा विषय फार्मास्युटिकल इंटेल लेक्टल प्रॉपर्टी नेक्सस : इंनोवाशन, रेग्युलेशन अँड फुचर स्ट्रॅटेजिस' हा आहे. जागतिक औषध उद्योगातील स्पर्धा ही उत्पादनाच्या ज्ञानापेक्षा वैज्ञानिक ज्ञानावर अवलंबून असते आणि कंपनीचे यश मुख्यत्वे तिच्या संशोधन आणि विकास प्रयत्नांवर अवलंबून असते. म्हणूनच औषधनिर्माणक्षेत्रात बौद्धिक संपदेचे विविध आयाम अभ्यासणे हे परिषदेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

सदर परिषद कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वी. अमृतकार यांनी परिषदेच्या विषयाशी ओळख करून दिली. नीलेश पाटील (सहाय्यक नियंत्रक, पेटंट व डिजाइन, ट्रेडमार्क) महाराष्ट्र शासन, मुंबई हे प्रमुख



पाहुणे असून, डॉ. कृष्णा रामलिंगम अय्यर (विभागप्रमुख व प्राध्यापक, फार्मास्युटिकल केमिस्ट्री) बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी, कलिना सांताक्रूझ, मुंबई व श्री. सहस्त्ररश्मी पुंड हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. पहिल्या दिवसाच्या प्रथम सत्रात नीलेश पाटील यांनी पेटंट दृष्टिकोनातून फार्मास्युटिकल शोधांचे परिणाम यावर सविस्तर चर्चा केली. सर्वप्रथम त्यांनी विद्यार्थ्यांना पेटंट फाइलिंगच्या मूलभूत गोष्टींबद्दल शिक्षण देण्याशिवाय फार्मसीमध्ये काय करावे? याबद्दल आपापले मत स्पष्ट करण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी करिअरबाबत थोडे गांभीर्याने विचार करण्यास सांगितले. त्याच बरोबर त्यांनी पेटंट मसुदा तयार करण्यावर सविस्तर मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले की, पेटंट मसुदा तयार केल्याने शोधाचे संपूर्ण ज्ञान, तांत्रिक विषय, विविध कायद्यांचे सखोल ज्ञान, शोधाचे तपशीलवार वर्णन आणि सहयोगी आकडेवारी/रेखाचित्रे यांसारख्या विविध बाबींचा समावेश आहे. महाविद्यालयातील बौद्धिक संपदा अधिकार तज्ज्ञ डॉ. रावसाहेब घेगडे यांनी सदर सत्राचे अध्यक्षस्थान भूषविले. दुसऱ्या सत्रात श्री. सहस्त्ररश्मी पुंड हे प्रमुख व्याख्याते होते. त्यांनी पेटंट कमाई-उत्पन्नाचे उत्पन्न किंवा पेटंट्समधून सामरिक फायदा यावर आपले मत व्यक्त केले. पेटंट कमाई पेटंटमधून आर्थिक मूल्य काढण्यावर लक्ष केंद्रित करते, पेटंट व्यापारीकरणाने नाविन्यपूर्ण उत्पादने किंवा सेवांचा विकास आणि बाजारपेठ करण्यासाठी पेटंट तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यावर भर दिला आहे, असेही ते म्हणाले. अतिशय नावीन्यपूर्ण उदाहरणांसह त्यांनी सदर बाब श्रोत्यांना पटवून दिली.डॉ. शिल्पा हारक यांनी सदर सत्राचे अध्यक्षस्थान भूषविले होते.

## किशोर सूर्यवंशी मेमोरियल ट्रॉफी आंतरतालुका क्रिकेट स्पर्धा

**नाशिक :** राजेंद्र सूर्यवंशी यांच्या सहकार्याने व नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित किशोर सूर्यवंशी मेमोरियल ट्रॉफी आंतर तालुका क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ गुरुवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान, गोल्फ क्लब येथे होणार आहे. या किशोर सूर्यवंशी मेमोरियल ट्रॉफी स्पर्धेचे हे सलग अकरा वे वर्ष आहे. या टी-ट्वेंटी सामन्यांच्या स्पर्धेमुळे नाशिक जिल्ह्यातील तालुक्यातील खेळाडूंना जिल्हास्तरावर आपल्या कामगिरीचे प्रदर्शन करण्याची संधी मिळते. खास या स्पर्धेसाठी नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेच्या विविध निवड समिती सदस्यांनी जिल्ह्याच्या सर्व १५ तालुक्यातील प्रतिनिधी च्या माध्यमातून निवडीची प्रक्रिया पूर्ण करून प्रत्येक तालुक्याचा अंतिम संघ निवडला. जिल्ह्यातील सर्व १५ तालुक्यांनी या स्पर्धेत भाग घेतला आहे.

# तोरणेश्वर पुरातन महादेव मंदिराचा आज लोकार्पण सोहळा आणि भव्य मिरवणूक

**उपनगर : वार्ताहर**

**नाशिक - पुणे रोडवरील छत्रपती शिवाजी महाराजनगर येथील श्री तोरणेश्वर पुरातन महादेव मंदिराचा भव्य लोकार्पण सोहळा तसेच महाशिवरात्री उत्सवानिमित्त बुधवार दि.२६ फेब्रुवारीला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शिवम पाटील यांनी दिली.**

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार हेमंत गोडसे, आ. देवयानी फरांदे, उपनगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता अभिजीत शेलार, कार्यकारी अभियंता उदय पालवे, शाखा अभियंता शरद सोनवणे आदी उपस्थित राहतील. बुधवारी सायंकाळी ४.३० वाजता पालखी मिरवणूक निघणार असून, विविध कलापथक यात आपली



कला सादर करतील. हरियाणातील अघोरी साधू, शिवतांडव कलापथक, शंभूनाद ढोलपथक, अनंत विजय शंखनाद पथक, ट्रिपल हिंदकेसरी गणू घोड्यावाले समाधानशेठ भोर तसेच महाआरती मनमोहक भव्य फटाक्यांची आतषबाजी ही या कार्यक्रमाची वैशिष्ट्ये आहेत. दिवसभर महाप्रसादाचे वाटपही होणार आहे.

जास्तीत जास्त नागरिकांनी मिरवणुकीत सहभागी व्हावेत व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही शिवम पाटील यांनी केले.

# उंटवाडी येथील श्री म्हसोबा महाराज यात्रा कमिटीतर्फे कार्यक्रमांचे आयोजन

**सिडको : विशेष प्रतिनिधी उंटवाडी येथील अतिप्राचीन श्री म्हसोबा महाराज यात्रा कमिटीच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त अतिप्राचीन श्री गणपती महादेव मंदिरात आज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे अतिप्राचीन श्री म्हसोबा महाराज यात्रा कमेटीचे अध्यक्ष फकिरराव तिडके यांनी सांगितले.**

उंटवाडी येथील नंदिनी नदीच्या तीरावर असलेल्या महाकाय वटवृक्षाच्या शीतल छायेत विराजमान झालेल्या अतिप्राचीन श्री म्हसोबा महाराज देवस्थान आहे. या देवस्थानाच्या कार्यकारिणीच्या वतीने म्हसोबा महाराजांचा यात्रोत्सव साजरा केली जातो यांसह वर्षभर विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यकर्म ही या देवस्थान समितीच्या वतीने केले जातात. यावर्षी देखील महाशिवरात्रीचे औचित्य साधत अतिप्राचीन श्री गणपती महादेव मंदिरात आज पहाटे ५ वाजता श्री गणपती महादेव मंदिरात विश्वस्तांच्या हस्ते जलाभिषेक, दुग्धाभिषेक, रुद्रभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर मंदिराच्या प्रांगणात दिवसभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे तसेच महाशिवरात्रीनिमित्ताने मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना खिचडी वाटप करण्यात येणार असून, या कार्यक्रमात शिवभक्तांनी सहभागी होण्याचे आवाहन अतिप्राचीन श्री म्हसोबा महाराज यात्रा कमिटीचे पदाधिकारी मधुकर तिडके, दत्ता पाटील, सदाशिव नाईक, रामचंद्र तिडके, विलास जगताप, बाळासाहेब तिडके, आण्णा पाटील, राजेश गाढवे, जगन्नाथ तिडके, मनोहर तिडके, संतोष कोठावळे यांच्यासह शिवभक्त राजेश पाटील, ज्ञानेश्वर फड, सुरेश उबाळे आदींनी केले आहे.

पान नं. १ वरून...

## महाराष्ट्र विधिमंडळ समित्यांची घोषणा

पुनर्वसन केलं जाणार आहे. सोबतच ज्येष्ठतेनुसार समित्यांचे वाटप झाल्याची ही माहिती सूत्रांनी दिली आहे. पुढे आलेल्या माहितीनुसार, भाजपच्या वाट्याला ११ समित्या, तर शिवसेनेच्या वाटेला ६ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाटेला ५ समित्यांच्या सदस्यांची नियुक्ती होणार आहे.

## महापालिका निवडणुका मार्चला सुनावणी

झाली नाही. पुढील सुनावणी २५ फेब्रुवारी म्हणजे आज होती. पण आजही सुनावणी झाली नाही. त्यामुळे या याचिकेवर आता ४ मार्च रोजी सुनावणी होणार आहे.

## सरकारी कर्मचाऱ्यांची होळी आधीच दिवाळी

७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे, केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ३ टक्के वाढ होणार आहे. परंतु, त्यापूर्वीच महाराष्ट्र सरकारने राज्य कर्मचाऱ्यांना आनंदाची बातमी दिली आहे. राज्य सरकारी कर्मचारी आणि इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न राज्य सरकारच्या विचाराधीन होता. राज्य सरकारच्या २५ फेब्रुवारीच्या निर्णयानुसार १ जुलै, २०२४ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ५० टक्क्यांवरुन ५३ टक्के करण्यात आला आहे. या महागाई भत्ता वाढ १ जुलै २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीतील थकबाकीसह माहे फेब्रुवारी २०२५ च्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावा,असे आदेश देण्यात आले आहेत.

## दंगलप्रकरणात सज्जन कुमार यांना जन्मठेप

राजधानी दिल्लीत शिखांविरोधात मोठ्या प्रमाणात हिंसाचार उफाळला. या हिंसाचारात शीख समाजातील लोक आणि त्यांच्या मालमत्तेला लक्ष्य करण्यात आले होते. सज्जन कुमार हे काँग्रेसचे माजी खासदार आहेत. ते तीनवेळा काँग्रेसच्या तिकिटावर लोकसभेत निवडून गेलेले आहेत. सज्जन कुमार यांनी १९७७ मध्ये आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत ते पहिलांदा दिल्लीतून खासदार म्हणून निवडून आले. अत्यंत कमी कालावधीतच त्यांनी काँग्रेसचे दिवंगत नेते संजय गांधी यांचा विश्वास संपादित केला होता. शीख अंगरक्षकांनी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या केल्यानंतर सज्जन कुमार यांनी शीखांविरोधात दंगल भडकवण्याचे काम केले, असा त्यांच्यावर आरोप आहे.

## जयंत पाटील-बावनकुळेंची भेट

मी माझ्या मतदारसंघातले प्रश्न घेऊन त्यांना भेटलो. असं जयंत पाटील यांनी स्पष्ट केलं.राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यापासून जयंत पाटील यांनी शरद पवारांची साथ सोडलेली नाही. मात्र विधानसभा निवडणूक झाल्यापासून शरद पवारांच्या पक्षातले नेते फुटतील आणि महायुतीत जातील अशी शक्यता वर्तवली जाते आहे. मात्र जयंत पाटील यांनी आमची भेट राजकीय वगैरे काहीही नव्हती. त्यामुळे सोमवारपासून सुरु झालेल्या राजकीय चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.

## कोकाटे यांच्या शिक्षेवरील निकाल राखीव

केल्याप्रकरणी दोन वर्षांची शिक्षा ठोठावली होती. या निर्णयाला कोकाटे यांना आव्हान देत शिक्षा स्थगितीसाठी अर्ज दाखल केला होता. त्या अर्जावर मंगळवारी सुनावणी पार पडली. न्या.जीवने यांनी निर्णय राखीव ठेवला. यावरील निकाल आता १ मार्चला दिला जाईल

## मद्यधोरणात २००२ कोटी बुडाले

अहवालात करण्यात आला आहे. मद्य धोरणाच्या अंमलबजावणीमुळे २००२ कोटी रुपयांचं नुकसान झाल्याचं कॅगच्या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी हा अहवाल दिल्ली विधानसभेत काल सादर केला. मद्य धोरणामध्ये पूर्वी एका व्यक्तीला एक परवाना मिळत असे. मात्र, नव्या धोरणात एका व्यक्तीला एकापेक्षा जास्त परवाने मिळू शकत होते. तसेच आप सरकारच्या चुकीच्या निर्णयांमुळे दिल्ली सरकारचे असे नुकसान झाल्याचे अहवालात म्हटले आहे. कॅगच्या अहवालात असे म्हटले आहे की, झोनल परवाने जारी करण्यात शिथिलता दिल्यामुळे सरकारचे अंदाजे ९४० कोटी रुपयांचे नुकसान झाले. दिल्ली विधानसभेत गदारोळ करणाऱ्या जुबेर अहमद, वीरेंद्र सिंह कादियान यांच्यासह विरोधी पक्ष नेत्या आतिशी अशा एकूण १२ आमदारांचं एक दिवसासाठी निलंबन करण्यात आलं आहे. दिल्ली विधानसभेत आज कॅगचा अहवाल सादर करण्यात आला. या अहवालात शीशमहलच्या दुरुस्ती आणि देखभाल खर्चाचे तसंच नुतनीकरणाच्या खर्चाचे तपशील आहेत. ज्यावरुन कॅगने आधीच्या सरकारला झापलं आहे. त्यावरुन 'आप'च्या आमदारांनी हंगामा केला.

## छ. संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत पुरस्कार जाहीर

महाराज राज्य प्रेरणा गीत पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. २ लाख रुपये रोख रक्कम व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असेल. छत्रपती संभाजी महाराज हे एक उत्तम साहित्यिक आणि संस्कृतचे उत्तम जाणकार होते. त्यांनी संस्कृत भाषेत 'बुधभुषण' हा ग्रंथ लिहिला होता. तर 'नायिकाभेद', 'नखशीख' आणि 'सातसतक' हे ब्रज भाषेतले ग्रंथ लिहिले होते.

## ओएसडीने ५ लाख मागितले : अमोल मिटकरी

मंत्री संदिपान भूमरेंच्या ओएसडीसंदर्भात आपणास हा अनुभव आल्याचे आमदार मिटकरी यांनी सांगितले. मंत्र्यांच्या ओएसडी आणि स्वीय सहाय्यकांसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या रोखठोक भूमिकेचं मिटकरी यांच्याकडून स्वागत करण्यात आलं आहे. यासंदर्भात, अमोल मिटकरी यांनी मोठा दावा केला. आधीच्या शिंदे सरकारमधील रोजगार हमी विभागाच्या एका ओएसडी संदर्भात हा अनुभव आल्याचे त्यांनी म्हटले.

## अंजली दमानियांचा सरकारवर निशाणा

माणूस असणं गुन्हा आहे. तुम्ही मंत्री संत्री असाल तर सगळी यंत्रणा कामाला लागते. तुम्ही साधे सरपंच असाल तर तुमच्या परिवारला न्याय मागण्यासाठी अन्नत्याग आंदोलन करावे लागते.

## मस्साजोगमध्ये ग्रामस्थांचे अन्नत्याग आंदोलन

यावेळी केला आहे. हत्या झाली आहे, तुम्ही म्हणता एकालाही सोडणार नाही, तुम्ही नेमके कोणाला धरलं? ते आधी आम्हाला सांगा, जे अटक झाले आहेत. ते स्वत:हून आले आहेत, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. ते पुढे बोलताना म्हणाले की, तुमचे सरकार असूनही कुटुंबीयांना उपोषणाला बसण्याची वेळ येतीये ही गंभीर बाब आहे. तुम्ही प्रत्येक वेळेस गोड बोलून देशमुख कुटुंबीयांना वेठीस धरू शकत नाही. तुमच्या राजकीय हेतूसाठी देशमुख कुटुंबियांचा दुसऱ्यांदा बळी घेऊ नका, अजूनही चाटेचा मोबाइल सापडला नाही, असे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांनी दिलेले आश्वासन पाळले असते तर बीडचे अर्धे जेल भरले असते. महाराष्ट्रातील पहिले पीडित कुटुंब आहे, ज्यांनी न्यायासाठी दुसऱ्याचे उंबरठे झिजवले. सरकारने चुका केल्या, तुम्ही न्याय देऊ शकत नाही, असेही यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

## के.बी.एच. हायस्कूल येथे स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी साजरी

गिरणारे : येथील म.वि.प्र संचलित के.बी.एच. हायस्कूल येथे स्वातंत्र्यवीर सावरकरांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचेअध्यक्ष स्थान विद्यालयातील संगीत शिक्षक हेमंत संगमनेर यांनी भूषविले. याप्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापिका सौ. शरयू भामरे,पर्यवेक्षिका श्रीमती विमल रायते उपस्थित होत्या. हेमंत संगमनेरे यांच्या हस्ते सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थी मनोगत अथर्व कसबे या विद्यार्थ्याने व्यक्त केले.अध्यक्षीय मनोगतातून मार्गदर्शन करताना हेमंत संगमनेरे यांनी इंग्रजांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर देशद्रोहाचा ठपका ठेवून अंदमान निकोबार बेटावरती असलेल्या तुरुंगात डांबून ठेवले.त्यावेळी समुद्राला पाहून सावरकर यांना मातृभूमीची आठवण झाली. त्यांनी तुरुंगातील भिंतीवरती ने मजसी ने परत मातृभूमीला ही कविता लिहुन मातृभूमी बद्दलचे नितांत प्रेम व्यक्त केले.याच कवितेचे गायन विद्यार्थ्यांना करून दाखविले. सूत्रसंचालन कु.श्रद्धा पवार या विद्यार्थिनीने केले.

# मिनी गटासाठी नाशिक जिल्हा कॅरम स्पर्धा आणि निवड चाचणीचे आयोजन

**नाशिक :** जिल्हा कॅरम असोसिएशनच्या वतीने आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या सहकार्याने उद्या नाशिककच्या विभागीय क्रीडा संकुल, हिरवाडी, पंचवटी येथील कॅरम हॉलमध्ये मिनी गटांच्या खेळाडूंसाठी जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा आणि निवड चंचणीचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत १२ वर्षाआतील आणि १४ वर्षे आतील गट या दोन गटांचा समावेश आहे. या स्पर्धेतील कामगिरीच्या आधारे जिल्हा संघासाठी खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे.

हे निवड झालेले खेळाडू दिनांक ९ मार्च, २०२५ रोजी मुंबई येथे आयोजित ५८ व्या महाराष्ट्र राज्य कॅरम स्पर्धेत नाशिकचे प्रतिनिधित्व करतील.


**जाहीर नोटीस** दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगांव ता. नांदगांव जि.नाशिक.

दिवाणी किरकोळ अर्ज-१२/२०२५ नि.क्र.०६

**१. गणेश गोरख सूर्यवंशी, २. रेणुका प्रवीण पाटील**
रा. आमोदे पो. बोराळे, ता. नांदगांव जि. नाशिक
**अर्जदार**

**वि.**

**कोणीही नाही** **सा. वाले**

या जाहीरनोटीसव्दारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी उक्त नमूद अर्जदार नं.१ व २ ची आई नामे **सरिता गोरख सूर्यवंशी** यांचे **दि.१३/०१/२०२५** रोजी निधन झाले आहे. त्यांचे पती नामे **गोरख उर्फ गोरखनाथ तंगा सूर्यवंशी** यांचे देखील **दि.०६/०३/२०२५** रोजी निधन झाले आहे. **सरिता गोरख सूर्यवंशी** यांचे मृत्यू पश्चात अर्जदार नं. १ व २ हे मयताचे कायदेशिर वारस असल्याचे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २ प्रमाणे अर्जदार यांनी कायदेशिर वारस असलेबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी उक्त अर्ज दाखल केला आहे. सदर मयत व्यक्ती हे अर्जदार क्र.१ व २ ची आई आहे. उक्त मयत **सरिता गोरख सूर्यवंशी** यांचे नावे मालकीची नमुद अर्जातील नि.क्र.१ वर दिलेल्या मिळकतीचे वर्णन या शिर्षाखालील- **अ. मौजे आमोदे** येथील मिळकत **गट नं. १५०** यांसी एकूण **क्षेत्र ० हे १० आर** व **आकार .०रू.४५ पैसे** अशी मिळकत आहे.

उक्त मिळकतीस मयताचे पश्चात उक्त अर्जदार हे कायदेशिर वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे. त्याअर्थी अर्जदारांचे अर्जातील म्हणण्याप्रमाणे मयताचे अर्जदार हे कायदेशिर वारस आहेत अगर अन्य इतरही मयतास कायदेशिर वारस आहेत किंवा अर्जदार वारस दाखला मिळण्यास पात्र नाही, असा ज्या कोणाचाही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी स्वतःकडील मुळ कागदोपत्री पुराव्यासह **दि.०३/०४/२०२५** रोजी किंवा सदर जाहीरनोटीस प्रसिध्द झालेपासून **३०** दिवसांचे आत स्वतः किंवा अधिकृत प्रतिनीधी अथवा प्राधिकृत अधिकारी अथवा वकीला मार्फत या न्यायालयात समक्ष सकाळी **ठिक १०.३०** वाजता हजर राहुन आपले लेखी म्हणणे मांडुन आक्षेप नोंदवावा, मुदतीत कोणताही आक्षेप/हरकत प्राप्त न झाल्यास सदरहू न्यायालय सदरहू अर्जदाराचे मागणी प्रमाणे पुढील कायदेशीर कामकाज, देईल याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस. **दि.१८/२/२०२५** रोजी मा.न्यायालयाचे आदेशावरुन आमचे सही व न्यायालयाचे शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी लिपीक** (शिक्का) **सहायक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय नांदगाव** **दिवाणी व फौजदारी न्यायालय नांदगाव**



**ग्रामपंचायत देवडोंगरा ता. त्र्यंबकेश्वर जि. नाशिक**

जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२४-२५ शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासननिर्णया नुसार) ग्रामपंचायत देवडोंगरा ता. त्र्यंबकेश्वर जि. नाशिक येथे होणाऱ्या विविध विकास कामासाठी लिफाफा बंद दर पत्रक द्वारे निविदा मागवत आहे. सदर च्या तांत्रिक लिफाफा मध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र, पॅन. जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफा मध्ये दर पत्रक सादर करण्यात यावे. सदर चा लिफाफा २६/०२/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक ०४/०२/२०२५ सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदर चे लिफाफे दिनांक ०५/०३/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवशयक आहे अन्यथा त्या नंतर सदर च्या निविदा संबधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत देवडोंगरा ता. त्र्यंबकेश्वर जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे. व अंदाजपत्रके ग्रामपंचायत मध्ये बघण्यास मिळतील. व तसेच कमी दराने आलेल्या निविदाकारकास कामाच्या १% डीडी देणे बंधनकारक असेल.

. NAME OF WORK:- 1) CONSTRUTING INTERNAL CEMENT CONCRETE ROAD AT KAS DEVDONGRA TAL TRIMBAKESHAR DIST NASHIK Est. Amt. 5,00,000/- 2) CONSTRUTING INTERNAL CEMENT CONCRETE ROAD AT DEVDONGRA TAL TRIMBAKESHAR DIST NASHIK Est. Amt. 5,00,000/- 3) CONSTRUTING INTERNAL CEMENT CONCRETE ROAD AT DEVDONGRA TAL TRIMBAKESHAR DIST NASHIK Est. Amt. 7,00,000/- 4) PROVIDING PAVER BLOCK FLOORING AT DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 2,00,000/- 5)REPAIRS COMPOUND WALL TO Z.P. SACHOOL DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 435706/- 6)REPAIRS TO ANGANWADI NO -3 AT DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 342067/- 7) REPAIRS TOILET BLOCK TO Z.P. SCHOOL DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 425079/- 8) PROVIDING CHAIN LINK FAINCING AT ANGANWADI NO-1 AT DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 162019/- 9) PROVIDING FHTC SUPPLY KAMATPADA AT DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 248638/- 10) LIQUID WASTE MANAGEMETN SCHEME 2023-24 VILLAGE GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 299740/- 11) PROVISION OF RAIN WATER HARVESTING SYSTEM FOR GP OFFICE AT DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 69749/- 12) PROVISION OF RAIN WATER HARVESTING SYSTEM FOR GP SCHOOL AT DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 149871/- 13) SOLID WASTE MANAGEMETN SCHEME 2022-23 AT GP DEVDONGRA (UMBARPADA) TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 49812/- 14) SOLID WASTE MANAGEMETN SCHEME 2022-23 AT GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 152356/- 15) LIQUID WASTE MANAGEMETN SCHEME 2023-24 VILLAGE GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 198671/- 16) SOLID WASTE MANAGEMETN SCHEME 2022-23 AT GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 300065/- 17) LIQUID WASTE MANAGEMETN SCHEME 2023-24 AT GP DEVDONGRA (KAMTPADA) TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 299740/- 18) DEEPING OF EXISTING PRODUCTION WELL AT NAGMANI AT DEVDONGRAT TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 149383/- 19) REPAIRING OF UNDERGROUND DRAINAGE WORK AT GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt.499504/- 20)PROVIDING NEW PIPE LINE AT MAHANUBHAV VASTI AT GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 331135/- 21) PROVDING NEW PIPE LINE AT SHRIRAMNAGAR AT GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt.429624/- 22) WATER SUPPLY SCHEME AANGANWADI NO 3 AT GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt.64523/- 23) CONSTRUCTION EXISTING PRODUCTION WELL AT GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 447543/- 24) DEEPING OF EXISTING PRODUCTION WELL AT GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 449772/- 25) PRVISION OF RAIN WATER HARVESTING SYSTEM FOR AANGANWADI AT GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 149871/- 26) AL STEEL COVER FOR PRODUCTION WELL AT HEDPDHA AT GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 115437/- 27) AL STEEL COVER FOR PRODUCTION WELL AT BORVIHIR AT GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST NASHIK Est. Amt. 117110/- 28) REPAIRING OF KATHWADPADHA PRODUCTION WELL AT GP DEVDONGRA TAL TRIMBAKESHWAR DIST Est. Amt. 98715/



**ग्रामपंचायत कार्यालय, विल्होळी, ता. जि. नाशिक**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. १/२०२४-२०२५**

जाहीर ई-निविदा सूचना क्र. ०६/२०२४-२५ (प्रथम प्रसारण)

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत विल्होळी ता. जि. नाशिक येथे **1) Under ground Drainage System at Vilholi Tal Dist Nashik) Under ground Drainage System at Vilholi Tal Dist Nashik** विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांच्याकडून ई-निविदा **2)** लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा शासनाचा **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावरून दि. २५/०२/२०२५ ते ०४/०३/२०२५पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत विल्होळी, ता. जि. नाशिक**



**टायटल व्हेरिफीकेशनसाठी नोटीस**

तमाम लोकांस कळविणेत येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका निफाड, पैकी **मौजे रेडगाव** ग्रामपंचायत शिवारातील शेतजमिन मिळकत **गट नंबर २०६** यांसी **क्षेत्र २ हेक्टर ३८ आर + पो.ख.० हेक्टर ४३ आर** यांसी **आकार १ रूपया ०० पैसे.** यापैकी गटाचे उत्तर बाजूचे **क्षेत्र १ हेक्टर ६४ आर+पो.ख.० हेक्टर २९ आर** ही मिळकत **१) उमा रविंद्र पाटील. २) अंजनाबाई राजाराम वाघमारे. ३) स्नेहल शाम सिन्नरकर. ४) निशा विशाल शिंदे. ५) अंजना राजाराम वाघमारे** सर्व रा. रेडगाव. ता. निफाड. जि. नाशिक. यांचे मालकीची व कब्जावहिवाटीची असल्याचे सांगून,त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना निर्वेध व बोजाविरहीत आहे असे सांगून त्याचे सोबत व्यवहाराची बोलणी करुन व विसाराची रक्कम ही स्वीकारलेली आहे. तथापि, उपरोक्त मिळकतीचे टायटल व्हेरिफीकेशनसाठी ही नोटीस प्रसिध्द करीत आहोत.सबब, उपरोक्त मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीन, लिज, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, हक्क, हितसंबंध, करार-मदार अगर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा अगर हक्क असल्यास अगर कोणाचीही सदर व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून खालील पत्यावर ७ दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. सबब, उपरोक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल यांची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस,

ता. २६/०२/२०२५.

**ॲड. प्रकाश भास्कर बोडके.** ॲडव्होकेट ॲण्ड नोटरी
''श्री'' झेरॉक्स ॲण्ड स्टॅम्पवेंडर, २३ बसवंत मार्केट, पिंपळगाव (ब).
ता. निफाड, जि. नाशिक मो.नं. ९८५०१५६५८८



**ग्रामपंचायत कार्यालय महादेवपूर ता. जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र./२०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत महादेवपूर ता. जि. नाशिक येथे **1) Providing Grill Work To Maruti Mandir At Mahadevpur Tal Dist Nashi** काम करण्याकरिता बंद लिफाफा पध्दतीने नोंदणीकृत पुरवठादाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाचे/साहित्याचे कोरे निविदा संच ग्रामपंचायत कार्यालय, महादेवपूर ता. जि. नाशिक येथे दि. २५/०२/२०२५ ते ०२/०३/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून द्यावेत, निविदासंबधी सर्व माहिती, अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय येथे उपलब्ध आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार सरपंच ग्रामपंचायत महादेवपूर ता. नाशिक यांनी राखून ठेवले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच** **श्री.रंगनाथ संतोष मोरे** **सौ. अंबिका ज्ञानेश्वर पोटिंदे**
**ग्रामपंचायत महादेवपूर** **ग्रामसेवक** **सरपंच**
**ता.जि.नाशिक** **ग्रा.पं.महादेवपूर** **ग्रा.पं.महादेवपूर**



**ग्रामपंचायत ओणे ता.निफाड जि. नाशिक**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र.०२/२०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत ओणे, ता.निफाड येथे १५ वा वित्त आयोग योजना अंतर्गत गावअंतर्गत बचतगट खोली बांधकाम करणे, बचतगट खोली बांधकाम करणे, रस्ता काँक्रीट करणे, रस्ता करणे, दशक्रिया विधी ओटा व काँक्रिटीकरण करणे कामी ई-निविदा दिनांक २४/०२/२०२५ पासून शासनाच्या www.mahatender.gov.in प्रसारित करणयात येत आहे. अधिक माहिती साठी वरील वेबसाईट वर उपलब्ध असून ठेकेदारांनी ई- निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत ओणे. ता.निफाड, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**सही /-ग्रामसेवक** **सही/-सरपंच**
**ग्रामपंचायत ओणे, ता.निफाड जि. नाशिक**



**ग्रामपंचायत मौजे सुकेणे. ता.निफाड जि. नाशिक**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र. ०७ /२०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत मौजे सुकेणे ता.निफाड जि. नाशिक येथे विविध विकास योजने अंतर्गत होणाऱ्या विविध विकास कामांसाठी साहित्य खरेदी करणे साठी ई-निविदा मागवत आहे. ई-निविदा दिनांक २५/०२/२०२५ पासून शासनाच्या www.mahatender.gov.in प्रसारित करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी वरील वेबसाईट वर उपलब्ध असून नोंदणीकृत ठेकेदारांनी ई-निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत मौजे सुकेणे. ता.निफाड, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**सही /- पंचायत अधिकारी** **सही/-सरपंच**
**ग्रामपंचायत मौजे सुकेणे, ता.निफाड जि. नाशिक**



**टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :- अ)** तुकडी जिल्हा परिषद नाशिक पोट तुकडी तालुका पंचायत समिती दिंडोरी पैकी **मौजे वणी** या गावाचे ग्रामपालिका हद्दीतील बिनशेती भुमापन क्रमांक व उपविभाग **३३१/प्लॉट नं. ११३** यांसी क्षेत्र **१.५५ आर चौ.मी. चौ.से.मी** यांसी **आकार रू. १५.५० पैसे** ही मिळकत.....

वरील मिळकतीवर बांधण्यात आलेले घर मिळकत ग्रामपालिका मिळकत **नं. ३७३३ प्लॉट नं. ११३** रस्त्याचे नाव नाशिक **मार्ग गट नं. ३३१,** मिळकतीचे वर्णन खुली बखळ जागा **१५५/०० चौ. मी.** त्यामध्ये १ घर आर. सी. सी बांधकाम ३ रूम किचन, संडास बाथरूम सह लांबी **३०X२५** चौ. फुट **७५०** बाकी खुली बखळ जागा, घराचे क्षेत्र फळ चौ. फुटात **१६६८** यासी चतु:सिमा गावनकाशाप्रमाणे........

वर उल्लेख केलेली मिळकत ही **श्री. दिपक खंडू गांगुर्डे** रा. कसबे वणी, ता. दिंडोरी, जि.नाशिक यांचे मालकी हक्काची, कब्जेवहिवाटीत असून सदरील मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची असलेबाबत खात्री करण्यासाठी सदरची टायटल व्हेरिफिकेशन नोटीस प्रसिध्द केली आहे. सबब उपरोक्त मिळकतीमध्ये कोणाचाही कोणतेही स्वरुपाचा हक्क, अधिकार जसे गहाण, दान, लीन, लीज, अनवस्त्र, जप्ती, जामिन की, कोर्ट वाद इ. स्वरुपाचा हितसंबंध असल्यास अगर मिळकतीबाबत कुठल्याही स्वरुपाचा वाद असल्यास संबंधीतांनी कागदोपत्री पुरावेनिशी नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ **(सात)** दिवसांचे आत आमचे कार्यालयात लेखी हरकती नोंदवाव्यात. सदरच्या मुदतीत हरकत न आल्यास टायटल व्हेरिफिकेशन दाखला मिळकत मालक यांना देण्यात येईल मुदतीनंतर अथवा दैनिक वर्तमानपत्रात परस्पर प्रसिध्द होणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. कळावे, ही जाहीर नोटीस.......

**दिनांक २५/०२/२०२५**

**ॲड. संतोष जनक जाधव**
**बी.एस.एल., एलएल. बी. ऑफीस ॲडव्होकेट चेंबर्स, मार्केट यार्ड गाळा नं. २६, २७ निळवंडी रोड, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक**



# गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

३/५ वर्ष अनुभवी लेडी अकाउंटंट (Tally) पाहिजे. नाशिक बिडिंग, कामत हॉटेलजवळ, द्वारका.
**मो. ९४२२२५८२८६**

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे.
**८२३७३११२११**

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

---

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७ ९७६३७३२४२४**

---

नाशिक स्थित कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता ऑफीसबॉय व साईटवर राहून काम करण्याची तयारी असणारा LMV-TR ड्रायव्हर पाहिजे. ८२३७३११२११

### पाहिजेत

महात्मा नगर (नाशिक) येथे बंगल्यासाठी विवाहित चौकीदार जोडप्याची गरज आहे. माणसाला ड्रायव्हिंगचा अनुभव असल्यास मदत होईल. स्त्रीला घरकामात मदत करावी लागेल. बंगल्याच्या परिसरात राहण्याची सोय केली जाईल. वयोमर्यादा: ४० वर्षांपर्यंत. **९६५७०४९९९१** वर संपर्क साधावा.

---

त्वरित टेलीकॉलर मुली पाहिजेत. शिवाजीनगर, सातपूर- ८४८४८१०५५१/ ८४८४८१०५५३

### ज्योतिष

गायत्री ज्योषित- जन्म कुंडली, कुंडली मिलान, कुंडलीवरून भविष्य कथन, खासगी त्रासावर उपाय. **संपर्क-** ज्योतिषाचार्य, कमलेश शास्त्री, इंद्रकुंड, नाशिक. ९१५६१७८९६९

### वधू पाहिजे

**मराठा वधू पाहिजे, वर वय २८, उंची ५.६ इंच, रंग गोरा, नोकरी, संपर्क- ९३५९८०७२३१**

### विकणे आहे

शरद पवार मार्केट यार्डच्या मागे १ बीएचके फ्लॅट विकणे आहे. लिफ्टची सोय. संपर्क- ८००७७९९१०३

### पाहिजेत

बा.ब.बहुउद्देशीय संस्था संचलित, डिस्कव्हरी पब्लिक स्कूल, वडाळीभोई, खंडेराव मंदिराजवळ, ता.चांदवड, जि.नाशिक
**मुख्याध्यापक-** १ पद, **शिक्षक-** ९ पद, **सफाई कामगार-**१ पद, सिक्युरिटी गार्ड-१ पद, **वाहनचालक (वाहनासह)**-५ पद
**मुलाखत- वरील स्थळी**
दिनांक २१/०२/२०२५
ते दिनांक २५/०२/२०२५.
वेळ स.११ ते ४
**संपर्क- ९४२२२५३०८४/ ९३७०४२२१२२**

### ब्राह्मण वधू पाहिजे

**अजिंक्य अविनाश वैद्य**
वय २९, उंची ६.१ भारद्वाज, ऋग्वेदी, गहू, देव, मकर, श्रवण, अंत्य,दुसरे A+,शिक्षण BSC -CHEM सरकारी, पोस्टमन, राहुरी, जिल्हा अहमदनगर, वा. उत्पन्न. ५२५०००/-, अपेक्षा -पदवीधर, सुसंस्कृत, मनमिळाऊ, पत्ता- अविनाश रामचंद्र वैद्य, दत्तनगर, बेलापूर रोड, कोल्हार बु, तालुका-राहाता, अहमदनगर-४१३७१० **मोबाईल व्हाट्सअप -९५५२२७७०९७ कॉन्टॅक्ट ९५११६८०९९८.**

### नावात बदल

कळविण्यात येते की, माझे लग्नापूर्वीचे नाव कुमारी सोनी वाळलूजी फुलझेले असून, आता विवाहानंतर ते सौ. पुष्पा नामदेव सोनुले असे झाले आहे. पत्ता : नालंदा बंगला, सर्व्हे नं. २५०/३/२८, प्लॉट नं. २७, गोपाळ नगर, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२००३ येथे माझे वास्तव्य आहे. तरी कुमारी सोनी वाळलूजी फुलझेले व सौ. पुष्पा नामदेव सोनुले या दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहेत. या संदर्भात मी नाशिक येथे प्रतिज्ञापत्र नोटरी केले आहे.

### नावात बदल

सान्वी कुलकर्णी
जन्मदाखल्यावरील मातेचे नाव अदिती सोहन कुलकर्णी असले तरी सर्व कागदपत्रांवर **अदिती अवधुत केळकर** हेच नाव असल्याने **अदिती केळकर आणि अदिती कुलकर्णी** या दोन्ही व्यक्ती एकच असून, **अदिती केळकर** याच नावाने सर्व कागदपत्रे ग्राहय धरण्यात यावेत.

### भाड्याने देणे-घेणे

वेअर हाऊस/गोडावून साठी मुंडेगाव (इगतपुरी) येथे जागा भाड्याने देणे आहे.
**संपर्क- ९८८१२५१३३८**

**जाहीरात छोटी किमया मोठी**

# उपनगरला भांगेचा कारखाना उद्ध्वस्त

## २८० किलो भांग जप्त, दोन जणांना अटक

**नाशिक : प्रतिनिधी**

**भांगेच्या गोळ्या तयार करणारा कारखाना अमली पदार्थ विरोधी पथकाने उद्ध्वस्त केला. २८० किलो ३९६ ग्रॅम वजनाचा भांग पोलिसांनी जप्त केला.**

अमली पदार्थ विरोधी पथकाच्या प्रभारी वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुशीला कोल्हे यांना गोपनीय माहिती मिळाली की, कलावैभव अपार्टमेंट, फ्लॅट नं. १३, गायत्रीनगर, आंबेडकरवाडी, उपनगर, नाशिक येथे दीपक किसन वाघ (४२, रा. खोली क्र. ३३, दत्तनगर, पेठ रोड) व सागर मधुकर गरड (३२, रा. १७, आराध्य अपार्टमेंट, सिद्धार्थ हॉटेलसमोर, आंबेडकरवाडी, नाशिक) हे स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशीररीत्या भांग हा मादक पदार्थ बाळगून त्याची साठवणूक करून त्यांच्याकडे असलेल्या गाइडिंग मशीनद्वारे भांगेच्या गोळ्या तयार करून त्याची काल सकाळी ७ वाजेचे सुमारास नाशिक शहरात विक्री करणार असल्याची माहिती मिळाल्याने या आरोपींना पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी कौशल्य वापरून शिताफीने आरोपींना ते भांगेच्या गोळ्या तयार करत असलेल्या नमूद ठिकाणाहून पकडून त्यांच्याकडून २८० किलो ३९६ ग्रॅम वजनाचा भांग हा मादक पदार्थ त्याची किंमत २,८०,३९६ रुपये किमतीचा व भांगेच्या गोळ्या तयार करण्यासाठी वापरत असलेले इतर साहित्य साधने, भांग दळण्यासाठी वापरत असलेल्या दोन गिरण्या, गॅस शेगड्या, पातेले, पॅकिंग केलेल्या भांगेच्या गोळ्या असा ३,९१,८०२ रुपये असा एकूण ६,७२,१९८ /- रु. किमतीचा मद्देमाल जप्त करण्यात आला आहे. भांगेच्या गोळ्या तयार करून त्यास पुष्टी मेवावटी असे नाव देऊन विक्री करत असल्याचे निष्पन्न झाल्याने नमूद आरोपींविरुद्ध उपनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगिरी आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त प्रशांत बच्छाव, सहायक पोलिस आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली सुशीला कोल्हे, सहायक पोलिस निरीक्षक सचिन चौधरी, विशाल पाटील, रंजन बेंडाळे, संजय ताजणे, देवकिसन गायकर, हवालदार बळवंत कोल्हे, गणेश वडजे, अनिरुद्ध येवले, योगेश सानप, अविनाश फुलपगारे, बाळासाहेब नांद्रे, चंद्रकांत बागडे, अर्चना भड यांनी ही कामगिरी पार पडली.



# महाशिवरात्र उत्सव हळदी, मेहंदीने साजरा

**त्र्यंबकेश्वर : वार्ताहर**

**श्री त्र्यंबकेश्वर मंदिर विश्वस्तांनी महाशिवरात्र उत्सवाच्या निमित्ताने शिव -पार्वती विवाह संकल्पना राबवली आहे. सोमवारी मेहंदी, मंगळवारी हळद आणि बुधवारी लग्न असा सोहळा संपन्न होत आहे.**

गर्भगृह, सभामंडप, प्रवेशद्वार यांची सजावट त्या सोहळ्याला अनुकूल अशी करण्यात येत आहे. विश्वस्त रूपाली पंकज भुतडा यांच्या संकल्पनेतून हा सोहळा करण्यात आला आहे. मंगळवारी दुपारी नित्य प्रदोष पूजेत नित्य प्रदोष पुष्प पूजक उल्हास आराधी यांनी शिवमुखवट्याला हळदीचा शृंगार केला. सायंकाळी सात वाजेच्या सुमारास विश्वस्त रूपाली भुतडा यांनी मंगल वाद्याच्या गजरात हळद आणली. त्यावेळी महिला कर्मचारी हळदीच्या साड्या परिधान करून आलेल्या होत्या.

# बेदरकार पिकअपचालकाची नागरिकासह संरक्षक भिंतीला धडक

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**अंबड लिंक रोड परिसरात असलेल्या रामकृष्णनगरमध्ये सोमवारी रात्री साडेदहाच्या सुमारास एका पिकअपचालकाने बेदरकारपणे वाहन चालवून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणारी घटना एमआयडीसी पोलिस चौकीच्या हद्दीत घडली.**

स्थानिक रहिवासी निवृत्ती लक्ष्मण गोवर्धने (वय ४९, व्यवसाय - ट्रान्स्पोर्ट) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, फिर्यादी आपल्या नातीसह रस्त्याने फिरत असताना, भरत डेरिंगे नावाच्या ओळखीच्या व्यक्तीसोबत गप्पा मारत होते. त्याच वेळी एमएच १५ एचएच ४९८१ क्रमांकाच्या पिकअप वाहनाने मोठ्या वेगाने हॉर्न वाजवत त्यांच्याकडे धाव घेतली. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, चालकाने त्यांना धक्का दिला आणि त्यानंतरही तो वेगातच गाडी चालवत राहिला. त्यावेळी उपस्थित लोकांनी गाडी रोखण्याचा प्रयत्न केला, मात्र चालकाने वाहन त्यांच्या घराच्या संरक्षक भिंतीवर घालून ती भिंत तोडली. यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली.

यावेळी पिकअपचालक मी राहुल आरोटे यांचा माणूस आहे, तुम्हाला माहिती नाही का? असे धमकीवजा शब्द वापरल्याचे फिर्यादीत नमूद आहे. हा प्रकार घडल्यानंतर स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त करत गाडीवर दगडफेक केली. मात्र, चालक घटनास्थळावरून वाहनासह पसार झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर फिर्यादीने एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी संबंधित पिकअपचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सपोनि भंडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

> संबंधितांनी केलेले आरोप पूर्णतः चुकीचे आहेत. राजकीय वर्चस्ववादातून हा सर्व प्रकार घडलेला आहे. माझा आणि या प्रकरणाचा कुठल्याही प्रकारचा संबंध नाही. सदर प्रकरणाबाबत मीच पोलिसांना अगोदर माहिती दिली. मंडळात माझे नाव का घेतले नाही? असा समोरच्यांचा राग होता. मनपा निवडणूक तोंडावर येत असल्यामुळे विरोधक अशा प्रकारे आम्हा दोघा भावांना बदनाम करून खोट्या गुन्ह्यात अडकविण्यासाठी हे सर्व षडयंत्र फिर्यादी आमच्या विरोधात करत आहे.
> **- भागवत आरोटे,** माजी नगरसेवक

# जिल्हा रुग्णालयातील नर्सेसचे काळ्या फिती लावून कामकाज



**नाशिक : प्रतिनिधी**

**जिल्हा शासकीय रुग्णालयातील नर्सेस संघटनेने काल काळ्या फिती लावून कामकाज केले. दोन दिवसांपूर्वी जिल्हा रुग्णालयात एक नर्स इंजेक्शन देत असताना दोन गटांत हाणामारीची घटना घडल्याने नर्स घाबरली होती. त्यामुळे काल सर्व नर्सेसने एकत्र येत रुग्णालयात नर्सेसना जोपर्यंत संरक्षण मिळत नाही तोपर्यंत काळ्या फिती लावून कामकाज करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.**

यासंदर्भात नर्सेस संघटनेच्या अध्यक्षा श्रीमती पूजा पवार, कल्पना पवार यांनी सांगितले की, जिल्हा रुग्णालयात नर्सेसना संरक्षण मिळण्यासाठी कायमस्वरूपी बंदूकधारी सुरक्षारक्षक नियुक्त करण्यात याव्यात. काही व्यक्ती दबाव आणून नर्सेसना त्रास देतात. त्यामुळे नर्सेसनी आम्हाला सुरक्षा पुरवावी, अशी मागणी काल जिल्हा शल्यचिकित्सकांकडे केली. यावर पोलिस आयुक्तांसोबत बैठक घेण्यात येणार असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक चारुदत्त शिंदे यांनी सांगितले.

# उद्योजकांच्या प्रलंबित प्रश्नांचा निपटारा करणार : दीपक पाटील

## निमासह सर्व औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून सत्कार

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशकातील उद्योजकांचे प्रलंबित असलेले प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी आपण कसोशीने प्रयत्न करू. औद्योगिक संघटना तसेच उद्योजकांशी संवाद प्रक्रिया सातत्याने सुरूच राहील. जिल्ह्यातील औद्योगिक शांतता टिकवण्यासाठी आपण सारे हातात हात मिळून काम करूया, असे उद्गार औद्योगिक विकास महामंडळाचे नाशिकचे नूतन प्रादेशिक अधिकारी दीपक पाटील यांनी केले.**



दीर्घकाळापासून हे पद रिक्त होते. ते तातडीने भरावे यासाठी निमाचे नूतन अध्यक्ष आशिष नहार आणि त्यांच्या टीमने उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह यांची भेट घेऊन मंत्रालयात त्याबाबत पाठपुरावा केल्यानंतर तातडीने सूत्रे फिरली व एमआयडीसीच्या नाशिक प्रादेशिक अधिकारीपदाची माळ दीपक पाटील यांच्या गळ्यात पडली. मंगळवारी त्यांनी लगेचच या पदाची सूत्रेही स्वीकारली. यानंतर नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन(निमा), अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन(आयमा), नाईस, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, लघुउद्योग भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी दीपक पाटील यांची उद्योग भवनात भेट घेत त्यांचा सत्कार केला, त्यावेळी पाटील बोलत होते.

उद्योजकांशी निगडित आणि प्रलंबित असलेल्या प्रश्नांचा बारकाईने अभ्यास करून त्याचा तातडीने निपटारा केला जाईल. सर्व औद्योगिक संघटनांच्या कार्यालयांना भेटी देऊन त्यांच्या सर्व समस्या जाणून घेण्याचा आपला मानस राहील. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्या सर्व समस्यांवर मार्ग काढला जाईल, असेही दीपक पाटील पुढे म्हणाले. निमाचे अध्यक्ष आशिष नहार, आयमाचे अध्यक्ष ललित बूब, नाईसचे अध्यक्ष रमेश वैश्य, लघुउद्योग भारतीचे अध्यक्ष निखिल तपाडिया यांनी यावेळी आपापल्या संघटनांचे प्रश्न नूतन प्रादेशिक अधिकाऱ्यांच्या कानावर घातले. जिल्ह्यातील औद्योगिक शांतता टिकविण्यासाठी आमचे आपणास सदैव सहकार्य राहील, अशी ग्वाहीसुद्धा या सर्वांनी चर्चेच्यावेळी दिली. यावेळी निमाचे उपाध्यक्ष किशोर राठी, सचिव राजेंद्र अहिरे, आयमा ॲडव्हायजरी कमिटीचे चेअरमन ज्ञानेश्वर गोपाळे, आयमा माजी अध्यक्ष वरुण तलवार, निमा सहसचिव किरण पाटील, खजिनदार राजेंद्र वडनेरे, आयमा उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे, सचिव प्रमोद वाघ, महाराष्ट्र चेंबरचे राजेंद्र कोठावदे, निमाचे सचिन कंकरेज, वैभव नागशेठिया आदी उद्योजक उपस्थित होते.

## सीटू भवन येथे रेड फ्लॅग डे साजरा

**नाशिक : प्रतिनिधी**

रेड फ्लॅग डेनिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम सीटू भवन येथे साजरा करण्यात आला. यावेळी रेड फ्लॅग डेनिमित्त पक्षाचे राज्य सचिव मंडळ सदस्य सीताराम ठोंबरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पक्षाचे नेते डॉ. डी. एल. कराड यांनी रेड फ्लॅग डेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी संतोष काकडे, संतोष कुलकर्णी, कल्पना शिंदे, मोहन जाधव, राहुल गायकवाड, युवराज पाटील, गौतम कोंगळे, विजया टिक्कल, डॉ. सुधीर फडके, वाचनालयाच्या सुचिता खडसे, निवृत्ती केदार उपस्थित होते.

# पूर्वा केमटेकचे 'मिलांज फळांचा महाराजा' पुरस्कार जाहीर

## बसवंत गार्डनमध्ये 'बसवंत ग्रेप फेस्टिव्हल'चा शुभारंभ

**नाशिक : प्रतिनिधी**

**पूर्वा केमटेक प्रा.लि.तर्फे बसवंत गार्डन, मुखेड रोड, पिंपळगाव बसवंत येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही 'सेवर निसर्गोत्सव' साजरा होत आहे. या उपक्रमांतर्गत 'मिलांज फळांचा महाराजा' या नावाने द्राक्षे, डाळिंबे आणि केळी या फळांचे भव्य प्रदर्शन तसेच स्पर्धा आयोजित केली आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी आपल्या फळपिकांचे नमुने येथे मांडून उत्स्फूर्त सहभाग घेतला आहे.**



प्रदर्शनाचे उद्‍घाटन करताना डॉ. बी. बी. पवार, डॉ. भास्कर गायकवाड, विजय पवार, संजय पवार आदी मान्यवर.

भारतातील पहिले ॲग्री टुरिझम म्हणून नावारूपास आलेल्या बसवंत मधमाशी उद्यान आणि बसवंत गार्डनमध्ये २३ मार्चपर्यंत 'बसवंत ग्रेप फेस्टिव्हल'चेही आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पर्यटकांसाठी ग्रेप हार्वेस्टिंग, ग्रेप पॅकेजिंग, द्राक्षांच्या विविध व्हरायटी, ग्रेप टेस्टिंग अशी अनेक आकर्षणे उपलब्ध आहेत. येथे उत्कृष्ट प्रतीची द्राक्षेही खरेदी करता येणार आहेत. याबरोबरच खाद्यप्रेमींना ग्रेप सिटी मिसळ, सर्जा झुणका भाकर अशा रुचकर पदार्थांचा आस्वाद घेता येईल. महिनाभर चालणाऱ्या या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन 'पूर्वा केमटेक' तसेच 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'चे कार्यकारी संचालक संजय पवार यांनी केले आहे. या स्पर्धेत मिलांज द्राक्ष महाराजा हिरवा गटातील पुरस्कार प्रकाश मोहिते (वडनेर भैरव), रंगीत गटात- रमेश भिकाजी मोरे (शिरसगाव), मिलांज डाळिंब महाराजा पुरस्कार संजय रामचंद्र बंदबडे (नाझरा, ता. सांगोला, जि. सोलापूर) यांना जाहीर झाला. सुधीर पोपट शिंदे (खरतवाडी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर) हे मिलांज बनाना किंग पुरस्काराचे मानकरी ठरले. द्राक्ष हिरवा (गोल) गटात प्रथम- एमआरडीबीएसचे अविनाश चोपडे (तळेगाव), द्वितीय- अशोक रायते (खडकमाळेगाव, ता. निफाड, जि. नाशिक) तर तृतीय पुरस्कार श्यामराव रामभाऊ पानसरे (उंबरखेड, ता. निफाड, जि. नाशिक) यांना जाहीर झाले. द्राक्ष हिरवा (लांब) गटात प्रथम- बापू भाऊसाहेब साळुंके (वडनेर भैरव), द्वितीय- अमोल निवृत्ती आथरे, उंबरखेड, तृतीय पुरस्कार संजय राघू रायते (खडकमाळेगाव) यांना जाहीर झाले. द्राक्ष काळा (गोल) गटात प्रथम पुरस्कार संदीप श्रीराम आथरे (उंबरखेड), द्वितीय सुदर्शन बापूराव जमधडे (मातेरेवाडी) तर तृतीय पुरस्कार चेतन रमेश रसाळ (आहेरगाव) द्राक्ष काळा (लांब) गटात प्रथम चंद्रभान शंकर संधान, (चिंचखेड, ता. दिंडोरी), द्वितीय- रोहिणी दीपक साळुंखे (वडनेर भैरव) तर तृतीय पुरस्कार रोहित शिंदे (निमणी) यांना जाहीर झाले.

इतर द्राक्ष जाती गटातील प्रथम पुरस्कार सिद्धांत खिंडे (सोनगाव, ता. निफाड, जि. नाशिक) (द्राक्ष जातः व्ही. एस.डी.), द्वितीय- सचिन रमेश देशमुख (राजापूर, ता. दिंडोरी, जि. नाशिक) (आरा ३६) तर तृतीय पुरस्कार भाऊसाहेब बाजीराव झोमन (मोहाडी, ता. दिंडोरी, जि. नाशिक) (ए.आर. डी. ३६) यांना जाहीर झाले.

उत्तेजनार्थ पुरस्कार महादेव पाटील (सोनी, ता. मिरज, जि. सांगली), श्री. सुरेश एकनाथ कळमकर (मोहाडी, ता. दिंडोरी, जि. नाशिक), चंद्रकांत खेबडे (नारायणगाव, ता. नारायणगाव, जि. पुणे), पांडुरंग भिमाजी हाडवळे (राजुरी, ता. जुन्नर, जि. पुणे) आणि अनिकेत सुधाकर पाटील (कवठेमहाकाळ, ता. कवठेमहाकाळ, जि. सांगली) यांना जाहीर झाले. डाळिंब (भगवा) गटात प्रथम- रामा शंकर यमगर (बनपुरी, जि. सोलापूर), द्वितीय- भाऊसाहेब चौगुले (नाझरा, ता. सांगोला, जि. सोलापूर) तर तृतीय पुरस्कार श्री. विजय दादासाहेब मरगळे (तळवडे, ता. आटपाडी, जि. सोलापूर) यांना जाहीर झाले. डाळिंब (गणेश) गटात प्रथम राजू काटे (लोटेवाडी, ता, सांगोला, जि. सोलापूर), द्वितीय- माणिक गोविंद काटे (लोटेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर) तर तृतीय पुरस्कार संतोष बोरसे (टाकळी ता. मालेगाव जि. नाशिक) यांना जाहीर झाले. मिलांज बनाना गटात प्रथम- जगदीश पुंडलिक पाटील, पिंपळगाव कमानी (ता. जामनेर, जि. जळगाव), द्वितीय- गणेश लीलाचंद पाटील (बभळाज, शिरपूर, ता. शिरपूर, जि. धुळे) तर तृतीय पुरस्कार समाधान दगडू पाटील (तरडी, ता. शिरपूर, जि. धुळे) यांना जाहीर झाले. पाच उत्तेजनार्थ पुरस्कार मंदाबाई भाऊसाहेब साळुंके (वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक), गौरव पंढरीनाथ मोरे, जायखेडा (ता. सटाणा, जि. नाशिक), महेंद्र अर्जुन मोरे (अजनाड, ता. शिरपूर, जि. धुळे), पंकज ब्राह्मणकर (जायखेडा, ता. सटाणा, जि. नाशिक) आणि सुभाष बाबू चव्हाण (अंबीलहोळ, ता. जामनेर, जि. जळगाव) यांना जाहीर झाले. मिलांज महाराजा पुरस्कारासाठी आलेल्या फळ पीक नमुन्यांचे परीक्षण ग्रीनझोन ॲग्रोकेमचे टेक्निकल डायरेक्टर डॉ. भास्कर गायकवाड आणि पूर्वा केमटेकचे तांत्रिक अधिकारी दिलीप जगताप यांनी केले. यावेळी ग्रीनझोन ॲग्रोकेमचे संचालक विजय पवार, बसवंत गार्डनचे प्रकल्प संचालक संदीप वाघ, संदीप सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रदर्शनाला विद्यार्थी, शेतकरी तसेच शहरी भागातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

## महत्त्वाचे

### ओझरला चोरी; ५५ हजारांचे दागिने लंपास

**ओझर : वार्ताहर**

घराचा दरवाजा उघडा असल्याची संधी साधून अनोळखी इसमाने घरात प्रवेश घरातून ५५ हजार रुपये किमतीचे सोन्याचांदीचे दागिने चोरून नेले असल्याची घटना ओझर येथे घडली. सोमवार दिनांक २४ रोजी सकाळी ७.४० ते दुपारी २.१० वाजेच्या दरम्यान ज्ञानेश्वर भगवान रुईकर (राहाणार प्लॉट नं. ४४, घर नंबर ६५३८, रियालन्स पेट्रोलपंपजवळ, राजे संभाजीनगर, ओझर) यांच्या घराचा दरवाजा उघडा असतानाची संधी साधून अंदाजे २२ ते २५ वयाच्या सडपातळ बांधा, गहू रंग असलेल्या अनोळखी इसमाने उघड्या दरवाजातून घरात प्रवेश करून घरातून ५५ हजार किमतीचे सोन्याचांदीचे दागिने चोरून नेले असल्याची तक्रार काल रात्री रुईकर यांनी नोंदविल्यावरून ओझर पोलिसांनी अनोळखी इसमाविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास पोलिस हवालदार पाटील करीत आहेत.

### वाघ गुरुजी शाळेत 'सावाना'चा उपक्रम

**नाशिक :** सार्वजनिक वाचनालय, नाशिक सानेगुरुजी कथामाला व बालभवनच्या वतीने मराठी भाषा गौरवदिनाचे औचित्य साधून लायब्ररी ऑन व्हील (फिरते वाचनालय) वाहनाने न्यू मराठा हायस्कूल व वाघ गुरुजी बालशिक्षण मंदिर, गंगापूर येथे भेट दिली. सावानात बालविभागात बालवाचकास वर्गणी न घेता मोफत पुस्तकं वाचण्यास दिली जातात. विद्यार्थ्यांनी सावाना बालविभागाचे सभासद व्हावे व पुस्तके वाचण्यासाठी घेऊन जावीत, असे आवाहन सावानाच्या वतीने करण्यात आले. तसेच बालभवनच्या वतीने होणाऱ्या विविध स्पर्धा व कार्यक्रमाची माहिती दिली व विद्यार्थ्यांना सभासद फॉर्म देण्यात आले. यावेळी सावानाचे जयेश बर्वे, सांस्कृतिक कार्य सचिव संजय करंजकर, बालभवनप्रमुख प्रा. सोमनाथ मुठाळ, ज्ञानेश्वर शिंदे, मुख्याध्यापिका पुष्पा लांडगे, दिलीप बोरसे, ज्योती बस्ते, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सावरकर पुण्यतिथीनिमित्त एसएमआरकेत रांगोळी स्पर्धा

**नाशिक : प्रतिनिधी**

एसएमआरके महिला महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर




सावरकर पुण्यतिथीनिमित्त नेत्रदान शिबिर, रांगोळी स्पर्धा, जनजागृती अभियानातून राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वरील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम घेण्यात आले. जनजागृती करण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थिनी नगमा अन्सारी, चार्वी शेट्टीगर यांनी व्हिडिओ रेकॉर्ड करून अंकिकृत माध्यमातून जनजागृती केली. प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर आणि उपप्राचार्य डॉ. नितीन सोनगीरकर यांनी विद्यार्थिनींना नेत्रदान अभियानाबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक वरिष्ठ विभागाच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. गीता यादव यांनी केले. आभार कनिष्ठ विभागाच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. शोभा सुरोशे यांनी केले. यावेळी सर्व सहकारी शिक्षक, विद्यार्थिनी उपस्थित होत्या. प्रा. अर्चना सोनवणे यांनी रांगोळी स्पर्धा आयोजित करून नेत्रदान महादानाविषयी जागृती केली.

### दहावीच्या विद्यार्थ्याचा अपघाती दुर्दैवी मृत्यू

**इंदिरानगर : वार्ताहर**

इयत्ता दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा पाणीपुरीच्या गाडीवर धडकून झालेल्या अपघातात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची



घटना इंदिरानगर पाथर्डी गावानजीक घडली आहे. मयत वेदांत विशाल गुरसळकर हा इयत्ता दहावीत शिक्षण घेत होता. वेदांत विशाल गुरसळकर हा (वय १६, रा. वज्रभूमी रो-हाऊस, वडाळा-पाथर्डी रस्ता) हा शुक्रवारी (दि. २१) सायंकाळी साडेपाच वाजता पाथर्डी गावाकडून इंदिरानगरकडे त्याच्या दुचाकीवरून जात असताना अचानक त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. जवळच उभ्या असलेल्या पाणीपुरीच्या गाडीवर दुचाकी धडकली. या अपघातात पाणीपुरीच्या गाडीचा पत्रा वेदांतच्या गळ्याला लागल्याने काही नागरिकांनी तात्काळ वेदांतला खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. शनिवारी (दि. २३) रोजी उपचारादरम्यान वेदांतचा जगण्यासाठीचा संघर्ष संपला, त्याची प्राणज्योत मालवली. याबाबत इंदिरानगर पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, याबाबत अधिक तपास इंदिरानगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामदास शेळके यांच्या मार्गदर्शनाने सुरू आहे. वेदांतच्या पश्चात लहान भाऊ, आई व वडील असा परिवार आहे. तर वेदांतचे वडील राज्य परिवहन महामंडळात वाहक पदावर कार्यरत आहे.

### वडाळागावाजवळ टँकरच्या धडकेत वृद्धेचा मृत्यू

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

इंदिरानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणारी एक वृद्ध महिला रस्ता ओलांडताना पाण्याच्या टँकरने दिलेल्या धडकेत तिचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवारी रात्री साडेसात वाजेच्या सुमारास वडाळागाव परिसरातील एका तबेल्याजवळ घडली. बकूबाई तानाजी गायकवाड (६२) असे मयत महिलेचे नाव आहे. पमा तानाजी चव्हाण (वय ३५, रा. पिंगुळबाग झोपडपट्टी, वडाळागाव) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी सायंकाळच्या सुमारास फिर्यादी हे घरी असताना त्यांची आई बकूबाई गायकवाड या दुकानावर पुरणाचे मांडे घेण्यासाठी जाऊन येते असे सांगून गेल्या होत्या. त्या लवकर घरी न आल्याने फिर्यादी यांना साडेनऊ वाजेच्या सुमारास फोन आला की, तुमच्या आईला टँकरने धडक दिली असून, त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. फिर्यादी हे तात्काळ घटनास्थळी गेले असता त्यांची आई बकूबाई गायकवाड यांना रस्ता ओलांडत असताना (एमएच ४६ एफ ४१४७) या नंबरच्या पाण्याच्या टँकरने धडक दिल्याने त्यांना दोन्ही पायाला गंभीर दुखापत होऊन मोठा रक्तस्राव झाला होता. यानंतर फिर्यादी यांनी नागरिकांच्या मदतीने पुढील औषधोपचारासाठी बकूबाई यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. यावेळी डॉक्टरांनी त्यांना तपासून मयत घोषित केले. याप्रकरणी टँकर चालक अक्षय गणपत तिडके (वय ३६, रा. विष्णूविहार सोसायटी, वडाळा-पाथर्डी रोड) याच्याविरोधात इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कांद्यावरील वीस टक्के निर्यातशुल्क रद्द करा

## कृषिमंत्र्यांच्या दारात थेट आंदोलनाचा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा इशारा

**लासलगाव : वार्ताहर**
**कांद्याच्या दरात दररोज चढ-उतार होत असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. त्यात आता नवीन उन्हाळी कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात देशांतर्गत बाजारपेठेत दाखल होत असल्याने कांद्याचे सरासरी बाजारभाव दोन हजार ते बावीसशे रुपयांपर्यंत कोसळल्याने नाशिक जिल्ह्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली असून, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी थेट संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांची भेट घेऊन कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या.**




**लासलगाव : कोल्हापूर येथे राजू शेट्टी यांची कांदादरासंदर्भात भेट घेताना स्वाभिमानी शेतकरी संघटना, नाशिकचे पदाधिकारी.**
**(छाया : समीर पठाण)**

> गेल्या पंधरा दिवसांत कांद्याचे बाजारभाव आठशे रुपयांनी घसरल्याने दोन हजार ते बावीसशे रुपयांपर्यंत कोसळले असून, नवीन उन्हाळ कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात आता दाखल होण्यास सुरुवात झाल्याने कांद्याची जास्त विदेशात निर्यात व्हावी, यासाठी २० टक्के कांद्यावरील निर्यातशुल्क हटविणे तसेच जास्तीत जास्त कांदा हा निर्यात कसा होईल, यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष व माजी खासदार राजू शेट्टी यांची भेट घेत आपण केंद्र सरकारपर्यंत पाठपुरावा करावा यासाठी आमचे शिष्टमंडळ त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेटले. त्यावेळी त्यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याच दारासमोर थेट आंदोलन केल्याशिवाय या राज्य व केंद्र सरकारला जाग येणार नाही, असा इशारा आक्रमक होत दिला.
> **–निवृत्ती पाटील** (जिल्हाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना, नाशिक)

यावेळी राजू शेट्टी यांनी थेट कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनाच लक्ष्य करत शेतकऱ्यांची भिकाऱ्यांशी तुलना करण्यापेक्षा शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी कांद्यावरील वीस टक्के निर्यातशुल्क रद्द करावे व जास्तीत जास्त कांदा हा विदेशात निर्यात कसा होईल, यासाठी प्रोत्साहनपर योजना जाहीर करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी करत या मागण्या तातडीने मान्य न झाल्यास थेट कृषिमंत्र्यांच्या दारातच आंदोलन करण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व माजी खासदार राजू शेट्टी यांनी यावेळी दिला.

नाशिक जिल्ह्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे-पाटील, उत्तर महाराष्ट्र सरचिटणीस सुधाकर मोगल, निफाड तालुकाध्यक्ष गजानन आबा घोटेकर, सिन्नर तालुकाध्यक्ष आत्माराम पगार या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी सकाळी कोल्हापूर जिल्ह्यातील शिरवळ या राजू शेट्टी यांच्या निवासस्थानी जात भेट घेतली. त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या असता राजू शेट्टी हे आक्रमक होत थेट कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या दारातच आंदोलन करण्याचा इशारा या पदाधिकाऱ्यांच्या भेटीदरम्यान दिल्याची माहिती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे-पाटील यांनी दिली.



# श्रीक्षेत्र सप्तशृंगगडावर महाशिवरात्र उत्सवाची पर्वणी

**सप्तशृंगगड : वार्ताहर**
**आद्य स्वयंभू शक्तिपीठ श्रीक्षेत्र सप्तशृंगगड येथे महाशिवरात्रीनिमित्ताने श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट, श्रीक्षेत्र सप्तशृंगगड यांनी शिवशक्ती भक्तांना महाशिवरात्र उत्सव - २०२५ आयोजित करून धार्मिक व भजनसंध्या (जागर) प्रकारातील विशेष उपक्रम आयोजित केला असून, बुधवार, दि. २६ रोजी सायंकाळी ७ वाजेपासून पुढे शिवालय तीर्थ, श्रीक्षेत्र सप्तशृंगगड, ता. कळवण, जिल्हा नाशिक येथे विश्वस्त संस्थेचे सर्व अधिकारी, कर्मचारी, पुजारी व ग्रामस्थ तसेच मे. आर. डी. अकॅडमी, श्रीरामपूर यांच्या विशेष सहयोगातून आयोजित केला आहे.**

महाशिवरात्रीच्या दिवशी सालाबादप्रमाणे रात्री ९ वाजता श्री भगवतीची विशेष पंचामृत महापूजा तसेच भक्तनिवास सुविधेतील कुदळे निवास या इमारतीचा पुनः लोकार्पण सोहळा श्रीचंद डी. जगमलानी प्रमुख जिल्हा न्यायाधीश नाशिक यांचे हस्ते व बाबासाहेब विश्वनाथ वाघ, जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक तथा अध्यक्ष, श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट, सप्तशृंगगड यांच्या अध्यक्षतेखाली तसेच विश्वस्त मंडळ प्रतिनिधी तथा तहसीलदार, कळवण, रोहिदास वारुळे व विश्वस्त मंडळ प्रतिनिधी ॲड. ललित निकम, ॲड. दीपक पाटोदकर, मनज्योत पाटील, डॉ. प्रशांत देवरे व भूषणराज तळेकर व देणगीदार कुदळे परिवार प्रतिनिधी कैलास कुदळे, पुणे यांच्या विशेष उपस्थितीत होणार आहे.



# नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्याचा ३९ वा वर्धापन दिन उत्साहात

**निफाड : वि.प्र**
**महाराष्ट्रातील पहिले रामसर दर्जा मिळालेल्या नांदूरमध्यमेश्वर पक्षी अभयारण्याचा ३९वा वर्धापन दिन पक्षी अभयारण्यात उत्साहात साजरा करण्यात आला. अभयारण्य परिसरात स्वच्छता अभियान राबवून पर्यटकांनी टाकलेला कचरा गोळा करण्यात आला.**

अभयारण्यात पर्यटकांकडून पन्नास रुपये डिपॉजिट घेऊन पिण्याची प्लास्टिक बाटली आत नेता येत असल्याने पर्यटक त्या बाटल्या पुन्हा अभयारण्याच्या बाहेर आणत असल्यामुळे प्लास्टिक कचरा कमी बघावयास मिळाला. अभयारण्य परिसरात राहणाऱ्या शेतकऱ्यांना देशी वृक्षांचे वाटपदेखील करण्यात आले. तसेच वृक्षारोपणदेखील करण्यात आले. येथे आलेल्या विद्यार्थी आणि पर्यटकांना पक्षी निरीक्षण मनोऱ्यावरून पक्ष्यांची माहिती करून देण्यात आली.

हिवाळा संपला असला तरी अभयारण्यात स्थलांतरित पक्ष्यांची संख्या मोठी असल्याचे दिसून आले. पक्षी अभयारण्यात पाणवेली आणि टायफा काढण्याचे काम सुरू झाल्यामुळे पक्ष्यांना खाद्य आणि बसण्यासाठी जागादेखील मिळत आहे. वर्धापन दिन कार्यक्रमात नेचर क्लब ऑफ नाशिकचे अध्यक्ष प्रा. आनंद बोरा, पक्षिमित्र उमेशकुमार नागरे, प्रभारी वनपाल संदीप काळे, प्रमोद मोगल, गंगाधर आघाव, रोहित मोगल, रोशन पोटे, पंकज चव्हाण, समाधान सोनवणे, विकास गारे आदींसह पक्षिमित्र, गाइड आणि वन कर्मचारी सहभागी झाले होते.

# नांदूरमध्यमेश्वरला आज यात्रोत्सव

**निफाड : विशेष प्रतिनिधी**
**ब्रिटिशकालीन धरण पुरातन मंदिरे, वाडे याबरोबरच गोदावरी -कादवा दारणा नद्यांच्या संगमावर तसेच दक्षिण वाहिनीच्या काठावर वसलेले गाव किंबहुना प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नांदूरमध्यमेश्वर येथे महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.**

दोन दिवस चालणाऱ्या या सोहळ्यासाठी यात्रा कमिटी गावातून मोठ्या प्रमाणात लोकवर्गणी जमा करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, ग्रामपंचायतीच्या वतीने मूलभूत सोयीसुविधा पुरविण्याकडे लक्ष दिले आहे. एकूणच कालपासून सुरू होणाऱ्या यात्रोत्सवासाठी चाकरमानी गावाकडे परतू लागल्याने नांदूरनगरी गजबजली. नांदूरमध्यमेश्वर गावाला ऐतिहासिक, पौराणिक आणि धार्मिक महत्त्व आहे. प्रभू श्रीराम, बंधू लक्ष्मण पत्नी सीतेसह चौदा वर्षे पंचवटी येथे वनवासात असताना सीतेचे हरण करण्यासाठी रावणाने मारीच हरणाचे रूप घेऊन पंचवटीत आला. परिणामी, सीतेने हे हरीण पाहताच तिला या हरणाच्या कातड्याची कंचुकी शिवण्याची इच्छा झाली. परिणामी, तिने ती रामाजवळ बोलून दाखविली. साहजिकच प्रभू श्री रामचंद्रांनी या मायावी हरणाचा पाठलाग सुरू केला. हरीण मायावी असल्याने ते प्रभू रामाला हुलकावणी देत नांदूरमध्यमेश्वरजवळ आले. तर रामाला या ठिकाणी हरीण दिसताच प्रभू रामचंद्रांनी निर्वाणीचा बाण सोडला, परिणामी हा बाण हरणाच्या पायाला लागून त्याची खुर तुटली म्हणजेच हरणाला व्याधी झाली.

साहजिकच त्याची आठवण म्हणून त्याचं ठिकाणी मृगव्याधेस्वर मंदिर बांधण्यात आले असून, याच ठिकाणी गावाचे ग्रामदैवत गंगा मध्यमेश्वर महाराज यांची महाशिवरात्रीची यात्रा भरविली जाते तर पुढे याच हरणाचा पाठलाग सुरूच ठेवत त्याचा कायगाव टोक येथे वध करण्यात आला होता. तेथे देखील सिद्धेश्वर मंदिर बांधण्यात आले आहे. साहजिकच प्रत्यक्ष प्रभू रामचंद्राच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. तसेच नांदूरमध्यमेश्वर येथेच अहिल्यादेवी होळकर यांनीदेखील येथे काहीकाळ वास्तव्य केले आहे. आजही त्यांनी बांधलेले वाडे याची साक्ष देत उभे आहेत. तर धरणाजवळ गावाचे ग्रामदैवत गंगा मध्यमेश्वर महाराज यांचे पुरातन मंदिर असून, या मंदिरात इंदूरचे राजघराणे होळकर यांनी नवस केला होता.



# देवळा-मालेगाव रस्त्यावर पेट्रोल पंपावर कोयत्याचा धाक दाखवत चोरी

**सटाणा : वार्ताहर**
**देवळा-मालेगाव या राज्य मार्गावरील पिंपळगाव वाखारी येथील एम.के. पेट्रोलपंपावर दि.२४ रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास तीन जणांनी पंपावरील कामगारास कोयत्याचा धाक दाखवून मारहाण करून रोख रक्कम ६१४० रुपयांची जबरी चोरी करून येथून पळ काढल्याची घटना घडली आहे. यातील तीनही आरोपींविरुद्ध देवळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, देवळा पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवत आरोपीना अटक केली आहे.**

देवळा मालेगाव रस्त्यावरील पिंपळगाव वाखारी येथील इंडियन ऑइलच्या एमके पेट्रोल पंपावर दि.२४ रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास सचिन बाळू आहिरे, रोशन बाळू आहिरे (दोन्ही रा. दहिवड, ता. देवळा) व कुणाल संजय पवार (रा. कनकापूर, ता. देवळा) हे बजाज कंपनीची पल्सर विनानंबरची घेऊन पेट्रोल भरण्यासाठी आल्यानंतर त्यांनी अजय बनवरीलाल यादव पंपावरील मजुराला पकडून खाली पाडले. त्याला मारहाण केली व यातील एकाने कोयता काढून धाक दाखविला व दुसऱ्याने त्या मजुरांच्या खिशातून जबरदस्तीने रोख रक्कम काढून चोरी करून पळून गेल्याबाबत देवळा पोलिसांत पेट्रोलपंपावरील कर्मचारी अजय यादव याने देवळा पोलीस ठाण्यात दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी दीपक पाटील करीत आहेत.

# सटाणा बाजार समिती निवडणूक जाहीर

**सटाणा : तालुका प्रतिनिधी**
**सटाणा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या १८ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून, ३१ मार्च रोजी मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर १ एप्रिल रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार असल्याची माहिती सहाय्यक निबंधक तथा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र शेळके यांनी दिली.**

सटाणा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची मुदत संपल्यानंतर दोन वेळा संचालक मंडळाला मुदतवाढ मिळाल्यानंतर गेल्या सहा महिन्यांपासून बाजार समितीवर शासन नियुक्ती अप्रशासकीय मंडळाची नियुक्ती करण्यात आली होती. त्याची मुदत संपल्यानंतर राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने सहाय्यक निबंधक जितेंद्र शेळके यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करीत निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

बाजार समितीच्या १८ सदस्यांसाठी निवडणूक होत आहे. त्यासाठी सहकारी संस्थेच्या मतदारसंघातून ११ सदस्य असणार आहेत. त्यात सर्वसाधारण गटासाठी ७ जागा, महिलांसाठी २ जागा, इतर मागासवर्गीय गटासाठी १ तर विमुक्त जाती जमातीसाठी १ जागा तसेच ग्रामपंचायत मतदारसंघातून चार सदस्य निवडल्या जातील. त्यासाठी सर्वसाधारण गटासाठी २ जागा, अनुसूचित जाती जमाती व आर्थिक दुर्बल घटकासाठी प्रत्येकी १ जागा, व्यापारी मतदारसंघातून २ जागा तर हमाल व तोलाई संघातून १ जागा अशा १८ संचालकांसाठी आरक्षणानुसार निवडणूक संपन्न होणार आहे. २४ फेब्रुवारीपासून ते ३ मार्चपर्यंत निवडणुकीच्या इच्छुकांना नामनिर्देशनपत्र दाखल करता येणार आहे. दाखल झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी ४ मार्च रोजी होणार असून, ५ मार्च ते १९ मार्चपर्यंत छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना माघार घेता येईल. २० मार्च रोजी निवडणूक रिंगणातील उमेदवारांना निशाणीचे वाटप होईल. ३१ मार्च रोजी नियोजित ठिकाणी मतदान प्रक्रिया पार पडेल. झालेल्या मतदानाची मतमोजणी १ एप्रिल रोजी होऊन निकाल जाहीर करण्यात येणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र शेळके यांनी सांगितले.

# बोराळे येथे महाशिवरात्रीनिमित्त कुस्त्यांची दंगल

**नांदगाव : प्रतिनिधी**
**नांदगाव तालुक्यातील बोराळे येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण, तसेच महाशिवरात्रीनिमित्त कुस्त्यांची दंगल आयोजित करण्यात आली होती.**

सालाबादप्रमाणे या वर्षी श्रीक्षेत्र गिरणेश्वर आश्रम बोराळे येथे अखंड हरिनाम सप्ताह तसेच ज्ञानेश्वरी पारायण तसेच महाशिवरात्रीचे औचित्य साधत मंगळवार (दि. २५) रोजी गिरणेश्वर आश्रमालगत भव्य कुस्त्यांच्या दंगलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील अनेक नामवंत पैलवानांनी हजेरी लावली. महाशिवरात्रीच्या पूर्वसंध्येला कुस्तीची दंगल पार पडली. त्यावेळी सरपंच राजेंद्र पवार, उज्वल सोळंके, शंकरसिंग सोळुंके, रामसिंग सोळुंके, प्रशांत पगार, सचिन पगार, विनोद पगार, मारुती काळे, दगाबापू सोळुंके, इंद्रसिंग सोळुंके, बाबाजी पगार, रूपसिंग सोळुंके, संदीप साळुंके, रामभाऊ मोरे, प्रमोद पगार, विशाल धनगर, प्रवीण सोळुंखे, ज्ञानेश्वर निकम यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नांदगाव : तालुक्यातील बोराळे येथील गिरणेश्वर आश्रम येथे महाशिवरात्रीचे औचित्य साधत कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले. (छाया : महेंद्र पगार)**

# ओझर नगरपरिषद पाणीपट्टी, घरपट्टी वसुलीसाठी ॲक्शन मोडवर

**ओझर : वार्ताहर**
**ओझर नगरपरिषद हद्दीतील घरपट्टी, नळपट्टी कर थकीत करवसुली मोहिमेने वेग घेतला असून, मार्चजवळ येत असल्याने करवसुलीची मोहीम जोरात सुरू झाली आहे. नगरपरिषद वर्षभर सेवा देते तरीही अनेक नागरिक कर भरण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी आता ॲक्शन मोडवर आले आहेत. करवसुलीसाठी थकबाकीदारांच्या घरी जाऊन नळकनेक्शन तोडण्याची कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी मार्चअखेरपर्यंत आपल्या थकीत व चालू घरपट्टी पाणीपट्टी व व्यावसायिक कराची रक्कम वेळेत भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे.**

नळतोडणीसह या पुढील टप्प्यात मालमत्ता सील करणे, नावे जाहीर करणे यांसारख्या मोहिमा राबवणार आहे. दरवर्षी करवसुली आणि विविध माध्यमातून मिळणारे उत्पन्न हाच नगरपालिकेचा वर्षाचा गाडा हाकण्याचा हक्काचा फंड (निधी) असतो. शहराचा झपाट्याने विस्तार वाढला असून, नगरपालिकेने शहरात विभागनिहाय वसुली पथक नेमले आहे.

नवीन आर्थिक वर्ष सुरू होताच वर्षभराची मालमत्ता कर व पाणीपट्टी तसेच गाळे भाडे पट्टीच्या पावत्यांचे वाटप करूनही थकबाकीदार पाहिजे तसा प्रतिसाद देत नसल्याने मुख्याधिकारी किरण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नगररचना विभाग रेणुका पाटील, ऐश्वर्या बैरागी, अविनाश गवळे, कर अधिकारी प्रशांत पोतदार, करनिरीक्षक अनिल बोरसे, नगररचनाकार केऊर रॉय, कैलास जाधव, संतोष सोनवणे, हर्षल पगार, राजेश संगपाळ, योगेश घेगडमल आदींचे पथक वसुलीसाठी तैनात करण्यात आले आहे.

एक मार्चपासून मुख्याधिकारी किरण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कडक करवसुली मोहीम सुरू होणार आहे. प्रतिसाद न देणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांवर यापुढे नळ कनेक्शन तोडणी, मालमत्ता सील करणे तसेच थकबाकीदारांच्या घरासमोर ढोल बजावण्याचे आंदोलनही सुरू होणार आहे. शासनाने शंभर टक्के कर वसुलीचे उद्दिष्ट न गाठल्यास पंधराव्या वित्त आयोगाचे अनुदान रोखण्याची भीती आहे. त्यामुळे नागरिकांनी देखील वेळेत कर भरण्याचे आवाहन नगरपरिषदेकडून केले आहे.

## मार्चच्या आत कर भरण्याचे आवाहन



**ओझर : उपनगरांमधील थकबाकीदारांची नळपट्टी घरपट्टी मालमत्ता कर वसुली करतांना कर अधिकारी प्रशांत पोतदार, विलास कदम, संदिप कमोद**

> शासनाने गाळा भाडे, पाणीपट्टी तसेच विविध प्रकारच्या मालमत्ता करवसुलीचे उद्दिष्ट ठरवून दिलेले असल्याने त्यावरच नगरपरिषदेच्या विविध निधीचे गणित अवलंबून असते. शिवाय, शहराच्या विविध गरजाही या निधीतून भागवायच्या असतात. त्यामुळे नागरिकांनी वेळेत कर भरून सहकार्य करावे आणि कारवाई टाळावी.
> – **किरण देशमुख,** मुख्याधिकारी, ओझर नगरपरिषद

## महत्त्वाचे



### नर्मदेश्वर महादेव मंदिरात आज महाशिवरात्रीनिमित्त कार्यक्रम

**नाशिक : वार्ताहर**
महाशिवरात्रीनिमित्त आज (दि. २६) रोजी मुंबई नाका, भाभानगर येथे श्री नर्मदेश्वर महादेव मंदिरातर्फे श्रीशिवशक्तीयाग या धार्मिक विधीचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रम सकाळी ८.३० वा. मंगलाचरण, देवता वंदन, प्रधान संकल्प, गणपती पूजन, पुण्याह वाचनम, मातृका पूजनम, नांदीश्राद्धम, ऋत्विक वर्णन. सकाळी १०.१५ वा. मुख्यदेवता स्थापन तथा पूजन, सकाळी ११ वा. अग्निस्थापन, नवग्रह स्थापन, वरुणदेवता स्थापन तथा पूजन, दु. १२ वा. मुख्य हवनाला सुरुवात, दु. १.३० वा. पूर्णाहुती, उत्तरपूजन, दानादी संकल्प, महाआरती, दु. २ वा. धार्मिक विधींची सांगता. श्री रुद्राभिषेक पूजन सकाळी १० ते १ व सायंकाळी ५ ते ८ या वेळेत आहे. महाशिवरात्रीनिमित्त प्राजक्ता भट यांचे दुर्वांकूर नृत्य निकेतन सादर करणार आहेत. शिवभक्ती गीतांवर आधारित नृत्याविष्कार व गजानन महाराज महिला भजनी मंडळ भाभानगर यांच्यातर्फे भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व शिवभक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### चांदवडला विजयनगर येथे महाशिवरात्रीनिमित्त कार्यक्रम

**सोग्रस : वार्ताहर**
चांदवड तालुक्यातील विजयनगर येथील श्री गुरुदेव दत्त देवस्थान आश्रम मंदिरात बुधवार तारीख २६ रोजी महाशिवरात्र महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंदिराचे मठाधिपती गुरुवर्य ह.भ.प. निवृत्तिनाथ महाराज काळे यांनी दिली आहे. बुधवार तारीख २३ रोजी सकाळी श्री महादेव भगवानचा रुद्राभिषेक होईल. सकाळी ९ ते ११ या वेळेत राजेंद्र महाराज खैरनार (गिरणारे) यांचे कीर्तन होईल. याप्रसंगी नामदेव देवमन खैरनार (भूसनी) यांच्या वतीने फराळ व महाप्रसादाचे वाटप होईल. श्री गुरुदेव दत्त देवस्थान विजयनगर (ता. चांदवड) येथे महाशिवरात्र महोत्सवानिमित्त होणाऱ्या कीर्तन, फराळ व महाप्रसाद कार्यक्रमास सर्व भक्तगणांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री गुरुदेव दत्त देवस्थान साधक मंडळ भक्त मंडळ व ग्रामस्थ यांनी केले आहे.

### पत्रकार प्रशांत धिवंदे यांचे अपघाती निधन

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**



काव्य आणि माध्यमकर्मी क्षेत्रात गत दोन दशकांहून अधिक काळ उल्लेखनीय योगदान दिलेले प्रशांत रमेश धिवंदे (३९, रा. देवळाली कॅम्प) यांचे नुकतेच अपघाती निधन झाले. छायाचित्रकार म्हणूनही सुपरिचित असलेले धिवंदे यांनी नाशिकमधील विविध दैनिकांतून जवळपास दोन दशके बातमीदारी केली. साहित्य आणि काव्यसंमेलनातून देखील त्यांनी आपल्या काव्य प्रतिभेच्या जोरावर आपली नवी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले आणि एक बहीण असा परिवार आहे. नाशिक मराठी पत्रकार संघाचे ते प्रसिद्धीप्रमुख होत.

## निधन वार्ता


### जगन्नाथ पवार



**आराई : वार्ताहर**
आराई गावातील ज्येष्ठ नागरिक जगन्नाथ लक्ष्मण पवार (७४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### कारभारी टिळे

**नाशिकरोड : प्रतिनिधी**



मोहगाव येथील शेतकरी कारभारी सुकदेव टिळे (८७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते बाळासाहेब व रामदास कारभारी टिळे यांचे वडील होत.

### यमुनाबाई देवरे

**देवळा : प्रतिनिधी**



तालुक्यातील वाजगाव येथील यमुनाबाई केदा देवरे (७६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सहकार विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी के. एम. देवरे यांच्या पत्नी तर प्राथमिक शिक्षक नितीन देवरे व भाजपचे पदाधिकारी दिनेश देवरे यांच्या त्या मातोश्री होत.

## विशेष



## दापूर प्राथमिक शाळेत ओळखपत्र वितरण

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सर्व मुलांना, शिक्षकांना व शालेय व्यवस्थापन समितीतील सदस्यांना सेवानिवृत्त पोलीस अधिकारी नंदू नामदेव सांगळे यांच्या सहकार्यातून ओळखपत्र वितरण करण्यात आले. यापूर्वी इंडियन आर्मीचे जवान दशरथ अरुण आव्हाड यांनीही शाळेस मदत केली आहे. त्यांचा शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षक, सरपंच व ग्रामसेवक तसेच आदी ग्रामस्थ यांच्याकडून सत्कार करण्यात आला. तसेच नवनिर्वाचित सरपंच श्रीमती वनिता आव्हाड व सिन्नर तालुका ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्षपदी निवड झालेले दापुर ग्रामपंचायतचे अधिकारी प्रवीण बुरसे यांचाही सत्कार शालेय व्यवस्थापन समितीतर्फे करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर साबळे पाटील, उपाध्यक्ष अमोल आव्हाड, भगवान आव्हाड, सरपंच श्रीमती वनिता आव्हाड, ग्रामपंचायत अधिकारी प्रविण बुरसे, सदस्य गणेश आव्हाड, संपत आव्हाड, सागर आव्हाड, प्रहार दिव्यांग संघटना सिन्नर तालुका अध्यक्ष संदीप आव्हाड, बाळासाहेब आव्हाड, संकेत आव्हाड, सुरज मणियार, इनुस भाई मणियार, दापूर शाळेचे केंद्रप्रमुख संजय आव्हाड, मुख्याध्यापक जाधव सर, कृष्णकांत कदम, शांताराम सांगळे, श्रीमती गायत्री राजपूत, सुनंदा कोकाटे, मनीषा गोराडे, वैशाली जाधव, स्वाती झनकर, भारती दराडे आदी शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

## माळेगावकरांचे उपोषण सहाव्या दिवशीही सुरुच

**सिन्नर : प्रतिनिधी**

माळेगाव औद्योगिक वसाहतीसाठी भूसंपादन टप्पा क्र. १ मधून दि. २६ जुन २०२३ च्या प्रस्तावानुसार गट १३७/१ सह इतर जमीनी भूसंपादनातून वगळाव्यात, भूसंपादनात झालेल्या घोटाळ्याची ईडी, सीबीआय मार्फत चौकशी व्हावी यासह विविध मागण्यांसाठी माळेगाव ग्रामपंचायतचे सदस्य महेंद्र निवृत्ती सांगळे यांच्यासह ग्रामस्थांनी सातपूर उद्योगभवनसमोर सुरु केलेले उपोषण काल (दि.२५) सहाव्या दिवशीही सुरुच होते. दरम्यान, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी यांनी महेंद्र सांगळे यांच्यासह उपोषणकर्त्यांनी एमआयडीसीने केलेली कारवाईबाबत अवगत करत उपोषण स्थगित करण्याची विनंती केली. तथापि मुख्यालयाकडून निर्णयक्षमता असलेल्या अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्याशिवाय उपोषण स्थगित करणार नसल्याचे सांगळे यांनी जाहीर केले. दरम्यान, भाजपाचे नेते भाऊसाहेब शिंदे यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन सिन्नर तालुका भाजपाच्यावतीने त्यांच्या उपोषणास पाठींबा दर्शविला. यावेळी महेंद्र सांगळे यांच्यासह भिमा चिमाजी घुगे, पांडुरंग रघुनाथ सांगळे, विष्णु शंकर सांगळे, खंडू विश्वनाथ सांगळे, तुकाराम कचरु आव्हाड, विश्वनाथ रामचंद्र सांगळे, योगेश लक्ष्मण घुगे, अनिल लक्ष्मण घुगे, हौशाबाई पंढरीनाथ लांडगे, अशोक पंढरीनाथ लांडगे आदी उपस्थित होते.

## एसएसके धनलक्ष्मी पतसंस्था वेबसाईटचे लोकार्पण

**सिन्नर : प्रतिनिधी**

पुरोगामी महाराष्ट्राला सहकार चळवळीने यशोशिखरावर उभे केले. काळाची गरज ओळखून सहकार क्षेत्रात आमुलाग्र बदल झाले आहेत. बदलांचा स्विकार करुन सहकार क्षेत्रात ग्राहकांना सोयीसुविधा दिल्या जात आहेत. या अनुषंगाने एसएसके धनलक्ष्मी संस्थेने नेहमीच बदल स्विकारले असून वेबसाईटच्या माध्यमाने पुढचे पाऊल टाकले असल्याचे प्रतिपादन संस्थेचे चेअरमन संग्राम कातकाडे यांनी केले. नायगाव येथील एसएसके धनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेच्या ३६ व्या वर्धापनदिनामित्त संस्थेच्या वेबसाईटचे www.sskdhanlaxmi.com लोकार्पण गुरुवारी (दि.२०) करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. संस्थेचे संस्थापक स्व. शिवाजीराव कातकाडे यांनी व्यक्ती म्हणून स्वत:ची विश्वासार्हता आणि संस्थेची विश्वसनीयता जपली. पारदर्शक कारभार केला. संचालक मंडळाचे त्यांना मोलाचे सहकार्य लाभले. त्यामुळेच संस्था प्रगतीपथावर असल्याचे ते पुढे म्हणाले. ग्राहकांना सेवा देण्यासाठी संस्था नेहमीच कार्यतत्पर असून यापुढेही सुविधा दिल्या जातील, असा विश्वास संचालक मंडळाने व्यक्त केला. यावेळी ज्येष्ठ संचालक लक्ष्मण जेजुरकर, सुदाम कमोद, व्हा.चेअरमन प्रकाश जेजुरकर, संचालक ज्ञानेश्वर लहाने, प्रभाकर जेजुरकर, साहेबराव बोडके, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील भाबड आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

## नाईक महाविद्यालयात स्व. दिघोळेंना अभिवादन

**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माजी ऊर्जामंत्री मंत्री स्व. लोकनेते तुकाराम दिघोळे यांची ८४ वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त नामदेवराव काकड, संस्थेचे संचालक समाधान गायकवाड व अथर्व, डॉ.महावीर आदी उपस्थित होते. संचालक समाधान गायकवाड यांनी आपल्या मनोगतातून स्वर्गीय लोकनेते तुकाराम दिघोळे यांचे राजकीय, सामाजिक व शिक्षण क्षेत्रातील कार्य मनोगतातून व्यक्त केले. तसेच संस्थेचे विश्वस्त नामदेवराव काकड, चोथवे मॅडम यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. के.डी पखाले यांनी दिघोळे यांच्या कार्याचा आढावा घेऊन अभिवादन केले. सूत्रसंचालन स. प्रा. वैशाली सानप यांनी केले व आभार स.प्रा.ज्ञानेश्वर चकोर यांनी मानले. कार्यक्रमाला सांस्कृतिक विभाग प्रमुख स. प्रा कुटे मॅडम, महाविद्यालयाचे सर्व सहाय्यक प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# उद्योग क्षेत्रातील गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन : डॉ. पालवे

**सिन्नर : प्रतिनिधी**

**सिन्नरच्या उद्योग क्षेत्रातील गुन्हेगारी, अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन करुन औद्योगिक शांतता व सुरक्षा प्रस्थापित करण्याचे आश्वासन पोलीस उपअधिक्षक निलेश पालवे यांनी दिले.**

### स्टाइसमध्ये औद्योगिक सुरक्षेसंदर्भात बैठकीत विविध समस्यांवर चर्चा



औद्योगिक क्षेत्रात शांतता प्रस्थापित करून सुरक्षित औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तयार केलेल्या ०७ कलमी कार्यक्रमा अंतर्गत सिन्नर सहकारी औद्योगिक वसाहतीच्या आद्य उद्योजक नंदलालजी केला सभागृहात मंगळवारी (दि.२५) आयोजित बैठकीत अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

व्यासपिठावर एमआयडीसी पोलिस ठाण्याचे निरीक्षक प्रमोद पाटील, स्टाईसचे चेअरमन नामकर्ण आवारे, संस्थेचे संचालक अरूण चव्हाणके, अतुल अग्रवाल, प्रमोद महाजन, तज्ञ संचालक सुनिल जोंधळे, स्वीकृत संचालक विठ्ठल जपे, उद्योजक सभासद प्रविण गद्रे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. पालवे म्हणाले, मी कोणत्याही बेकायदेशिर कामांना माफ करत नाही, संस्थेच्या कार्यक्षेत्रात व परिसरात अवैध दारू विक्री किंवा बिअरबार चालु असतील तर त्यांचा देखील बंदोबस्त केला जाईल. वेळप्रसंगी चोरी, छेडछाड, हाणामारी किंवा तत्सम गुन्ह्यांची केसेस तात्काळ दाखल करण्याचे आदेश देण्यात आले. संस्थेच्या कार्यक्षेत्रात पेट्रोलिंग चालु आहे, परंतु उद्योजकांच्या सुचनांचा विचार करता त्यात वाढ केली जाईल. तसेच आपल्या कारखान्यांच्या गेटवर सीसीटीव्ही कॅमेरा बसविलेले असतील तर त्याद्वारे आम्हास गुन्ह्यांचा पाठपुरावा करण्यास सोपे होईल असेही त्यांनी नमुद केले.

यापुर्वी भंगार गोळा करणाऱ्या महिला व पुरूषांवर कारवाई केलेली आहे. परंतु पुन्हा आम्ही याकडे लक्ष देऊ. तसेच काही समस्या उद्भवल्यास तुम्ही संस्थेचे चेअरमन नामकर्ण आवारे यांचमार्फत आम्हास कळवाव्यात आम्ही तात्काळ त्या समस्यांच दखल घेऊ असे आश्वासन एमआयडीसी पोलिस ठाण्याचे निरीक्षक प्रमोद पाटील यांनी दिले. दिले.

संस्थेचे चेअरमन नामकर्ण आवारे यांनी प्रास्ताविकातून औद्योगिक वसाहतीतील सुरेक्षेसंदर्भातील समस्या मांडल्या. एमआयडीसी सिन्नर पोलिस स्टेशन सहकारी औद्योगिक वसाहत, मुसळगाव येथुन सिन्नर शहरात स्थलांतरीत झाले असल्याने संस्थेच्या कार्यक्षेत्रात एक पोलिस चौकी व आवश्यक पोलिस कर्मचारी वर्ग उपलब्ध करून द्यावा. उद्योजक व कामगारांना दमदाटी करणे, वारवांर चोऱ्या होणे, भरदिवसा कंपनीत घुसून बाहेर पडलेल्या किमंती मालमत्तेची चोरी करणे असे प्रकार सर्रास होत आहे. यावर कायमस्वरूपी उपाययोजना करावी. भंगार खरेदी-विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करावी. दररोज होणाऱ्या छोट्या-मोठ्या चो-या, रस्तालुट, पगाराचे पैसे चोरी, महिलांची छेडछाड याबाबत घटना घडताच उद्योजक सभासदांची लेखी तक्रार घेण्याची प्रथा सुरू करण्यात यावी. संस्थेच्या परिसरामध्ये बेकायदेशिर दारू विकणा-यांचा बंदोबस्त करावा. तसेच गणेशनगर, शंकरनगर, उज्वलनगर मधील भाडेकरूंचा सर्व्हे व्हावा आदी मागण्या उद्योजकांच्यावतीने आवारे यांनी केल्या. यावेळी उद्योजक राजेंद्र आव्हाड,चित्रसेन बडगुडर, प्रविण गद्रे व अतुल अग्रवाल यांनी सुचना केल्या.

बैठकीस उद्योजक ओमप्रकाश शिरापुरे, महेंद्रसिंग परदेशी, कु. ऋती करवा, किसन घुले, अनिल आसावा, सुर्यभान गायकवाड, अजित वाडकर, सुशांत वाकचौरे, बंडु पगार, माधवराव हरणे, बबनराव चौरे, शिवाजी चौधरी, सुधीर कोथळकर, विवेक अचवल, कैलास पगार, नरेंद्र परचुरे, उद्योजक प्रतिनिधी विलास नाठे, पी.आर. गायकवाड, दिपक आरोटे, सुनिल भालेराव आदींसह उद्योजक उपस्थित होते. संस्थेचे संचालक अतुल अग्रवाल यांनी आभार मानले.

### तक्रारीसाठी ११२ नंबर डायल करा

पुर्वीपासुन पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यासाठी १०० नंबर हा संपर्क असुन आता नवीन ११२ हा नंबर सेव्ह करावा व यापुढे तक्रार करण्यासाठी ११२ नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन पोलिस उपअधिक्षक डॉ. निलेश पालवे यांनी केले. खाजगी सिक्युरिटी गार्ड यांचेबरोबर बैठक घेऊन त्यांना माहिती देण्यात येईल व त्यांचेमार्फत कारवाई करणे सोपे व सोयीस्कर होईल असेही पालवे यांनी स्पष्ट केले.



## चापडगावच्या सरपंचपदी यमुना आव्हाड बिनविरोध

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील चापडगाव ग्रामपंचायतच्या सरपंच पदी यमुना सुभाष आव्हाड यांची अविरोध निवड करण्यात आली.

सहकारी सदस्यांना संधी मिळावी यासाठी सरपंच लिलाबाई मेंगाळ यांनी आवर्तन पद्धतीने राजीनामा दिला होता. रिक्त पदासाठी निवडणूक निर्णय अधिकारी परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.२५) ग्रामपंचायत कार्यालयात विशेष बैठकीच्या आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरपंच पदासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या वेळेत यमुना आव्हाड यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. त्यावर सूचक म्हणून सदस्य सखाराम मेंगाळ यांनी स्वाक्षरी केली होती. छाननीत हा अर्ज वैध ठरल्याने त्यांची अविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी परदेशी यांनी केली. याप्रसंगी उपसरपंच कचरू मेंगाळ, सदस्य सखाराम मेंगाळ, सुरेखा रामदास मेंगाळ, गोरख जाधव, लिलाबाई मेंगाळ, गंगुबाई मेंगाळ, संदीप सांगळे, ग्रामसेवक पाटील उपस्थित होते. निवडणुक प्रक्रिया अविरोध पार पाडण्यासाठी सजन बोडके, बस्तीराम आव्हाड, दत्तूपंत सांगळे, अंबादास आव्हाड, दिनेश सांगळे, बाळा आव्हाड, रमेश आव्हाड, मधुकर आव्हाड, दत्ताराम आव्हाड, मोतीलाल सांगळे, अंकुश आव्हाड, दामोदर बोडके, तुषार सांगळे, भारत सांगळे, शिवाजी आव्हाड, संदीप आव्हाड, संतोष आव्हाड, नितीन आव्हाड, नीलेश आव्हाड, गणेश आव्हाड, संपत मेंगाळ, सोनू मेंगाळ, रामदास मेंगाळ आदींनी मोलाचे सहकार्य केले. यावेळी नवनिर्वाचित सरपंच यमुना आव्हाड यांची गावातून मिरवणूक काढण्यात आली. सर्वांना सोबत घेऊन गाव विकास करण्याची ग्वाही नवनिर्वाचित सरपंच आव्हाड यांनी यावेळी दिली.

# तालुक्यातील ६७ गावांना नव्याने सिटी सर्वे लागू, भूमिअभिलेखच्या दस्तात ७२५३ मालमत्तांची भर

### सिन्नरकरांना दोन वर्षांपासून नगर भूमापन कार्यालयाची प्रतीक्षा

**सिन्नर : भरत घोटेकर**

**स्वामित्व योजनेअंतर्गत भूमी अभिलेख कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या ड्रोन सर्वेक्षणात १०४ पैकी नव्याने ६७ गावांना सिटीसर्वे लागू झाला आहे. यापूर्वी केवळ २७ गावांना तो लागू होता. त्यामुळे जुन्या २२,९२२ मालमत्तांमध्ये नव्याने ७२५३ मालमत्तांची भर पडून ही संख्या ३०,१७५ पर्यंत पोहाेचली आहे. त्यामुळे मालमत्तांची वाढती संख्या बघता सिन्नरला नव्याने नगर भूमापन कार्यालय सुरू होणे अपेक्षित आहे. गेल्या दोन वर्षांपासून पुणे येथील जमाबंदी आयुक्तांकडे नगर भूमापन कार्यालयाचा प्रस्ताव पडून असून सिन्नरकरांना या प्रस्तावाच्या मंजुरीची प्रतीक्षा आहे.**



मुसळगाव आणि माळेगाव औद्योगिक वसाहती बरोबरच इंडियाबुल्सचा औष्णिक वीज प्रकल्पही सुरू होण्याच्या मार्गावर आहे. याशिवाय नाशिक - पुणे, सिन्नर - शिर्डी आणि सिन्नर - नाशिक महामार्गा सोबतच जवळून गेलेला 'समृद्धी' महामार्ग यामुळे भूमी अभिलेख कार्यालयावर कामाचा मोठा ताण आहे. याशिवाय भुमिअभिलेखच्या मालमत्तांमध्येही मोठ्या प्रमाणात भर पडल्याने नव्याने नगर भूमापन कार्यालय सिन्नरला सुरू झाल्यास त्यात वाढीव अधिकारी, कर्मचारी आस्थापना मिळाल्यास कामास गती येईल. सध्या कामाचा वाढता आवाका लक्षात घेता इतर तालुका कार्यालयामधील कर्मचारी दिमतीला घेऊन मोजणी आणि अन्य कामांचा निपटारा करावा लागत आहे.

भुमिअभिलेख कार्यालयाची जागा अपुरी असल्याने एकाच वेळी अधिकारी आणि कर्मचारी मिळून ३० जणांना या कार्यालयात बसणे अवघड होते. याशिवाय तालुक्यातील अर्जदारांची ही मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्यामुळे भूमिअभिलेख कार्यालयाला ही जागा अपुरी पडत असल्याचे अधिकारी संतोष मानकर यांनी सांगितले. तहसील कार्यालया शेजारील प्रशासकीय इमारतीत भूमि अभिलेखला कार्यालय मिळणार आहे. मात्र अद्याप या कार्यालयाचा ताबा न मिळाल्याने अपुऱ्या जागेतच कामकाज करावे लागत आहे.

### प्रस्ताव मंजुरीची प्रतीक्षा

जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख मार्फत उपसंचालकांकरवी, पुणे येथील जमाबंदी आयुक्त कार्यालयात नगर भूमापन कार्यालयाचा प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास वाढीव आस्थापना मिळेल. त्यामुळे कामात गतिमानता येईल.

**प्रदीप गायकवाड, उपाधीक्षक, भूमी अभिलेख सिन्नर.**

### कर्मचाऱ्यांची वाणवा

सिन्नर भूमी अभिलेख कार्यालयात ३४ आस्थापना मंजूर आहेत. एक लिपिक आणि ४ शिपाई अशी ५ पदे रिक्त आहेत. त्यामुळे आहे त्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा बोजा सहन करावा लागत आहे. नांदूरशिंगोटे आणि वडांगळी येथील भुमिअभिलेखच्या उप कार्यालयात शिपाई नसल्याने अधिकाऱ्यांची गैरसोय होत आहे.

# किड्स अकॅडमीच्या 'त्योहारोत्सव' अन् 'विजयोत्सवात' संस्कृतीदर्शन

### विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने पालक रसिक मंत्रमुग्ध



**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील किड्स अकॅडमीचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतीक महोत्सव 'त्योहारोत्सव' अन् 'विजयोत्सव' थीमचा आधार घेऊन आगळ्या-वेगळ्या पध्दतीने साजरा करण्यात आला. या दोन्ही प्रकारांत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पौराणिक, सांस्कृतिक अन् अधुनिक कलाविष्काराने पालक-रसिक मंत्रमुग्ध झाले.

शाळेचे अध्यक्ष अभिषेक पवार, उपाध्यक्षा अनुप्रिया पवार, प्राचार्या निते दवे, व्यवस्थापक प्रीती तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात शाळेचा वार्षिक उत्सव दोन सत्रात आयोजित करण्यात आला होता. सकाळच्या सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून सिन्नर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य आर.डी. पवार, कस्तुरी पतसंस्थेचे चेअरमन तथा लायन्स क्लबचे सदस्य कैलास क्षत्रिय, शास्त्रीनगरचे ग्रामपंचायत सदस्य अशोक आप्पा पवार आदी उपस्थित होते.तर संध्याकाळच्या सत्रात माजी नगरसेवक सोमनाथ पावसे, समाजसेविकास सौ. मेघा पावसे, दैनिक गावकरी प्रतिनिधी संदीप ठोक उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व सरस्वतीच्या प्रतिमेला हार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून ,सरस्वती मंत्र व शिवाजी महाराजांच्या आरतीने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शाळेच्या प्राचार्य नीती दवे यांनी प्रास्ताविकातून शाळेत वर्षभर राबविलेल्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली तसेच वार्षिक स्नेहसंमेलनाची रूपरेषा सांगितली. शाळेतील उत्कृष्ट विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सकाळच्या सत्रात नर्सरी ते पहिलीच्या विद्यार्थ्यांनी 'त्योहारोत्सव' या थीमवर आधारित नृत्य सादर केले. यावेळी या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्यातून अनेक उत्सवांची माहिती दिली. संध्याकाळच्या सत्रात दुसरी ते नववीच्या विद्यार्थ्यांने 'विजयोत्सव' या थीमवर आधारित नृत्य सादर करताना प्रत्येक प्रसंगात विजय कसा प्राप्त करावा हे त्यांनीं रामायण, महाभारत ,महिषासुरवध, नारीशक्ती, सोशल मीडियाचा अतिवापर व त्याचे दुष्परिणाम अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या हॅप्पी दिवाली, कोळी डान्स, बाई पण भारी, रामायण, महाभारत, महिषासुरवध, कारीकारी, आईगिरी नंदिनी, शिवबा राजे, मोबाईल थीम, एज्युकेशन थीम, गणपती साँग, आई जगदंबे, शंकरा रे शंकरा आदी नृत्यातून उपस्थित पालकांचे व पाहुण्यांचे लक्ष वेधले. मुलांनी कोणत्याही प्रसंगात खचून न जाता विजय कसा प्राप्त केला पाहिजे हे मनोरंजना मार्फत विद्यार्थ्यांना समजावे हा या' विजयो त्सव ' थीमचा उद्देश होता. कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षकांचे कौतुक करत त्यांनाही प्रमाणपत्र देत गौरविण्यात आले.

पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत शिक्षक व शाळा समितीचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यात शाळेच्या प्राचार्या, व्यवस्थापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शाळा समिती पालक, वर्ग यांचे मोलाचे सहकार्य लाभले.


## टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**१) मिळकतीचे वर्णन** - तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी व तालुका सिन्नर पैकी **कसबे सिन्नर,** ता. सिन्नर, जि. नाशिक येथील नगरपरिषद हद्दीतील **स.नं. ८५५/१ते३/१/२ अ** (जुना सर्व्हे नंबर ११४४) मधील **बिनशेती प्लॉट नंबर २५ यांसी क्षेत्रफळ ३.६०.४३ आर.चौ.मी. म्हणजेच ३६०.४३ चौ.मी.** यांसी आकार रू. २६०-०० पैसे यावर बांधकाम केलेल्या **पावसे संकुल-४ या इमारतीमधील तळ मजल्यावरील दुकान/गाळा नंबर ०३ यांसी आर.सी.सी. स्वरूपाचे बांधीव क्षेत्रफळ १९०.०० चौ. फुट म्हणजेच १७.६६ चौ.मी. (बिल्टअप) तसेच सदर मिळकतीच्या प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे गाळ्याच्या पुढील व आजु बाजुची मोकळी जागा वापरणेचे हक्कासह.**यांसी चतु:सिमा - मंजुर बिल्डींग प्लॅनप्रमाणे.

वर नमुद मिळकत ही आमचे पक्षकार **सौ. राधिका गोकुळ वाकचौरे, श्री. गोकुळ कारभारी वाकचौरे** यांनी सदर मिळकतीचे मालक **श्री. राजेंद्र मारूती सिरसाठ** यांचेपासुन खरेदी घेणेबाबतचा व्यवहार झालेला आहे. व सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची असलेबाबत मालक **श्री. राजेंद्र मारूती सिरसाठ** यांनी आमचे पक्षकार **सौ. राधिका गोकुळ वाकचौरे, श्री. गोकुळ कारभारी वाकचौरे** यांना सांगितलेले आहे.

सबब वरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीसपत्र, अन्न, वस्त्र, वारसदार, लिज, कोर्ट हुकुमनामा, साठेखत इ. कोणत्याही स्वरूपाचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **०७ (सात)** दिवसांचे आत मुळ कागदपत्रांसह आमचे कार्यालयात येऊन आमची खात्री पटवुन द्यावी अन्यथा सदरील मिळकत निर्वेध असल्याबाबतचा दाखला देण्यात येईल, तदनंतर कोणाच्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. सबब सदरची जाहिर नोटीस ही आमचे पक्षकार **सौ. राधिका गोकुळ वाकचौरे, श्री. गोकुळ कारभारी वाकचौरे** यांचे सांगणेवरून प्रसिध्दीस. कळावे. ही जाहिर नोटीस.

सिन्नर, दि. २५/०१/२०२५.

**आमचे मार्फत प्रसिध्द**

श्री. संदिप अशोक आहेर (ॲडव्होकेट )

सिन्नर न्यायालय, सिन्नर, जि. नाशिक. **मो.नं. ९९७५८३९५९७**



## सिन्नर नगरपरिषद, सिन्नर (जि.नाशिक)

### जाहीर निविदा सुचना

या जाहीर निविदा सूचनेद्वारे कळविण्यात येते की, सिन्नर नगर परिषदेस खालील तक्त्यातील सेवा घ्यावयाच्या आहेत. तरी इच्छुकांकरिता बावनिहाय स्वतंत्र निविदा नमुने सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत **दि. २७/०२/२०२५ पासुन** निविदा फॉर्म फी ना परतावा रक्कम भरून उपलब्ध केले आहेत. तसेच बयाणा रक्कम भरून दर भरलेले मोहरबंद निविदा लिफाफा पद्धतीने **अंतिमत: दिनांक १२/०३/२०२५ रोजी सायंकाळी ठिक ०६.००** वाजेपर्यंत सिन्नर नगर परिषद कार्यालयात पोहोच करावे.

| अ. क्र. | तपशील/विवरण | निविदा फॉर्म फी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | सिन्नर नगरपरिषद हद्दीतील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे. | रु.५००/- | रु.५०००/- |
| २ | सिन्नर नगरपरिषद हद्दीतील कुत्र्यांना पकडणे, त्यांचे निर्बिजीकरण करणे कामी शस्त्रक्रिया करणे, ॲन्टीरॅबीज लसीकरण करणे, कुत्र्यांना सांभाळणे, त्याच्या अन्न व पाण्याची व्यवस्था करणे कुत्र्यांना निवारागृह स्वच्छता ठेवणे व शस्त्रक्रिया उपरांत औषधोपचार करुन ज्या परिसरातुन कुत्रे पकडण्यात आलेले आहे परत त्याच परिसरात सोडणे. | रु.५००/- | रु.५०००/- |
| ३ | सिन्नर नगरपरिषद, सिन्नर आरोग्य विभागाकडील अग्निशमन गाडी दुरुस्ती करणे. | रु.५००/- | रु.५०००/- |

निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याच्या अधिकारासह सर्व अधिकार सिन्नर नगरपरिषदेने राखून ठेवले आहेत. मुदतीत प्राप्त न झालेले बयाणा रक्कम न भरलेल्या निविदा अग्राह्य राहतील.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**सिन्नर नगरपरिषद, सिन्नर**

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक



श्रीक्षेत्र सप्तशृंगगडावर महाशिवरात्र उत्सवाची पर्वणी

पान ६


# गांवकरी



बोराळे येथे महाशिवरात्रीनिमित्त कुस्त्यांची दंगल

पान ६


■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, बुधवार, दि. २६ फेब्रुवारी २०२५


## महत्त्वाचे




### साई आर्ट इन्स्टिट्यूटतर्फे महादेव शंकराची साकारली रांगोळी

**नाशिक : प्रतिनिधी**

महाशिवरात्रीनिमित्त भाभानगर, मुंबई नाका, नाशिक येथील साई आर्ट इन्स्टिट्यूटतर्फे नंदीसोबत भगवान महादेवांची २४ तासांत काढलेली रांगोळी आहे. या रांगोळीसाठी लेग पिगमेंट कलरचा वापर केला आहे. ही रांगोळी मोनाली गांगुर्डे, तृप्ती आहिरे यांनी काढली. त्यांना विवेक आंबेकर, कामिनी झिंझुरके यांचे सहकार्य लाभले आहे. तसेच त्यांना प्रमोद आर्वी यांनी मार्गदर्शन केले.

### महाशिवरात्री उत्सवाचे माणिकनगरमध्ये आयोजन

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी फाटा परिसरानजीक असलेल्या माणिकनगर येथील रामेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्री उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी संध्याकाळी ४ ते ९ या वेळेत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात पालखी मिरवणूक, गोपूजन, फटाक्यांची आतषबाजी आणि दूध महाप्रसाद वाटप असे विविध कार्यक्रम होणार आहेत. तसेच, न्यू जगदंब ब्रास बँड (नांदुर्डी, निफाड) यांचा विशेष सहभाग असणार आहे. हा सोहळा माणिकनगर येथील रहिवाशांकडून आयोजित करण्यात आला असून, युवासेना विस्तारक तथा महानगरप्रमुख प्रवीण चव्हाण आणि सकल हिंदू समाज, माणिकनगर, सिडको यांच्या विशेष प्रयत्नातून हा कार्यक्रम पार पडणार आहे. भाविकांनी या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### अहिर सुवर्णकार समाजाचा सामुदायिक विवाह सोहळा

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा अहिर सुवर्णकार समाज हरिओम वधू-वर सांस्कृतिक संस्थेच्या वतीने मार्च किंवा एप्रिल २०२५ मध्ये सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. समाजातील विवाह निश्चित झालेल्या वधू-वरांनी या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वधू-वरांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. संपूर्ण विवाह खर्च संस्थेच्या वतीने केला जाणार आहे. यात दोन्ही बाजूंच्या ५० लोकांच्या जेवणाचा खर्च, वधू-वरांचा पोषाख, वधूसाठी सोन्याचे मणी मंगळसूत्र, चांदीची जोडवी-पैंजण, संसारोपयोगी पाच भांडी तसेच बाहेरगावाहून येणाऱ्या पाहुण्यांसाठी राहण्याची आणि भोजनाची मोफत सोय करण्यात येणार आहे. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश थोरात (मो. ९८२२६ २४७५२), वर्षा हेमंत दंडगव्हाळ (मो. ९८२२१४०९९९), मनोज जानोरकर (मो. ७५८८७ ०७३७२) व शशिकांत अहिरराव (मो. ९८९०३८१६७९) यांनी समाजातील लोकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# सिडको विभागीय अधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या

## आंदोलकांकडून अरेरावी, विभागीय अधिकारी ढसढसा रडल्या

**सिडको : विशेष प्रतिनिधी**
**परिसरातील विविध भागात गेल्या काही दिवसांपासून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्यामुळे ठिकठिकाणी पाणीटंचाई जाणवू लागल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. तक्रारी करूनही सुरळीत पाणीपुरवठा होत नसल्याने मंगळवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास सर्वपक्षीय कार्यकर्ते तसेच सिडकोतील सामाजिक कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिकांनी थेट सिडकोत मनपाच्या विभागीय अधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करीत घोषणाबाजी करून अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.**





सिडको परिसरात विविध ठिकाणचा पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याने या आंदोलनकर्त्यांपैकी एकाने पाणीपुरवठा अधिकारी जितेंद्र चव्हाण यांना संपर्क साधला. यावेळी अधिकाऱ्यांनी आंदोलन करताना भिकारी शब्दाचा वापर केला होता. यामुळे मंगळवारी सकाळी आंदोलन करण्यात आले. यानंतर अधिकारी चव्हाण यांनी आंदोलनकर्त्यांची माफीही मागितली.

दरम्यान, यातील काही आंदोलकांकडून आंदोलकांना अरेरावी तसेच शिवीगाळ करण्यात आल्यानंतर महिला विभागीय अधिकारी चक्क ढसाढसा रडायलाच लागल्या. मी महिला अधिकारी असल्यामुळेच मला सर्व आंदोलकांनी टार्गेट केले असून, याबाबत आपण आयुक्तांना सविस्तर माहिती देऊन अरेरावी आणि शिवीगाळ करणाऱ्या कार्यकर्त्यांविरोधात फौजदारी कारवाई करण्याची मागणी आयुक्त मनीषा खत्री यांच्याकडे करणार असल्याचे सिडको मनपा विभागीय अधिकारी जयश्री बैरागी यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

यावेळी आंदोलकांनी पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अधिकारी रवींद्र धारणकर, एजाज काजी, कनिष्ठ अधिकारी जितेंद्र चव्हाण, तसेच विभागीय अधिकारी जयश्री बैरागी यांना तात्काळ पाणीपुरवठा सुरू करा, अन्यथा तुम्हाला काळे फासू, तुमच्यावर शाई फेकू, तुमच्या डोक्यात माठ फोडू, असे म्हणत काही आंदोलकांनी चांगलेच तोंडसुख घेतले तर काहींनी अधिकाऱ्यांना अरेरावीच्या भाषेत चक्क शिवीगाळ केली.

आंदोलकांचा पारा चांगलाच वाढल्याने विभागीय अधिकारी जयश्री बैरागी या ढसाढसा रडू लागल्या. तर काही आंदोलकांनी पाणीपुरवठा अधिकारी जितेंद्र चव्हाण यांना हात जोडून माफीही मागायला लावली होती. आंदोलन अधिक तीव्र स्वरूपात होऊ लागल्यानंतर विभागीय अधिकारी जयश्री बैरागी यांनी पोलिसांकडे जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर आंदोलकांनी त्या ठिकाणावरून काढता पाय घेतला.

> सिडकोतील विस्कळीत पाणीपुरवठा प्रश्न मार्गी लागत नसल्याने आम्ही शांततेच्या मार्गाने आंदोलन केले. कोणत्याही प्रकारे शिवीगाळ केलेली नाही. कार्यालयात बसण्यासाठी पुरेशी जागा नसल्याने आम्ही सर्व जमिनीवर बसलो.
>
> **- ॲड. प्रशांत जाधव,** (आंदोलनकर्ते)

> नवीन नाशिकच्या पाणीप्रश्नावरून दहा ते पंधरा नागरिकांनी विनापरवानगी कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. यावेळी अरेरावी अन् अक्षरशः शिवीगाळ करून अधिकाऱ्यांना माफी मागायला लावली. याप्रकरणी मनपा आयुक्तांची भेट घेऊन शिवीगाळ करणाऱ्या आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करणार आहे.
>
> **- जयश्री बैरागी** (सिडको विभागीय मनपा अधिकारी)

# 'त्या' धार्मिक स्थळाच्या जागेची ७/१२ नोंद अखेर रद्द

## अनवधानाने नोंद घेतल्याचा प्रांतांचा दावा

**नाशिक : प्रतिनिधी**
**शहरातील काठे गल्ली परिसरातील वादग्रस्त धार्मिक स्थळाचे अतिक्रमण शनिवारी (दि. २२) नाशिक महानगरपालिकेने हटविले. परंतु, संबंधित जागेबाबत वक्फ बोर्डाकडे सुनावणी सुरू असताना, केवळ वक्फ बोर्डाच्या पत्राच्या आधारे महसूल प्रशासनाने थेट सातबारावर नोंद लावली. आता ही नोंद अनवधानाने प्रमाणित झाल्याची कबुली देत नाशिकचे सहा.जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अर्पित चव्हाण यांनी स.नं ४८०/३अ/३ब/६ वरील फेरफार नोंद नं. २०६४५४ रद्द केली आहे.**

काठे गल्ली सिग्नलकडून भाभानगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या गट क्रमांक ४८०/३अ/३ब/६ येथे नाशिक महापालिकेच्या एकूण क्षेत्र १५५१.९० चौ.मी पैकी ओपन स्पेसव्यतिरिक्त २५७.३६ चौरस मीटर उर्वरित क्षेत्र आहे. यासंदर्भात महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरणाकडे खटला सुरू आहे. असे असतानाही न्यायाधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जुनेद शेख यांनी २५७.३६ चौरस मीटर उर्वरित क्षेत्राला सातपीर सय्यद बाबा दर्गा नाव लावण्याचे पत्र महसूल प्रशासनाला दिले होते. या पत्राची शहानिशा न करता तहसीलदार कुळकायदा व तहसीलदार नाशिक यांनी १४ नोव्हेंबर २०२४ अन्वये गावी फेरफार नोंद क्र. २०६४५४ घेतली. छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या मिळकतीबाबत सुनावणी सुरू असल्याचे त्यांच्या पत्रात नमूद न करता, मिळकतीवर हजरत सातपीर सय्यदबाबा दर्गा वक्फ यांचे नाव दाखल करण्याकामी पत्रव्यवहार केल्याचे समोर आले. त्यामुळे संबंधित मिळकतीबाबत दावा प्रलंबित आहे.

त्यामुळे ही नोंद मंजूर करताना ७/१२ च्या इतर हक्कात कोणताही दावा असल्याचा शेरा इतर हक्कात नमूद नव्हता. तसेच, राज्य वक्फ मंडळ यांच्याकडील ३ सप्टेंबर २०२४ मधील पत्रातील मुद्दा क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मौजे नाशिक येथील सर्व्हे नंबर ४८०/३अ+३६/६ यासी क्षेत्र २५७.३६ चौ.मी. संदर्भात वक्फ मंडळाचे नाव असल्याबाबत अभिलेखावरून दिसून येत नाही. तसेच मुद्दा क्र. ७ अन्वये महसूल विभागाचा शासन निर्णय दि. १३ एप्रिल २०१६ च्या तुरतुदीनुसार ७/१२ च्या मालकी रकान्यात संबंधित संस्थेचे नाव हजरत सातपीर सय्यद बाबा दर्गा, वक्फ, द्वारका या नावाची नोंद करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे; परंतु ही मिळकत वक्फ मंडळाची असल्याबाबत कोणत्याही प्रकारची कागदपत्रे किंवा पुरावे सादर केलेले नाहीत. त्यामुळे ही नोंद मंडळ अधिकारी यांच्याकडून अनवधानाने मंजूर करण्यात आली असल्याचे सांगत अपर तहसीलदार निकम यांनी नोंद रद्द करण्याचा प्रस्ताव सोमवारी (दि.२४) नाशिक प्रांतांकडे पाठवला होता. या प्रस्तावावर अवघ्या २४ तासांत उपविभागीय अधिकारी अर्पित चव्हाण यांनी निर्णय घेत स.नं. ४८०/३अ/३ब/६ वरील फेरफार नोंद नं. २०६४५४ रद्द केली आहे.

# मनपा आयुक्तांकडून कुंभमेळा कामांचा पाहणी दौरा

## कामाला गती देण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना

**नाशिक : प्रतिनिधी**
**आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मनपा प्रशासनाकडून तयारीसाठी आढावा घेण्यात येत आहे. मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी मंगळवारी २५ रोजी विविध प्राधान्य कामांचा पाहणी दौरा केला.**



सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या तयारीच्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिकेचे आयुक्त मनीषा खत्री यांच्या नेतृत्वाखाली विविध प्राधान्यकामांचा स्थळ पाहणी दौरा आयोजित करण्यात आला. या दौऱ्यात गर्दी नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन, वाहतूक सुलभीकरण, साधुग्राम उभारणी व रस्त्यांचे सुधारकाम यावर विशेष भर देण्यात आला.

मखमलाबाद परिसरातील रस्ता जोडणीसाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या अधिग्रहणाच्या प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. संबंधित अधिकाऱ्यांना प्रक्रियेची गती वाढवण्याचे निर्देश दिले. गंगापूर रोडकडे जाणाऱ्या पर्यायी मार्गासाठी जमिनीच्या अधिग्रहणाचे कामाचे अडथळ्यांचे निवारण करण्याचे आदेश देण्यात आले. गंगापूर रोडकडे जाणाऱ्या पर्यायी मार्गाच्या संभाव्य रेषेची पाहणी करण्यात आली. जलद काम पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्या.

रासबिहारी स्कूल एनएच -३ ते आरटीओ व कॅन्सर हॉस्पिटल ते मखमलाबाद रस्ता वाहतूक सुरळीत करण्यासाठी मिसिंग लिंक जागांची पाहणी करत त्याच्या ताब्यासाठी तत्काळ कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रयागराज कुंभमेळ्यातील अनुभव लक्षात घेऊन साधुग्राम व इतर उपयोगासाठी किती एकर जागा होऊ शकेल याचा अंदाज व अधिग्रहण प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. नगरनियोजन विभागाला प्राधान्याने ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले.

दौऱ्यात उपस्थित अधिकाऱ्यांना सर्व कामे निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. सिंहस्थ कुंभमेळा २०२७ दरम्यान येणाऱ्या भाविकांना उत्तम सुविधा देण्याचा व सुरळीत व्यवस्थापन करण्याचा महानगरपालिकेचा कटिबद्धतेने प्रयत्न आहे.

### आज मुख्यमंत्री घेणार बैठक

मुंबईत आज देवेंद्र फडणवीस मुंबईत सिंहस्थ कुंभमेळ्याची नियोजनाच्या दृष्टीने आढावा बैठक घेणार आहेत. त्यादृष्टीने काल आयुक्तांकडून प्राधान्यानुसार महत्त्वपूर्ण असणाऱ्या कामांचा पाहणी दौरा केला.

# उपवासाचे पदार्थ घेताना काळजी घेण्याचे अन्न व औषध प्रशासनाचे आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**

महाशिवरात्रीनिमित्त मोठ्या प्रमाणात अनेक भाविक विविध व्रत व उपास करतात. उपवासाच्या निमित्ताने जे अन्नपदार्थ घेतले जातात ते आरोग्यासाठी चांगल्या स्थितीत आहेत की नाही, याची खातरजमा न करता जे उपलब्ध आहे तसे साहित्य लोक घेतात. यात भगरमध्ये मोठ्या प्रमाणात बुरशीचा प्रादुर्भाव होत असल्याने त्यात विषद्रव्य तयार होतात. ३२ डिग्रीपर्यंतचे तापमान आणि आर्द्रता बुरशीच्या वाढीसाठी अनुकूल असल्याने अशी भगर जर खाण्यात आली तर मोठ्या प्रमाणात विषबाधेची शक्यता असते. भगर, शिंगाडा पीठ, राजगिरा पीठ यात बुरशीजन्य जंतूंची शक्यता नाकारता येत नसल्याने हे पदार्थ दुकानातून घेताना तपासून घेण्याचे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागातर्फे करण्यात आले आहे.

बाजारातून भगर, शिंगाडा पीठ, राजगिरा पीठ इत्यादी आणल्यानंतर ते व्यवस्थित निवडून स्वच्छ करणे आवश्यक आहे. विशेषतः पाकीट बंद असलेले पदार्थ हे अधिक सुरक्षित समजले जातात. पाकीट बंद पदार्थ घेताना जर लेबल नसलेली पाकिटे अथवा ती कुठल्या बाजूने फुटलेली असल्यास घेऊ नयेत. याचबरोबर खुली भगर, शिंगाडा पीठ, राजगिरा पीठ हे घेणे टाळावे. पाकिटावर देण्यात आलेले दिनांक व त्यावर नोंदविलेला अंतिम वापर दिनांक ग्राहकांनी आवर्जून तपासला पाहिजे. भगर साठविताना ती स्वच्छ कोरड्या ठिकाणी साठवावी. विशेषतः झाकण बंद डब्यात ठेवणे आवश्यक आहे. जास्त दिवस साठवलेले भगर खाऊ नये. भगरीचे पीठ विकत आणू नये. भगरीच्या पीठामध्ये वातावरणातील ओलावा शोषून घेण्याची क्षमता अधिक असते. त्यामुळे या पीठाला बुरशीची लागण होण्याची शक्यता जास्त असते हे लक्षात घेतले पाहिजे.

# जि.प. महिला व बालविकास विभागाचे संगणक, कराटे प्रशिक्षण

## पुढील आठवड्यापासून होणार सुरू; आत्मनिर्भर होण्याची संधी

**नाशिक : प्रतिनिधी**
**मुली व महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागामार्फत संगणकासह फॅशन डिझायनिंग, शिवणकाम, स्वसंरक्षणासाठी कराटे आदी प्रशिक्षण जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागातर्फे देण्यात येते. त्यासाठी टेंडर प्रक्रिया राबविण्यात आली असून, काही वर्क ऑर्डर देण्यात आल्या आहेत. पुढील आठवड्यात हे प्रशिक्षण सुरू होण्याची शक्यता आहे. गतवर्षी लाभार्थी न मिळाल्यामुळे हे प्रशिक्षण रद्द करण्याची वेळ आली होती. यंदा मात्र, हे प्रशिक्षण होण्यासाठी विभागामार्फत जोरदार प्रयत्न केले जात आहेत.**

अनुसूचित जाती, अनूसूचित जमाती आणि सेसमधून सर्वसाधारण महिला, मुलींना कॉम्पुटरसह टायपिंग, आरीवर्क, एम्ब्रॉयडरी, शिवणकाम, फॅशन डिझाइन, कराटे आदी प्रशिक्षण देण्यात येते, अशी माहिती जि. प. महिला व बालविकासचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रताप पाटील यांनी दिली. प्रशिक्षणामुळे बेसिक माहिती लाभार्थ्यांना होते. त्यातून प्रशिक्षणासाठी लाभार्थी टेंडरनुसार लाभार्थ्यांच्या रकमेत कमी-जास्त होत असते. दहा टक्के रक्कम लाभार्थ्याला भरावी लागणार आहे. साडेचार हजार जि.प. प्रशिक्षणाचे पैसे भरते. टेंडर प्रक्रिया राबविण्यात येते. काही गावांमध्ये अनुसूचित जाती अनुसूचित जमातीचे लाभार्थी कमी जास्त प्रमाणात असू शकतात. लाभार्थी संख्या तालुक्याप्रमाणे कमी-जास्त होऊ शकते.

लाभार्थ्यांची निवड ग्रामसभा, ग्रामपंचायत, अंगणवाडी सेविका काही स्वतः लाभार्थी येतात. यांच्यामार्फत बालविकास प्रकल्पाधिकारी यांच्याकडे जाते. यांच्याकडून एकत्रित यादी जिल्हा कार्यालयाकडे विषय समितीकडे यादी दिली जाते. त्यांच्याकडून जि.प. महिला व बालविकास विभागाकडे यादी येते. त्यानुसार टेंडर प्रक्रिया राबवून प्रशिक्षण दिले जाते.

विकास प्रेरणा
जिल्हा परिषद नाशिक

> कॉम्पुटर कोर्ससह कराटे प्रशिक्षण लवकरच सुरू होणार असून, टेंडर प्रक्रिया राबविण्यात आली आहे. वर्क ऑर्डर काही देण्यात आल्या आहेत. काही लवकरच निघतील. पुढील आठवड्यात प्रशिक्षण सुरू होण्याची शक्यता आहे.
>
> **- प्रताप पाटील,** उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला-बालविकास

महिला व बालकल्याण समितीद्वारा शासनाने मान्य केलेल्या २४ विविध कल्याणकारी योजना ग्रामीण भागात राबविण्यात येतात. या योजना राबवण्यासाठी शासनामार्फत अनुदान मंजूर करण्यात येते. तसेच प्रत्येक समितीचे पाच ते दहा टक्के जिल्हा परिषद यांच्या सेस निधीतून उपलब्ध करून योजना राबवाव्यात, अशी शासनाची अपेक्षा आहे. जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीसाठी जिल्हा परिषद प्रति दहा लाख रुपयांप्रमाणे जिल्हा नियोजन व विकास मंडळातून आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुद्धा महिला-बालविकास विभाग करते. जिल्हा परिषदेने व उत्पन्नाच्या दहा टक्के रक्कम त्यांचे क्षेत्रातील महिला व बालविकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी खर्च करणे अनिवार्य आहे. मात्र, या रकमेतील सर्व निधी जर त्या त्या वर्षी खर्च झाला नाही तर खर्च न झालेल्या शिल्लक निधी या योजनेसाठीचा अनुशेष म्हणून पुढील आर्थिक वर्षाच्या तरतुदीत समाविष्ट करण्यात यावा.

> महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीकडे एकूण २४ योजना राबवण्यासाठी दिल्या आहेत. मात्र, या समितीत ठराव होऊन इतरही योजना समितीला राबवता येतात. जिल्हा परिषदेतील महिला व बालकल्याण समितीद्वारे शासनमान्य विविध २४ कल्याणकारी योजना राबवल्या जातात. त्यापैकीच मुलींना कॉम्प्युटर प्रशिक्षण, ज्युदो कराटे प्रशिक्षण आरी वर्क एम्ब्रॉयडरी शिवणकाम करते. फॅशन डिझायनिंग आधी प्रशिक्षण दिले जात आहे. गतवर्षी योजनांसाठी लाभार्थी कमी मिळाल्याने या योजनेसाठी आलेला निधी परत करण्यात आला होता.






◀◀ एचसीएल टेक, टीसीएस, इन्फोसिसच्या शेअर्समध्ये मोठी आपटी ◀◀ पान ३


नाशिक आज

# गांवकरी

■ नाशिक, बुधवार, दि. २६ फेब्रुवारी २०२५





◀◀ एआयमुळे 'डीबीएस बँक' करणार ४,००० कर्मचारी कमी ◀◀ पान ३

## महत्त्वाचे



### डांगच्या हर्षाली बोरसेचा हैदराबादमध्ये डंका

**नाशिक : प्रतिनिधी**

डांगसौंदाणे येथील प्रगतिशील शेतकरी नथू काळू बोरसे यांची नात व रोशन नथू बोरसे यांची कन्या कुमारी हर्षाली रोशन बोरसे नाशिक येथे इयत्ता ३ रीमध्ये शिकत असून, तिने हैदराबाद (आंध्र प्रदेश) येथे अबॅकस नॅशनल लेव्हल चॅम्पियनशिप परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली. तिला प्रथम क्रमांकाची ट्राफी मिळाल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. विशेष म्हणजे, या परीक्षेसाठी नाशिक शहर व जिल्ह्यातील १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तिच्या या यशात हर्षालीची आई निकिता रोशन बोरसे यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. या यशाबद्दल डांगसौंदाणे येथील ग्रामस्थांतर्फे अभिनंदन होत आहे.

### नाशिकरोड रेल्वे स्थानकाला सावरकरांचे नाव देण्याची मागणी

**सातपूर : प्रतिनिधी**

नाशिकरोड रेल्वे स्थानकास स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे नाव देण्यात यावे, अशी मागणी विश्व हिंदू सेनेच्या वतीने निवासी जिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे खूप मोठे योगदान आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांना दोन वेळा आजन्म कारावासाची शिक्षा देण्यात आलेली होती. अंदमानच्या सेल्यूलर जेलमध्ये किती कष्ट व यातना झाल्या हे संपूर्ण जगाला माहीत आहे. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी भारतातच नव्हे तर परदेशातही क्रांतिकारकांना संघटित केले. भारताच्या स्वातंत्रता संग्रामात लढण्यासाठी प्रेरित केले. सावरकर यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावात झाला. भगूर ते नाशिकरोड रेल्वे स्टेशनचे अंतर हे अवघे ९ किलोमीटर इतके आहे. नाशिकरोड रेल्वे स्थानकाला तितक्याच आदर्श व्यक्तिमत्त्वाच्या महापुरुषाचे नाव देणे गरजेचे आहे. यावेळी नाशिक भाजप चिटणीस अॅड. महेंद्र शिंदे, दादा आरोटे, दत्ता पाटील, सतीश घैसास, विशाल जाधव, आनंद पाटील, संदेश पाठक, शिवकुमार पांडे, नीलेश ढाकणे, अर्जुन शिंदे, प्रसाद धोपावकर, विशाल साळवे, धीरज खोळंबे, दत्ता ढोकळे, शैलेश सावजी, सिद्धू खोचे, बाळा खाटेकर, प्रसाद वाघ आदी उपस्थित होते.








महाशिवरात्रीनिमित्ताने श्रीक्षेत्र कपालेश्वर, नारोशंकर, सोमेश्वर मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# महाशिवरात्रीनिमित्त सजली शिवमंदिरे

## शिवरात्रीच्या उत्साहाला उधाण

**नाशिक : प्रतिनिधी**

**आज (दि.२६) महाशिवरात्रीचा उत्साह शहर आणि उपनगरांमधून दिसून येत आहे. महाशिवरात्रीनिमित्त शिवमंदिरे सजली आहेत. शिवरात्रीच्या पूर्वसंध्येला मंदिरांची साफसफाई करण्यात आली होती. पानाफुलांनी सजावट करण्यात आली असून, मनमोहक रांगोळ्यांनी मंदिरांचा परिसर सजविण्यात आला आहे. पहाटेपासून भाविकांना दर्शनासाठी मंदिरे खुले ठेवण्यात आली असून, मंदिर परिसरात फळ, फुल, प्रसाद, विक्रेत्यांनी आपली दुकाने मांडली आहेत.**

शिवरात्रीनिमित्त अनेक ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, प्रसाद वाटपही करण्यात येणार आहे. शहरातील पंचवटीसह गोदाघाटावरील विविध शिवमंदिरे सजली असून, आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. महाशिवरात्रीनिमित्त भगवान महादेवांना अभिषेक, पूजा, पालखी, मिरवणूक, प्रवचन, प्रसाद वाटप आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कपालेश्वर मंदिरात चांदीच्या मुखवट्याची पूजा करण्यात येणार असून, सायंकाळी पालखी सोहळा होणार आहे. मंदिरात भाविकांना दर्शनासाठी नियोजन करण्यात आले आहे.

कपालेश्वरसह रामकुंडाजवळ बाणेश्वर, कपूरेश्वर, त्यागेश्वर, सिद्धपातळेश्वर, अर्धनारी नटेश्वर, विश्वेश्वर, नीलकंठेश्वर, तारकेश्वर, टाळकुटेश्वर आदी मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी होत असते. शहर आणि उपनगरांतील शिवमंदिरांमध्येही भाविक गर्दी करण्याची शक्यता आहे. सोमेश्वर, सर्वतीर्थ टाकेद, कावनई, बाणेश्वर, दोधेश्वर, नांदूरमध्यमेश्वर आदी ठिकाणीही यात्रा भरत असल्याने भाविकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. महाशिवरात्रीनिमित्त यात्राकाळात हंगामी व्यावसायिकांना रोजगार मिळत असल्याने यात्रोत्सव काळात विविध वस्तू, खेळणी, खाद्यपदार्थांची विक्री केली जाते.

## श्री बेलेश्वर महादेव मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा

### कंठभूषण संतोषगिरी महाराज, महंत भक्तिचरणदास महाराज यांची उपस्थिती

**पंचवटी : वार्ताहर**

**पंचवटीतील हिरावाडी रोडवरील क्षीरसागर कॉलनीत साकारलेल्या श्री बेलेश्वर महादेव मंदिराचा प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा श्रीसंत जनार्दन स्वामी आश्रमाचे कंठभूषण स्वामी संतोषगिरी पंचमुखी स्वामी महाराज, हनुमान मंदिराचे महंत डॉ. भक्तिचरणदास महाराज यांच्या उपस्थितीत झाला.**



सलग तीन दिवस धार्मिक कार्यक्रम पार पडले. तत्पूर्वी काढण्यात आलेल्या पालखी मिरवणुकीस भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. वास्तुविशारद शेखर ढिकले, माजी नगरसेवक हेमंत शेट्टी, रूपाली गावंड आदींसह ११ यजमान, ब्रह्मवृंदांच्या उपस्थितीत मंत्रोच्चारात श्रींचे पूजन, आरती, अभिषेक, करून प्राणप्रतिष्ठा झाली. त्यानंतर प्रसादाचा भाविकांनी लाभ घेतला. यावेळी माजी प्रा. सरिता सोनवणे, किरण सोनवणे, अॅड. गौरव गोवर्धने, शंकर हिरे, बबलू साबळे, कुणाल गोवर्धने, नीलेश गजभार, सागर दिघे आदींसह भाविक उपस्थित होते.

## एचपीटीच्या विद्यार्थ्यांनी घडविले संस्कृतीच्या इतिहासाचे दर्शन

**नाशिक : प्रतिनिधी**

**एचपीटी आर्ट्स अॅण्ड आरवायके सायन्स महाविद्यालयाच्या प्रांगणात इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनी भित्तिपत्र प्रदर्शनातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले.**






अभ्यास आणि संशोधन करून विद्यार्थ्यांनी हस्तकलेचा वापरून करून चित्र स्वरूपात संस्कृती, सण, उत्सव कला, परंपरांचा इतिहास साकार केला. नाट्यशास्त्र, विविध नृत्य व लोककला, आदिवासींची परंपरा, शंभर वर्षांपूर्वीचे नाशिक आणि आताचे नाशिक, लेणी, मंदिरे, मुघल काळातील स्थापत्य इत्यादींची मांडणी केली. एका विद्यार्थिनीने नाशिकमधील कोरीव त्रिरश्मी लेणी साकार केली. डॉ. मालती सानप यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी विविध विषयांची मांडणी केली. डॉ. रामदास भोंग, प्रा. प्रदीप पवार, प्रा. अंबादास महाले, डॉ. होनश्री पाटील आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. व्ही. एन. सूर्यवंशी यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. प्रशांत देशपांडे, इतिहास विभागप्रमुख डॉ. अतुल ओहाळ, आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रणव रत्नपारखी, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विजयकुमार वावळे आदी उपस्थित होते.

## मनपा क्षयरोग विभागामार्फत आरोग्य तपासणी शिबिर

**नाशिक : प्रतिनिधी**

**राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील संशयित क्षयरुग्ण, असंसर्गजन्य आजार, कॅन्सर इ. तपासणीकरिता काल चुंचाळे घरकुल योजना येथील आपला दवाखाना येथे मनपा क्षयरोग विभागामार्फत आरोग्य तपासणी शिबिर आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री, अध्यक्ष, मनपा क्षयरोग नियंत्रण सोसायटी, अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे, डॉ. तानाजी चव्हाण, उपाध्यक्ष, डॉ. शिल्पा काळे, सदस्य सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले.**

आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन डॉ. मयूर पाटील, उपायुक्त, अतिक्रमण मनपा, नाशिक डॉ. शिल्पा काळे, शहर क्षयरोग अधिकारी, मनपा, नाशिक, डॉ. विनोद पावसकर, नोडल ऑफिसर, सिडको, डॉ. योगेश कोशिरे, वैद्यकीय अधिकारी, क्षयरोग पथक, सिडको यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या आरोग्य तपासणी शिबिरासाठी आपला दवाखाना, चुंचाळे येथील कार्यरत आशा स्वयंसेविका घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून शिबिराबाबत माहिती दिली. या शिबिरामध्ये एकूण १९८ रुग्ण तपासले. त्यात स्त्रीरोग ४०, अस्थिरोग १८, जनरल ६९, दंतरोग २२, बालरोग ३९, त्वचारोग १० असे एकूण १९८ इतक्या रुग्णांना मोफत औषधोपचार केले. अतिजोखीमग्रस्त/संशयित अशा ६१ रुग्णांची संशयित क्षयरुग्ण म्हणून थुंकी नमुने व हँडल एक्स-रे मशीनद्वारे छातीचे एक्स-रे काढण्यात येऊन तपासणी करण्यात आली. सदर आरोग्य तपासणी शिबिरासाठी डॉ. विनोद पावसकर, नोडल ऑफिस, सिडको, डॉ. योगेश कोशिरे, वैद्यकीय अधिकारी, क्षयरोग पथक, सिडको. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम भारतकुमार झांबरे, भगवान भगत, महेंद्र खैरनार, अजय जाधव, स्वप्नील कोठावदे, संदीप गवळी, भालचंद्र लव्हारे, अपर्णा चौधरी, अमर गांगुर्डे, दीपराज चंद्रमोरे आदींनी परिश्रम घेतले.क्षयरोगाची लक्षणे असल्यास आरोग्य संस्थेमध्ये जाऊन तपासणी करावी, असे आवाहन करण्यात आले. या शिबिरात श्वास फाउंडेशन, सुपर टेक हॉस्पिटल यांचा सहभाग होता. डॉ. शिल्पा काळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



## अल्फ इंजिनिअरिंग कामगारांच्या मागण्यांना यश

### मार्शल कामगार युनियनचा विजय

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**अंबड एमआयडीसी येथील अल्फ इंजिनिअरिंग कंपनीच्या सी ११, एच २५, इ ६०, ६१ व ६२ या तिन्ही प्लांटमधील कामगारांसाठी मार्शल कामगार युनियनच्या नेतृत्वाखाली लढा दिला गेला आणि त्यांच्या महत्त्वपूर्ण मागण्या कंपनी व्यवस्थापनाने मान्य केल्या.**

यामध्ये कामगारांना योग्य वेळी ब्रेक देणे, पीएफ, इएसआयसी वेळेवर जमा करणे, दरवर्षी पगारवाढ, नियमानुसार काही कामगारांना कायमस्वरूपी नोकरी देणे, कायद्याने ठरवलेल्या नियमांनुसार दिवाळी बोनस देणे, तसेच युनियन सदस्य असलेल्या कामगारांना पुन्हा नोकरीवर घेणे या मागण्यांचा समावेश होता. कंपनी व्यवस्थापनाने या सर्व मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद दिल्याने मार्शल कामगार युनियन आणि कामगारांचे मोठे यश म्हणून हा निकाल समोर आला. यावेळी युनियनचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत खरात, तसेच मंगेश पालवे, सुजय धीवर, अनिल गौतम, नरेंद्र गावित, नीलेश चव्हाण, सुनील अहिरे, राहुल कोळी, दीपक घारे, रामा अंबोरे आणि शेकडो कामगार उपस्थित होते. या ऐतिहासिक विजयाचा कामगारांनी जल्लोषात आनंद साजरा केला असून, यामुळे कामगार हक्कांसाठी संघटनेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

## महाशिवरात्रीच्या निमित्ताने 'कवठ' आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत!

### अभिनव उपक्रम : केटीएचएम महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बनविले २५ खाद्यपदार्थ

**नाशिक : प्रतिनिधी**

**शेताच्या बांधावर सहज आढळणाऱ्या आणि औषधी गुणधर्म असलेल्या कवठ या फळाला आता जागतिक बाजारपेठ मिळणार आहे. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या केटीएचएम महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी 'कपिथ्या:' या नावाने उपक्रम सुरू करून कवठाच्या व्यापारीकरणाला नवी दिशा देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. या विद्यार्थ्यांनी केवळ कवठ विक्रीचा विचार न करता त्यावर प्रक्रिया करून २५ प्रकारचे वेगवेगळे खाद्यपदार्थ तयार केले आहेत.**



**नाशिक : केटीएचएम महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांच्या 'कपिथ्या:' या उपक्रमाला भेट देताना मविप्रचे शिक्षणाधिकारी व प्राध्यापकवृंद.**

हा उपक्रम विशेषतः महाशिवरात्रीच्या शुभमुहूर्तावर सुरू करण्यात आला आहे. कारण कवठ हे महादेवाचे अत्यंत प्रिय फळ मानले जाते. औषधी गुणधर्म, आयुर्वेदिक उपयोग आणि पौष्टिकता यामुळे कवठाचे महत्त्व प्राचीन काळापासून मान्यताप्राप्त आहे. मात्र, या फळाकडे अद्याप व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहिले गेले नव्हते. या विद्यार्थ्यांनी कवठाच्या उत्पादनावर संशोधन करून त्यापासून विविध खाद्यपदार्थ तयार करण्यास सुरुवात केली आणि स्थानिक शेतकऱ्यांना थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्याचा संकल्प केला आहे.

**पेटंटच्या माध्यमातून संरक्षित करणार**

या उपक्रमात वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थी नवनाथ आहेर, प्रतीक्षा वाघ, वैष्णवी विभंडिक, जयश्री महाले आणि निकम श्रावणी सहभागी आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. नितीन गायकवाड आणि वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. के. एम. खालकर व इतर सर्व प्राध्यापक यांची मोलाची साथ त्यांना लाभली आहे. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, डॉ. भास्कर ढोके, प्रा. डी. डी. जाधव, डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे, प्रा. शशिकांत मोगल यांनी स्वतः विद्यार्थ्यांच्या उपक्रमाला भेट देऊन या अभिनव संकल्पनेला पाठिंबा दिला आहे.

### कृषी आणि आयुर्वेद क्षेत्रासाठी नवा आदर्श

विद्यार्थ्यांच्या या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. 'कपिथ्या:' हा उपक्रम कृषी, आयुर्वेद आणि अन्नप्रक्रिया क्षेत्रात नवा अध्याय लिहिणार आहे.

### कवठापासून २५ प्रकारचे खाद्यपदार्थ

■ कवठ लोणचे - पारंपरिक चव, आरोग्यास लाभदायक, ■ कवठ कुट - जेवणासोबत खाता येणारा पौष्टिक पदार्थ ■ कवठ पोळी - गोडसर आणि आरोग्यासाठी फायदेशीर ■ कवठ तिखट चटणी - तिखट-चटकदार चव ■ कवठ आइस्क्रीम - वेगळी आणि थंडगार मिठाई ■ कवठ खीर - पोषणमूल्यांनी युक्त ■ कवठ जाम - ब्रेड व पराठ्यांसाठी उत्तम पर्याय ■ कवठ जेली - मुलांसाठी स्वादिष्ट आणि आरोग्यदायी ■ कवठ कँडी - गोडसर आणि तोंडाला पाणी सुटेल अशी ■ कवठ बिस्कीट - स्नॅक्ससाठी उत्तम ■ कवठ शिरा - सणासुदीला स्पेशल ■ कवठ वडी - मऊसर, गोडसर पदार्थ ■ कवठ प्रोटीन - आरोग्यासाठी पोषणयुक्त ■ कवठ कांजी - पारंपरिक हेल्दी ड्रिंक ■ कवठ पाणीपुरी - चटपटीत आणि वेगळ्या चवीची ■ कवठ गोड चटणी - आंबटगोड चव ■ कवठ चाट - स्ट्रीट फूडसाठी नवा पर्याय ■ कवठ सरबत - उन्हाळ्यातील थंडावा ■ कवठ चॉकलेट - मुलांसाठी अनोखा पर्याय ■ कवठ आचार - दीर्घकाळ टिकणारी चव ■ कवठ वाइन- आरोग्यास पोषक, ■ कवठ कढी- चवदार, ■ कवठ रबडी- चवदार आणि नैसर्गिक, ■ कवठ भेळ- चमचमीत आणि पौष्टिक, ■ कवठ अर्क- आयुर्वेदिक.


# संपादकीय

## रशियाच्या दिमतीला ट्रम्प



रशियाने युक्रेनवर लादलेल्या युध्दाला तीन तीन वर्षे झाली. युध्दाला संघर्ष २४ फेब्रुवारी २०२२ रोजी सुरुवात झाली होती. युध्द सुरू झाल्यानंतर अनेक देशांनी युक्रेनला पाठिंबा दिला. युक्रेनने आपल्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी मजबूत प्रतिकार केला. याचबरोबर युरोपीयन युनियनने युक्रेनला शस्त्रास्त्रे, दारूगोळा आणि आर्थिक सहाय्य दिले. अमेरिकेनेही युक्रेनची बाजू घेत लष्करी मदत दिली. पण, युक्रेनच्या बाजूने कोणताही देश युध्दात उतरला नाही. युध्द सुरू झाले तेव्हा तीन महिन्यांतच युक्रेनवर रशिया कब्जा मिळवेल, असे बोलले जात होते. पण, तीन वर्षे होऊनही युध्द काही थांबलेले नाही. आणखी किती काळ युध्द सुरुच राहील, याचा काही अंदाज नाही. युध्द थांबविण्याच्या अनेक देशांच्या आवाहनाला रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी अजिबात दाद दिली नाही. उलट युध्दात सहभागी झाल्यास गंभीर परिणाम होतील, असा इशारा पुतिन यांनी दिला होता. त्यात नाटोचाही समावेश होता. नाटो ही २८ देशांची एक संघटना आहे. यापैकी एखाद्या देशावर हल्ला झाला, तर सर्व देशांनी एकत्र येऊन हल्ला करणार्या देशाविरुद्ध लढायचे, असा नाटोचा करार आहे. युध्द सुरू झाले तेव्हा युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी आपल्या देशाचा समावेश नाटोमध्ये करण्याची विनंती केली होती. ती अद्याप मान्य झालेली नाही. अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प आल्यानंतर त्यांनी रशिया-युक्रेन युद्धाबाबत नवीन भूमिका घेत युक्रेन आणि त्या देशाचे अध्यक्ष झेलेन्स्की यांच्या विरोधात भूमिका घेतली आहे. यामुळे एकाकी पडलेल्या रशियाची बाजू मजबूत झाली आहे, तर युक्रेनची कोंडी होण्याची चिन्हे दिसत आहेत. भारताने या युध्दात अनेकदा तटस्थ भूमिका घेतली आहे. युध्द थांबावे, ही भारताची भूमिका आहे. ट्रम्प यांनी युध्द थांबविण्यासाठी पुढाकार घेतला असला, तरी त्यांनी रशियाची बाजू घेतल्याने युक्रेनचे काय होणार? हा प्रश्न उपस्थित झाला आहे. युध्दाला तीन वर्षे झाली असताना संयुक्त राष्ट्राच्या महासभेत युक्रेनकडून रशियाच्या विरोधात मांडण्यात आलेला प्रस्ताव मंजूर करण्यात आला. या प्रस्तावावर अमेरिकेने रशियाच्या बाजूने म्हणजे प्रस्तावाच्या विरोधात मतदान केले. याचा अर्थ ट्रम्प यांनी अमेरिकेची भूमिका बदलली. महासभेत युक्रेनने रशियाच्या घुसखोरीविरोधात प्रस्ताव मांडला. रशियाने तातडीने आपले सैन्य माघारी घ्यावे, ओलिस ठेवलेल्या नागरिकांची सुटका करावी आणि युक्रेनविरोधात पुकारलेल्या युद्धावर शांततापूर्ण मार्ग काढला जावा, अशी मागणी या प्रस्तावात करण्यात आली होती. प्रस्ताव बहुमताने मंजूर झाला. पण, काही सदस्य राष्ट्रांनी विरोधात मतदान केले, तर तर काही राष्ट्रांनी मतदान केले नाही. प्रस्तावाच्या बाजूने ९३ देशांनी मतदान केले. त्यात जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स व अमेरिका वगळता इतर जी-७ राष्ट्रांचा समावेश आहे. एकूण १८ देशांनी प्रस्तावाच्या विरोधात मतदान केलं. त्यात रशिया, अमेरिका, इस्रायल व हंगेरी या देशांचा समावेश आहे. तर तब्बल ६५ देशांनी मतदानासाठी गैरहजर राहण्याचा मार्ग स्वीकारला. रशिया व युक्रेन या दोन्ही देशांशी भारताचे चांगले संबंध राहिले आहेत. गेल्या तीन वर्षांत वेळोवेळी भारताने दोन्ही बाजूंचा समतोल साधणारी भूमिका मांडलेली आहे. याच भूमिकेला अनुसरुन भारताने कोणाच्याही बाजूने मतदान केले नाही, तर गैरहजर राहणे पसंत केले. ब्राझिल, दक्षिण आफ्रिका, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, कतार, इराण, इराक, ओमन, कुवैत, सीरिया, इथिओपिया, अर्जेंटिना, पाकिस्तान, बांगलादेश या देशांनी गैरहजर राहणे पसंत केले. याआधीच्या महासभेत जवळपास १४० सदस्यांनी युक्रेनच्या बाजूने मतदान केले होते. अमेरिका, जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स या देशांसह जी-७ देशांनी विरोधात भूमिका घेतल्याने जागतिक स्तरावर युक्रेनला असलेला पाठिंबा कमी झाला आहे. अमेरिकत ट्रम्प सत्तेवर आल्याचा हा परिणाम आहे. ट्रम्प यांनी याआधी झेलेन्स्की आणि युक्रेनवर बरीच टीका केली होती. रशियाने युध्द लादले, तरी ट्रम्प यांनी युद्ध सुरू केल्याबद्दल युक्रेनला दोषी ठरवले. रियाधमध्ये युद्ध थांबवण्यासाठी अमेरिका-रशिया यांच्यात चर्चा झाली. त्यानंतर ट्रम्प यांनी हे ही भूमिका मांडली. युध्द थांबविण्याच्या चर्चेत युक्रेनला सहभागी करुनही घेण्यात आले नाही म्हणून झेलेन्स्की यांनी निषेध नोंदवला. पण, ट्रम्प यांनी यावर निराशा व्यक्त केली. तुम्ही (युक्रेनने) हे युद्ध सुरू करायला नको होते. तुम्ही करार करू शकला असता. मी युक्रेनसाठी करार करू शकलो असतो. त्यामुळे त्यांना जवळजवळ सर्व जमीन मिळाली असती आणि एकही माणूस मारला गेला नसता, एकही शहर उद्ध्वस्त झाले नसते. असे विधान करुन त्यांनी युक्रेन आणि झेलेन्स्की यांनाच दोष दिला. रशिया काहीतरी करू इच्छित आहे. त्यांना युद्ध थांबवायचे आहे, असेही ट्रम्प यांनी म्हणत रशियाची बाजू घेतली. यावरुन अमेरिका आता युक्रेनच्या बाजूने नव्हे, तर रशियाच्या बाजूने उभा राहिला आहे. ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यात तणाव वाढत चालला आहे. ट्रम्प यांनी युक्रेनमध्ये निवडणुका झाल्या नसल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. युक्रेनमध्ये गेल्या दोन वर्षांपासून मार्शल लॉ असल्यामुळे निवडणुका झाल्या नाहीत आणि कधी होतील याची स्पष्टता नाही. त्यावरुन झेलेन्स्की हे निवडणुकीसाठी टाळाटाळ करत असल्याचा आरोप त्यांचे देशातील विरोधक करत आहेत. याकडे लक्ष वेधत ट्रम्प यांनी झेलेन्स्की यांना हुकूमशाह म्हटले होते. तेव्हापासूनच ट्रम्प हे विरोधात जाण्याचे संकेत मिळाले होते. युरोपीयन देशांतील नेत्यांनीही झेलेन्स्की यांच्यावर टीका केली. राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी लोकशाहीची मान्यता नाकारणे चुकीचे आणि धोकादायक असल्याचे जर्मन चान्सलर ओलाफ स्कोल्झ यांनी म्हटले होते. झेलेन्स्की यांचा पाच वर्षांचा अध्यक्षीय कार्यकाळ मे २९२४ मध्ये संपला. त्यानंतर त्यांनी निवडणुका घेणे अपेक्षित होते. मार्शल लॉ लागू करण्यात आला आहे. त्यामुळे तेथील निवडणुकांनाही स्थगिती देण्यात आली. युध्द काळात निवडणुका घ्यायच्या कशा? हा प्रश्न ट्रम्प विचारात घेण्यास तयार नाहीत. झेलेन्स्की यांच्या कारभाराचा युक्रेनला फटका बसला आहे. लाखो लोकांचा विनाकारण मृत्यू झाला, असेही ट्रम्प म्हणाले होते. ट्रम्प यांनी युध्द थांबविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्यांच्या प्रयत्नांना कितपत यश येणार? हा प्रश्न असला, तरी युक्रेनचा पाठिंबा अमेरिकेने काढून घेतल्याने रशियाची बाजू मजबूत झाली आहे.

## विचारधन



### कोणत्याही परिस्थितीत नामस्मरण शक्य आहे

मनुष्याची सर्व धडपड शाश्वत समाधान मिळविण्यासाठी चालू असते. ते समाधान फक्त भगवंताजवळ असल्याने समाधानासाठी प्रत्येक माणसाला भगवंताची गरज आहे. आपल्या सर्व धडपडीतून भगवंताच्या प्राप्तीचे समाधान आपल्याला मिळत नाही आणि त्याला परिस्थिती कारणीभूत आहे, असे सर्वजण सांगतात.

पण खरोखरच परिस्थिती आड येते किंवा काय हे आपण बघितले पाहिजे. परिस्थितीसंबंधी विचार करताना एक बाह्य परिस्थिती आणि दुसरी आंतर-स्थिती यांचा विचार करावा लागेल. बाह्य परिस्थितीचा विचार करताना प्रथम आपली शरीरप्रकृती आड येते. ही प्रकृती कशीही असली तरी भगवंताचे स्मरण आपल्याला करता येईल की नाही? प्रकृतीला कितीही क्षीणत्व आले, देहाला कितीही विकलता आली, तरी अंतकाळी भगवंताचे स्मरण करता येते, असे भगवंताने गीतेत सांगितले आहे.


देहाची अवस्था कोणतीही असली, तरी त्यामध्ये नामस्मरण करता येत नाही हे म्हणणे काही बरोबर नाही. तेव्हा, प्रकृती आड येते असे म्हणणे कितपत संयुक्तिक ठरेल? पुष्कळ लोक आर्थिक अडचणींसंबंधी कुरकूर करतात. पैसा नसल्याकारणाने प्रपंचात काळजी उत्पन्न होऊन भगवंताकडे लक्ष द्यायला सवडच मिळत नाही असे बरेचजण सांगतात. पण खरोखर तुम्ही मला सांगा, जगात भरपूर धन मिळवून वैभवाच्या शिखरावर पोहोचलेले कितीसे लोक नामस्मरण करतात? आजपर्यंत किती राजे लोक आपले राजवैभव लाथाडून भगवंताच्या प्राप्तीसाठी बैरागी झाले? आपल्याजवळ पैसा नसणे हे भगवंताच्या प्राप्तीच्या आड येते हे म्हणणे बरोबर नाही. उलट पैसा हा भगवंताची निष्ठा फार कमी करतो. पैसा असला की आपल्याला एक आधार आहे असे वाटते.

म्हातारपणी आपल्याला उपयोगी पडावा म्हणून पैसा साठवायचा प्रयत्न करावा, तर मी म्हातारपणापर्यंत जगेन याची खात्री कोणी द्यावी? सुख, समाधान हे पैशावर अवलंबून नाही. प्रत्येकाची गोतावळी ठरलेली आहे. वेताळाची स्वारी निघाली की, त्याच्याबरोबर पिशाच्चे निघायचीच आणि भगवंताची स्वारी निघाली की त्याच्याबरोबर दया, क्षमा आणि जिकडेतिकडे आनंदी वृत्ती ही असायचीच.

# 'हर हर महादेव'चे सामर्थ्य!

२६ फेब्रुवारी म्हणजे महाशिवरात्रीच्या दिनी प्रयागराज येथील महाकुंभात शेवटचे अमृत स्नान पार पडणार आहे. त्रिमूर्तीपैकी एक भगवान शिव हिंदूंचे प्रमुख श्रद्धास्थान आहे. सृष्टीचे निर्माणकर्ता श्री ब्रह्मदेव, पालनकर्ता श्री विष्णुदेव आणि संहारकर्ता श्री महादेव आहेत. म्हणूनच मृत्यू किंवा मोक्ष यावर श्री महादेवाचा अंकुश आहे, असे म्हटले जाते. गतजन्मातील पापकर्मांमुळे आपणास या जन्मात प्रारब्ध म्हणून मानसिक आणि शारीरिक व्याधी भोगाव्या लागतात. या सर्वांपासून मुक्ती देण्याचे कार्य श्री महादेव करतात, अशी अनेकांची धारणा आहे. शिवाचे भारतासह जगभरात कोट्यवधी भक्त आहेत. शिवाच्या नियमित उपासनेने भय, दुःख, रोग, दारिद्र्य नाहीसे होऊन जीवनात सुख, शांती आणि समृद्धी लाभते असा श्रद्धाळूंचा समज आहे. शिवाचे व्रत म्हणून अनेक जण सोळा सोमवार करतात. श्रावण महिन्यात सोमवारी निराहार राहतात. महाशिवरात्रीचे व्रत करतात. शिवाचे अघोरी उपासकही आहेत जे स्मशानात जाऊन शिवाची उपासना करतात. या सर्वांचे दर्शन आपल्याला यंदाच्या महाकुंभाच्या निमित्ताने झाले. 'ओम नमः शिवाय' हा शिवाचा मंत्र आहे तर 'हर हर महादेव' हा जयघोष आहे. ज्योतिर्लिंगांच्या स्थानी किंवा शिवाच्या मंदिरांत गेल्यावर 'हर हर महादेव'चा जयघोष आपल्याला हमखास ऐकायला मिळतो. 'हर हर महादेव' या जयघोषात प्रचंड सामर्थ्य आहे, त्यामुळेच हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनीसुद्धा स्वराजाच्या सैन्याचा म्हणजेच मावळ्यांचा जयघोष 'हर हर महादेव'च ठेवला होता.

वाराणसीतील आयएमएस बीएचयूच्या फॅकल्टी ऑफ डेंटल सायन्सचे डॉक्टर तोंडाच्या कर्करोगाच्या रुग्णांवर आगळ्या पद्धतीने उपचार करत आहेत. या ठिकाणी शस्त्रक्रिया झाल्यानंतर रुग्णांना दोन्ही हात वर करून 'हर हर महादेव'चा जयघोष करण्यास



सांगितले जाते. या अनोख्या उपचारामुळे रुग्णांना अवघ्या दोन महिन्यांत आराम मिळतो. डॉक्टरांनी तोंडावर शस्त्रक्रिया करताना रुग्णांच्या छातीचे काही स्नायू कापून त्यांचे रुग्णांच्या शस्त्रक्रिया केलेल्या भागावर

**प्रासंगिक**

**जगन घाणेकर**
**९६६४५५९७८०**

रोपण केले असता रुग्णांच्या हाताची आणि खांद्यांची हालचाल पूर्णतः थांबल्याचे लक्षात आले. ही हालचाल पूर्ववत होण्यासाठी फिजिओथेरपीचे नेहमीचे उपचार करूनही विशेष फरक पडला नाही; मात्र याच रुग्णांनी 'हर हर महादेव'चा जयघोष करत हात वर करण्याचा प्रयत्न केल्यावर हळूहळू अवयवांची हालचाल होऊ लागली आणि रुग्णांनाही आराम मिळू लागला. या आगळ्यावेगळ्या प्रयोगाची कर्करोगाच्या ३०० हून अधिक रुग्णांवर चाचणी करण्यात आली, त्यापैकी ८० टक्क्यांहून अधिक लोकांना विस्मयकारक आराम मिळाला, ज्या रुग्णांनी प्रतिदिन गांभीर्याने ही थेरेपी केली त्यांना दोन-अडीच महिन्यांत त्यांचे हात पूर्णतः वर करता येऊ लागले. फिजिओथेरपीवर लाखो रुपये खर्च करूनही जो परिणाम मिळू शकला नाही तो केवळ 'हर हर महादेव'च्या जयघोषाने अवघ्या दोन महिन्यांत मिळाला. येथील विद्याशाखा प्रमुख एच. सी. बरनवाल यांनी सांगितले की, वैद्यकीयशास्त्रात प्रथमच 'हर हर महादेव' ही थेरपी म्हणून जगभरात स्वीकारली गेली आहे. विद्याशाखेचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. अखिलेश सिंह यांनी सांगितले की, 'हर हर महादेव'च्या घोषाने आध्यात्मिक शक्ती निर्माण होते जिचा आध्यात्मिक स्तरावर लाभ तर होतोच, शिवाय ही एक अशी फिजिओथेरपी आहे ज्यामध्ये अधिक श्रम करावे लागत नाहीत. काशीच्या लोकांना नेहमीच्या बोलण्यात 'हर हर महादेव'चा जयघोष करण्याची सवय आहे; मात्र ही सवय म्हणजे सर्वांत अधिक परिणामकारक फिजिओथेरपी आहे हे त्यांनाही माहीत नाही. छत्रपती शिवरायांनी मूठभर मावळ्यांच्या बळावर पाच पातशाह्यांना धूळ चारली. हजारो मुघल सैन्यावर काही शेकडा मावळे तुटून पडत आणि त्यांच्यावर विजयही मिळवत. त्यांना ही शक्ती आणि सामर्थ्य देण्याचे काम 'हर हर महादेव'चा जयघोष करत असे हे आता लक्षात येते. भगवंताच्या नामामध्ये किती सामर्थ्य आहे हे आता विज्ञानाच्या पातळीवरही सिद्ध होऊ लागले आहे. कलियुगामध्ये समस्त संतांनीही नामजपाचे महत्त्व विशद केले आहे. नियमित नामजपाने मनाची शक्ती वाढून मन एकाग्र होते. विद्यार्थ्यांना अभ्यासात मन एकाग्र करण्यासाठी नामजप एक प्रभावी उपाय आहे. व्यावहारिक जगातील स्पर्धेमुळे ताण आणि नैराश्य यांनी अनेकांना ग्रासले आहे. मनावरील ताण नाहीसा करण्यासाठीही नियमित नामजप गुणकारी आहे. जिथे जिथे देवतेचे नाम आहे तिथे त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि शक्ती एकवटलेली असते, असे धर्मशास्त्र सांगते. त्यामुळे नामजपाच्या आध्यात्मिक स्तरावर लाभ तर होतोच, शिवाय मानसिक स्तरावरही होतो. ज्या नामाने दरोडेखोर वाल्याचा वाल्मीकी झाला त्या नामापुढे साधेसुधे आजार आणि रोग एवढे मोठे आहेत का?

# ज्योतिर्लिंग महात्म्य

हिंदू पौराणिक कथेनुसार, ज्योतिर्लिंग हे भगवान शिवाचे स्वरूप आहेत. समस्त हिंदूंचे आस्थेचे प्रतीक असलेले सर्वांच्या मनोकामना पूर्ण करण्याचे पवित्र स्थाने आहेत. भगवान शिवजींचे स्वरूप म्हणून संपूर्ण भारतभर बारा वेगवेगळ्या ठिकाणी स्थित आहे. ही तीर्थक्षेत्रे भगवान शिवाची सर्वांत पवित्र पूजास्थळे मानली जातात आणि दरवर्षी हजारो भक्त भेट देतात. या सर्व पवित्र प्रार्थना स्थळांना स्मरणासाठी संस्कृतमध्ये रचले. त्याला बारा ज्योतिर्लिंग मंत्र म्हटल्या जाते. हिंदू धर्मानुसार असे म्हटल्या जाते की, बारा ज्योर्तिलिंगाचे नावानुरूप मंत्र जर दररोज पहाटे व सायंकाळी स्मरण केल्यास पापांचा विनाश होतो. हा महाप्रभावी मंत्र पुढीलप्रमाणे बघूयात- सौराष्ट्रे सोमनाथंच श्रीशैले मल्लिकार्जुनम्। उज्जयिन्यां महाकालमोङ्कारममलेश्वरम् ।।१।। परल्यां वैद्यनाथंच डाकिन्यां भीमशंकरम्। सेतुबन्धे तु रामेशं नागेशं दारुकावने ।।२।। वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे। हिमालये तु केदारं घृष्णेशंच शिवालये ।।३।। एतानि ज्योतिर्लिानि सायं प्रातः पठेन्नरः। सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ।।४वरील मंत्रामध्ये हिंदू धर्मातील पवित्र तिर्थक्षेत्र तथा बारा ज्योतिर्लिंग यांच्या नामाचा उल्लेख आहे. या श्लोकाच्या पठणाने आपसूकच समस्त ज्योतिर्लिंगाचे स्मरण होते.श्लोकातील क्रमवारी प्रमाणे प्रथम ज्योतिर्लिंग म्हणजे सौराष्ट्र सोमनाथ येथे कपिला, हिरण आणि सरस्वती या तीन नद्यांचा संगम असल्यामुळे सोमनाथ हे ठिकाण प्राचीन काळापासून तीर्थक्षेत्र आहे.

द्वितीय ज्योतिर्लिंग म्हणजे श्रीशैलम. या क्षेत्राचा इतिहास सातवाहन काळापर्यंत सापडतो. चौदाव्या शतकातील प्रोलया वेमा रेड्डी या राजाचा कार्यकाळ हा श्रीशैलमचा सुवर्णकाळ मानला जातो. राजा प्रोलयाने पाताळगंगा म्हणून ओळखली जाणारी कृष्णा नदी ते श्रीशैलम असा मार्ग बांधला. यानंतर अतिशय ताकदवान अशा विजयनगर साम्राज्यात मुख्य मंदिराचे आणि दक्षिण टोकाकडील गोपुरांचे दगडी बांधकाम करण्यात आले. ज्योतिर्लिंगमंत्रातील तिसरे असे हे महाकालेश्वर ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्रांमध्ये भगवान शिवजींचे सर्वांत पवित्र निवासस्थान असे मानले जाते. हे मध्य प्रदेश राज्यात उज्जैन येथे आहे. रुद्र सागर तलावाच्या बाजूला हे मंदिर आहे. येथील शिवलिंग हे स्वयंभू स्थितीत विराजमान आहे असे समजले जाते. ओंकारेश्वर हे चौथ्या क्रमांकाचे ज्योतिर्लिंग असून, मध्य प्रदेश राज्याच्या खंडवा जिल्ह्यात आहे. हे नर्मदा नदीमध्ये शिवपुरी नामक बेटावर वसलेले आहे. हे स्थळ हिंदूंसाठी पवित्र चिन्ह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ॐच्या आकारामध्ये बनले आहे. ओंकारेश्वर व अमरेश्वर असे दोन मंदिर आहे. हे पवित्र क्षेत्र नर्मदा नदीकाठी असून, नर्मदा नदी भारतातील पवित्र नदी आहे. मध्य प्रदेशात प्रसिद्ध १२ ज्योतिर्लिंगांपैकी २ ज्योतिर्लिंगे आहेत. एक महाकालेश्वर नावाचे उज्जैनमध्ये तर दुसरे ओंकारेश्वर तेथेच स्थित आहे. ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे परळी वैजनाथ. हे महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात असून, परळी वैजनाथ हे दक्षिण मध्य रेल्वेवरील एक स्थानक आहे. परळी वैजनाथ हे परळी वैद्यनाथ म्हणूनही ओळखले जाते. महाशिवरात्रीच्या दिवशी वैद्यनाथ जयंती असते. तसेच ते परळी वैजनाथ तालुक्याचे मुख्यालय आहे. परळी येथील वैद्यनाथ मंदिर प्रसिद्ध असून, भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी

**विशेष**

**विनोद जाधव**

वैद्यनाथ ज्योतिर्लिंग हे जागृत समजले जाते. बारा ज्योर्तिलिंगापैकी सहावे ज्योर्तिलिंग म्हणजे भीमाशंकर. सह्याद्रीच्या पश्चिमेकडील पसरलेल्या भागात एका रांगेवरील उंच डोंगरावर भीमाशंकर आहे. पावसाळा व हिवाळ्यामध्ये हिरवेगार असे वातावरण सभोवताली सदैव हिरवाईने नटलेले असते.हेमाडपंथी कलेतील या मंदिराचे बांधकाम बाराव्या ते तेराव्या शतकातील आहे. सभामंडपाबाहेर भव्य घंटा आहे. हेमाडपंथी पद्धतीचे बांधकाम असलेल्या या मंदिराचा जीर्णोद्धार छत्रपती शिवरायांनी जीर्णोद्धार केला. छत्रपती शिवाजी महाराज येथे दर्शनास येत असत. राजे शिवराय व राजे संभाजी महाराजांनंतर पेशवे काळातही मंदिराचा जीर्णो द्धार झालेला दिसून येतो. हे ज्योतिर्लिंग सह्याद्रीच्या प्रमुख रांगेत असून, महाराष्ट्र राज्यातील अतिशय आकर्षक आहे. बारा ज्योतिर्लिंगांपैकी सातवे रामेश्वरम ज्योतिर्लिंग हे भारताच्या तमिळनाडू राज्यातील असून, रामेश्वरम शहरामधील एक भव्य शिवमंदिर आहे. पुराणानुसार श्रीराम चंद्रप्रभू यांनी येथील लिंगाची स्थापना केली अशी कथा आहे. आठवे ज्योतिर्लिंग असून, औंढा नागनाथ महाराष्ट्र राज्यातील हिंगोली जिल्ह्यात स्थित असे हे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. पूर्वीच्या काळी या स्थानाला 'दारुकावण' म्हटल्या जायचे. सध्या या शहराला औंढा म्हणून ओळख आहे. क्रूर औरंगजेबाने मंदिराची नासधूस केल्यावर अहिल्याबाई होळकर यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला.

विश्वेश्वर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी नववे ज्योतिर्लिंग आहे. शंकराचे हे रूप काशीत पूजले जाते. हे मंदिर पूर्वी वाराणसी येथे होते. काशीतील मुख्य विश्वनाथ मंदिर म्हणून पुराणात याचा उल्लेख आहे, मात्र मुस्लिम आक्रमकांनी हे मंदिर पाडले. या मंदिराच्या ठिकाणी मशीद उभारली. अनेक वर्षे दुर्लक्षित आणि मुस्लिमांद्वारे प्रतिबंधित राहिल्यावर तोरडमल राजाने या मंदिराचा जीर्णोद्धार केला, परंतु क्रूर औरंगजेबाने या मंदिरावर वक्रदृष्टी टाकून नासधूस केली. काही वर्षे उलटल्यावर अहिल्याबाई होळकर यांनी विश्वनाथाचे मंदिर बांधले. महाराष्ट्रातील नाशिकजवळचे त्र्यंबकेश्वर बारा ज्योतिर्लिंगापैकी दहावे ज्योतिर्लिंग आहे. येथे दर बारा वर्षांनी अर्ध सिंहस्थ कुंभमेळा भरत असून, येणारा २०२७ मध्ये राहील. येथे संत निवृत्तिनाथ महाराज यांची समाधी मंदिर आहे. पौष महिन्यात तेथे यात्रा भरते. पायीवारीने भाविक तेथे येतात म्हणून त्याला पौषवारीसुद्धा म्हणतात. गोदावरी नदीचाही उगम येथेच झाला असून, ती दक्षिणेकडे वाहत जाते. केदारनाथ मंदिर हे भगवान शिवशंकराचे भव्य मंदिर आहे. आपल्या देशाच्या उत्तराखंड राज्यातील केदारनाथ गावामध्ये स्थित असे हे दिव्य क्षेत्र असून, भाविकांसाठी थोडे खडतर प्रवासाचे आहे. केदारनाथ हिंदू धर्मातील सर्वांत पवित्र स्थानांपैकी एक असून, बारा ज्योतिर्लिंगांपैकी अकरावे ज्योतिर्लिंग आहे. हिमालय पर्वतामध्ये स्थित असलेल्या केदारनाथांचे भाविकांच्या सुरक्षेसाठी तेथील हिमवृष्टी व इतर नैसर्गिक संकटे लक्षात घेता काही काळ बंद असते. घृष्णेश्वर मंदिर हे एक प्राचीन शंकराचे मंदिर असून, बारा ज्योतिर्लिंगापैकी ज्योतिर्लिंग मंत्राप्रमाणे बारावे ज्योतिर्लिंग असून, छत्रपती संभाजीनगर जिल्हास्थित आहे. देवगिरी (दौलताबाद)पासून सुमारे ११ कि.मी. अंतरावर आहे. दगडात कोरलेल्या वेरूळ लेण्यांजवळ हे मंदिर आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे वडील शहाजीराजे भोसले व आजोबा मालोजीराजे भोसले यांनी या मंदिराचा प्रथमतः १६ व्या शतकात जीर्णोद्धार केला.

# अफाट कर्तृत्वाची जीवनगाथा!

महाराष्ट्राचे भाग्य थोर म्हणून या मराठमोळ्या मातीत बाराव्या शतकापासून संत निवृत्ती, ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, एकनाथ, नामदेव ही थोर संतश्रेष्ठ मंडळी, छत्रपती शिवाजी, संभाजी महाराज, बाजीराव पेशवे यांसारखे परमप्रतापी शूरवीर, लोकमान्य टिळक, न्या. रानडे, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांसारखी हिमालयाएवढ्या विशाल कर्तृत्वाची नररत्ने येथे जन्मली. त्यापैकी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे पर्वतासारखे कणखर मनाचे, आकाशाएवढ्या विशाल बुद्धीचे तर खरेच परंतु अग्निफुलासम तेजोमय कवी वृत्तीचे, दिग्गज प्रतिभेचे लोकोत्तर



महान पुरुषोत्तम होते. त्यांनी आपल्या दैवजात प्रखर बुद्धिमत्तेचा, विलक्षण ज्ञानशक्तीचा वापर धनार्जनासाठी न करता जाज्वल्य देशभक्तीसाठी केला.

तुजसाठी मरण ते जनन।
तुजविण जनन ते मरण।

या उदात्त भावनेने, निष्ठेने, समर्पण वृत्तीने उभे आयुष्यच नव्हे तर संपूर्ण कुटुंबच स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्यात उतरविले. शस्त्राची घाता शस्त्रची उत्तर या उद्देशाने एकत्र आलेल्या देशातील तरुण वर्गाच्या क्रांतिकारकांचे आधारवड ठरले. ब्रिटिश सरकारने त्यांना नामोहरम करण्यासाठी प्रदीर्घ तुरुंगवासाची शिक्षा दिली. मात्र, त्यांनी प्रचंड

**कटाक्ष**

**विजय भदाणे**

आत्मविश्वासाने न डगमगता ती अंदमानच्या काळ्या पाण्याची शिक्षा भोगली. कवी गदिमांनी त्यांचे यथार्थ वर्णन खालील काव्यपंक्तीतून केले आहे.त्यांच्या जीवनाचे सारच त्या प्रत्ययकारी शब्दात सामावले आहे. आकाशाहून विशाल भासे त्याचे व्यक्तित्व, कर्पूररसे जो जाळी आपले अवघे कर्तृत्व ! या महापुरुषाचे जीवन म्हणजे धगधगत्या अंगारा समान होते. त्यांच्या प्रखर विचाराच्या ठिणगीने देशभक्तीची अग्निफुले हातावर घेतलेल्या क्रांतिकारकांची निर्भीड फौजेने इंग्रजांना जेरीस आणले. सशस्त्र क्रांती करीत मरेपर्यंत झुंजेन मी असा निर्धार होता. स्वातंत्र्यवीर सावरकर खरोखर देवा घरचा चमत्कार होता. प्रखर बुद्धिमत्ता, जाज्वल्य देशभक्ती, स्वधर्म निष्ठा कणखर मन दुर्दम्य आत्मविश्वास दूरदृष्टी बेडर व झुंझार वृत्ती व सुधारणावादी वैज्ञानिक दृष्टिकोन अशा अगणित गुणांनी भरलेला सावरकरांचा जीवनपट होता. त्यांना महान प्रतिभाशक्ती लाभली असल्याने साहित्य क्षेत्रात साजेसी गरुडभरारी त्यांनी घेतली. काव्य, नाट्य, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, विचार प्रवर्तक लेख. साहित्याच्या सर्व प्रांतात त्यांची लेखणी विजेसारखी लीलया चमकली. अनेक पिढ्यांना संजीवनी देणाऱ्या या अलौकिक व्यक्तिमत्त्वाला ५९ व्या आत्मसमर्पण दिनी शतदा वंदन करताना इतकेच म्हणू या की, हे मृत्युंजय वीरा ! जाज्वल्य देशभक्तीच्या भास्करा ! खऱ्या भारतीयाच्या अंतःकरणात आपल्याविषयी नितांत श्रद्धा, आदर, आपुलकी, अभिमानाचा शुद्ध भक्तिभावाचा महासागर खळाळत आहे व राहील यात शंकाच नाही. तुजप्रति नमोस्तुते ! नमोस्तुते!

## जनमनाचे प्रतिध्वनी

### ॐ कपड्यांवर नकोच !

हल्ली ॐ नमः शिवाय । हा मंत्रजप लिहिलेले स्त्री आणि पुरुषांचे सदरे, शर्ट्स तयार कपड्यांच्या दुकानात विक्रीला ठेवलेले पाहायला मिळतात. महाशिवरात्र आणि श्रावण महिन्याच्या दरम्यान ऑनलाइन संकेतस्थळांवरसुद्धा अशा कपड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. बारा ज्योतिर्लिंग तसेच भगवान शिवाची पुरातन मंदिरे ज्या ठिकाणी आहेत अशा ठिकाणी या स्वरूपाच्या कपड्यांचे स्टॉल्स पाहायला मिळतात. महाशिवरात्रीनिमित्त प्राचीन शिवमंदिराच्या ठिकाणी भरणाऱ्या जत्रांमध्ये सुद्धा 'ॐ नमः शिवाय ।' मंत्रजप प्रिंट केलेले कपडे विक्रीसाठी ठेवलेले दिसून येतात, ज्यांना तरुणवर्गाकडून अधिक पसंती दिली जाते. अंगभर ॐ नमः शिवाय । हा मंत्रजप लिहिलेले सदरे परिधान करण्याची आता जणू फॅशनच येत चालली आहे. जीन्स पॅन्टवर अशा प्रकारचे सदरे घातलेले तरुण हल्ली सर्वत्र पाहायला मिळतात. 'ॐ नमः शिवाय ।' हा भगवान शिवाचा मंत्रजप असून, याच्या नियमित स्मरणाने शिव प्रसन्न होऊन आपली मनोकामना पूर्ण करतो, असे म्हटले जाते. यामध्ये ओम हा बीजमंत्र असल्याने या मंत्रात शक्तीही तेवढ्या प्रमाणात सामावलेली असते. त्यामुळे तो श्रद्धेने स्मरावा असे धर्मशास्त्र सांगते. धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाम अथवा प्रतिमा असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि त्या देवतेची शक्ती कार्यरत असते. ॐ नमः शिवाय श्र सारख्या या शक्तिशाली मंत्राचा हल्ली कपड्यांवर होत असलेला सुमार वापर मनाला खटकणारा आहे. मंत्रजप छापलेले कपडे घालून आपण आवश्यक ती शुचिर्भूतता पाळतो का? अशा प्रकारचे कपडे परिधान करून आपण कोणत्याही अपवित्र स्थळी जात असू, मद्यपान, धूम्रपान करत असू, मुक्तपणे वावरत असू तर तो प्रत्यक्ष शिवाचाच अवमान आहे. असे कपडे अन्य कपड्यांसोबत धुतानाही आपण विशेष काळजी घेत नाही. एकीकडे आपली शिवभक्ती दाखवण्यासाठी अशा प्रकारचे कपडे घालायचे आणि दुसरीकडे प्रत्यक्ष शिवाचाच अवमान करायचा अशाने शिवाची कृपा आपल्यावर होईल का? अशा प्रकारे मंत्रजपाचे कपडे परिधान करून आपल्या भक्तीचा देखावा करू नये.

**-मोक्षदा घाणेकर**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय :'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### क्रोमाने आणली एसी आणि एयर कूलरची त्याच दिवशी डिलिव्हरीची सुविधा

**नाशिक :** क्रोमाने आपल्या ग्राहकांना वाढत्या उष्म्यापासून दिलासा मिळवून देण्यासाठी एयर कंडिशनर व एयर कूलरची डिलिव्हरी त्याच दिवशी देण्याची सुविधा सुरू केली आहे. क्रोमाच्या गॅजेट्स आणि छोट्या उपकरणांची त्वरित डिलिव्हरी सेवा अतिशय यशस्वीपणे सुरू आहे. त्यापासून प्रेरणा घेऊन या ब्रँडने आपल्या ग्राहकांसाठी उन्हाळ्यातही गारवा मिळवणे सोपे केले आहे. क्रोमाचे ग्राहक आता जराही विलंब न लावता लगेचच गारव्याचा आनंद घेऊ शकतील. आपल्या सुविधेनुसार हव्या त्या चॅनेलमधून खरेदी करण्याचा सहजसोपा ओम्नीचॅनेल शॉपिंग अनुभव प्रदान करण्यासाठी क्रोमा नेहमीच प्रयत्नशील असतो, त्यांचाच एक भाग म्हणून आता तुमच्या जवळच्या क्रोमा स्टोर, क्रोमा डॉट कॉम आणि टाटा नेउ ॲपवर संध्याकाळी ६ वाजण्याच्या आधी ऑर्डर केलेल्या निवडक एसी आणि एयर कूलरची डिलिव्हरी त्याची दिवशी देण्याची सुविधा सुरु करण्यात आली आहे. इन्फिनिटी रिटेल लिमिटेड (क्रोमा) चे सीईओ शिबाशिष रॉय यांनी सांगितले, उन्हाळा सुरु झाला आहे, तुम्हाला त्याचा जराही त्रास सहन करावा लागू नये यासाठी एसी आणि एयर कूलरची त्याच दिवशी डिलिव्हरी देण्याची सुविधा आम्ही सुरु करत आहोत. क्रोमाला तुमच्या अजून जवळ आणण्याच्या आमच्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे. आम्हाला खूप आनंद होत आहे की, २८ शहरांमध्ये त्याच दिवशी डिलिव्हरीची सुविधा आम्ही देत आहोत. उन्हाळ्यातही गारवा मिळवणे आता सोपे आहे! तुमच्या जवळच्या क्रोमा स्टोर किंवा ऑनलाईन क्रोमा डॉट कॉम आणि टाटा नेउ वर खरेदी करा आणि एसी, कूलरची डिलिव्हरी त्याची दिवशी मिळवा. तुम्हाला आराम मिळवून देणे ही आमची प्राथमिकता आहे.

### ज्योतिर्लिंगांवरील आरती थेट बघण्याची संधी, केवळ जिओहॉटस्टारवर




**नाशिक :** महाशिवरात्री : द डिव्हाइन नाइट या १२ तासांच्या खास लाइव्ह स्ट्रीमद्वारे २६ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ६ वाजल्यापासून भक्तांना महाशिवरात्रीचा असामान्य आणि खोलवर स्पर्श करणारा अनुभव देण्यास जिओहॉटस्टार सज्ज आहे. हा पवित्र सण देशभरात किती भव्यतेने साजरा केला जातो याचे दर्शन हा कार्यक्रम घडवणार आहे. महाशिवरात्रीः द डिव्हाइन नाइट हा अशा प्रकारचा पहिलाच बहुस्वरूप, बहुस्थळीय, अनेक ठिकाणांहून स्ट्रीम होणारा कार्यक्रम एका दैवी सादरीकरणाद्वारे संपूर्ण देशाला एकत्र आणण्याची ग्वाही देतो. यामध्ये देशभरातील ज्योतिर्लिंगांवर होणाऱ्या २० हून अधिक आरत्यांचा थेट (रिअल-टाइम) अनुभव भक्तांना घेता येईल आणि घरबसल्या या सर्व उत्सवांमध्ये सहभागी होता येईल. वेगवेगळ्या स्ट्रीमिंग्जवरून थेट प्रक्षेपण होणार असल्याने सर्व ज्योतिर्लिंगांवरील २०हून अधिक आरत्यांमध्ये प्रेक्षक रिअल-टाइम सहभाग घेऊ शकतील. तंत्रज्ञान आणि परंपरा यांचा सुरेख मेळ साधत जिओहॉटस्टार देशभरात कोठूनही महाशिवरात्रीच्या उत्सवाचा अनुभव घेण्याचा आयुष्यभर स्मरणात राहणारा अनुभव देऊ करत आहे. प्रेक्षक या विधींमध्ये अखंडितपणे सहभागी होऊ शकतात आणि हा जादूई अनुभव जगू शकतात, या भव्य उत्सवात सहभागी होणे आजवर कधीही नव्हते तेवढे सोपे झाले आहे. अतिभव्य महाशिवरात्रीचा अनुभव घ्या, २६ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ६ ते सकाळी ६ या वेळेत, केवळ जिओहॉटस्टारवर!



**मुंबई : जीआयसी री यांनी MTD सोबत भागीदारी करून मीरा-भाईंदरमध्ये १००% कचरा वर्गीकरणास चालना दिली आहे, ज्यामुळे त्यांच्या शाश्वत विकासाच्या प्रतिबद्धतेला बळकटी मिळाली आहे. वॉर्ड १०, ११ आणि १२ मध्ये पायलट प्रकल्प म्हणून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाअंतर्गत ३८,६०४ घरं आणि ४,५४५ व्यावसायिक आस्थापनांना समाविष्ट करण्यात आले आहे. या उपक्रमाचे अधिकृत उद्घाटन १८ फेब्रुवारी २०२५ रोजी MTD कार्यालयात करण्यात आले. यावेळी जीआयसी रीचे असिस्टंट जनरल मॅनेजर स्नेहा नायर आणि सीनियर मॅनेजर - CSR नितेश भीमटे, स्थानिक महापालिका अधिकारी, हितधारक, समाजसेवक आणि स्वयंसेवक उपस्थित होते.**

### जॅक्सन इंजिनिअर्सकडून जीआयपीसीएलला १०० मेगावॅट सोलर मॉड्यूल्स वितरित

**नोएडा :** ऊर्जा आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात कार्यरत असलेल्या जॅक्सन समुहातील जॅक्सन इंजिनिअर्स लिमिटेडने गुजरात इंडस्ट्रीज पॉवर कंपनी लिमिटेड (ऋखझउङ) ला १०० मेगावॅट क्षमतेच्या सोलर पीव्ही मॉड्यूल्सचे यशस्वीरित्या वितरण केले आहे. गुजरातमधील खावडा (घहरींवर) येथे गुजरात इंडस्ट्रीज पॉवर कंपनीतर्फे उभारण्यात आलेल्या २,३७५ मेगावॅट क्षमतेच्या रिन्यूएबल एनर्जी पार्कसाठी हे सौर मॉड्यूल्स वापरले जाणार आहेत. भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणाला आणखी पुढे नेण्यासाठी त्याचबरोबर कार्बन उत्सर्जन घटविणे आणि दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी जीआयपीसीएलच्या समर्पणाला बळकटी देण्याच्या दृष्टीकोनातून हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे. जॅक्सन इंजिनिअर्स ही कराराची क्षमता साध्य करणारी पहिली कंपनी ठरली आहे. जॅक्सन सोलर मॉड्यूल्स अँड सेल्सद्वारे झएठउ (हेलिया प्लस) बायफेशियल या प्रमुख प्रकारच्या सोलर पॅनल्सचे सुमारे १,९०,००० युनिट्स उत्पादन करण्यात आलेले आहे आणि जॅक्सन इंजिनिअर्सने या युनिट्सचे यशस्वीरित्या वितरण केले आहे. कंपनीच्या या यशाबद्दल बोलताना जॅक्सन सोलर मॉड्युल्स अँड सेल्सचे सीईओ श्री. अनुराग गर्ग म्हणाले, या ऐतिहासिक प्रकल्पासाठी जीआयपीसीएलसोबत भागीदारी केल्याचा आम्हाला अतिशय अभिमान आहे. आमच्या टीमने अंमलबजावणीबाबत अत्तुत्तम कामगिरी करुन दाखविली आहे. तसेच कार्यक्षमता आणि विश्वासार्हतेसाठी नवीन मापदंडसुध्दा स्थापन केले आहेत.

# इन्फोसिस, टीसीएस, एचसीएल टेकच्या शेअर्समध्ये मोठी घसरण

## निर्देशांक सेन्सेक्स सलग पाचव्या घसरणीने ८५७ अंशांच्या नुकसानीसह ७४,५०० खाली झाला बंद

**मुंबई : भांडवली बाजारात सोमवारी झालेल्या मोठ्या समभाग विक्रीचा माहिती-तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्राला सर्वाधिक फटका बसला. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स सलग पाचव्या घसरणीने ८५७ अंशांच्या नुकसानीसह ७४,५०० खाली बंद झाला. उल्लेखनीय म्हणजे 'सेन्सेक्स'च्या ३० समभागांमध्ये सर्वांत वाईट कामगिरी करणाऱ्या पाचपैकी चार समभाग हे आयटी क्षेत्रातील होते.**

शेअर बाजारात एचसीएल टेक ३.३६ टक्क्यांनी, त्यानंतर टीसीएस (३.०३ टक्के), इन्फोसिस (२.८३ टक्के) आणि टेक महिंद्र (२.४२ टक्के घसरले) असा आयटी क्षेत्रात घसरणीचा क्रम राहिला. जगातील सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असलेल्या अमेरिकेची मंदावलेली वाढ आणि तेथील चलनवाढीच्या चिंताजनक ताजी आकडेवारी ही तेथील भांडवली बाजाराप्रमाणेच भारताच्या निर्यातप्रवण सॉफ्टवेअर सेवा क्षेत्राचीदेखील काळजी वाढविणारी ठरली. भारताच्या या २८२ अब्ज अमेरिकी डॉलरच्या निर्यातप्रवण क्षेत्रासाठी अमेरिका ही सर्वात मोठी बाजारपेठ असून, ती संकोचलेली असणे हे या क्षेत्रातील कंपन्यांच्या



व्यावसायिक कामगिरीसाठी आव्हानात्मक ठरेल. याच काळजीची प्रतिबिंब सोमवारच्या या समभागांच्या घसरणीत उमटले. शुक्रवारच्या सत्रात याच चिंतेपायी वॉलस्ट्रीटवर डाऊ जोन्स, एस अँड पी ५०० हे प्रमुख निर्देशांक पावणेदोन टक्क्यांनी, तर नॅसडॅक तब्बल २.२० टक्क्यांनी आपटला आहे.

'निफ्टी'साठी २८ वर्षांतील सर्वांत वाईट महिना!

देशांतर्गत बाजारात सोमवारी दिवसअखेर सेन्सेक्स ८५६.६५ अंश (१.१४ टक्के) घसरणीसह ७४,४५४.४१ पातळीवर स्थिरावला. दुसरीकडे निफ्टी निर्देशांक २४२.५५ अंश (१.०६ टक्के) तुटीसह २२,५५३.३५ वर बंद झाला. सलग पाचव्या घसरणीतून सेन्सेक्सने १,५४२.४५ अंश (२ टक्के) आणि निफ्टी निर्देशांक ४०६.१५ अंश अर्थात १.७६ टक्के गडगडला आहे. गंभीर बाब म्हणजे फेब्रुवारीच्या सुरुवातीपासून १४ कामकाज सत्रात निर्देशांकांसाठी केवळ दोन वाढीची राहिली असून, घसरणीची मालिका अशीच सुरू राहिली तर निफ्टीसाठी फेब्रुवारी महिना हा गत २८ वर्षांतील सर्वांत वाईट महिना ठरेल, अशी शक्यता आहे. चालू महिन्यांत परकीय गुंतवणूकदार संस्थांनी २३,७१० कोटी रुपये मूल्याच्या समभागांची बाजारात विक्री केली असून, २०२५ मधील त्यांची एकूण विक्री १ लाख कोटी रुपयांच्या घरात जाणारी आहे.

सेन्सेक्समधील महिंद्र अँड महिंद्र, कोटक महिंद्र बँक, नेस्ले आणि आयटीसी हे मोजके समभाग काहीशी वाढ साधताना दिसले. व्यापक बाजारात विक्रीचा जोर अधिक होता. परिणामी बीएसई स्मॉल कॅप निर्देशांक १.३१ टक्के आणि मिडकॅप निर्देशांक ०.७८ टक्क्यांनी गडगडला.

# अंबानी-अदानी आसाममध्ये एक लाख कोटी गुंतवणार

**मुंबई :**

ईशान्य भारतातील राज्य आसाम अलीकडच्या काळात वेगाने विकसित होत आहे. आसामच्या विकासाचा हा वेग आता आणखी वाढणार आहे. 'ॲडव्हान्टेज आसाम २.० इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर समिट २०२५' या परिषदेला सुरुवात झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमाचं उद्घाटन केलं. आसामचे राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य व मुख्यमंत्री हिमंत विश्व शर्मा यावेळी उपस्थित होते.

या बिझनेस समिटमध्ये रिलायन्स इंडस्ट्रीजचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी, अदानी समूहाचे प्रमुख गौतम अदाणी, जेएसडब्ल्यू समूहाचे सज्जन जिंदाल, एस्सारचे प्रमुख प्रशांत रुइया, वेदांताचे अनिल अग्रवाल यांच्यासह देश-विदेशातील अनेक मोठमोठे



उद्योजक सहभागी झाले आहेत. या बिझनेस समिटच्या माध्यमातून आसाममध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होणार आहे.

आसामची राजधानी गुवाहाटीमध्ये या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी रिलायन्स इंडस्ट्रीजचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी व अदाणी समूहाचे प्रमुख गौतम अदानी यांनी मोठ्या घोषणा केल्या. भारतातील हे दोन्ही मोठे उद्योजक व त्यांच्या कंपन्या आसाममधील विविध व्यवसाय क्षेत्रात गुंतवणूक करणार आहेत. दोन्ही उद्योजकांनी आसाममध्ये प्रत्येकी ५० हजार कोटी रुपये गुंतवणार असल्याचं जाहीर केलं आहे. रिलायन्स व अदाणी समूह राज्यात १,००,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहेत.

मुकेश अंबानी या कार्यक्रमाला संबोधित करताना म्हणाले, आमची रिलायन्स इंडस्ट्रीज कंपनी पुढील पाच वर्षांत आसाममध्ये ५०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. मी ऊर्जा व सृजनाची देवी माता कामाख्याकडे प्रार्थना करतो की त्यांनी केवळ आसामच नव्हे तर संपूर्ण भारताला आशीर्वाद द्यावा. आगामी काळात आम्ही आसाम राज्याला तंत्रज्ञानाचा स्वर्ग बनवू. आसाममधील तंत्रज्ञानप्रेमी तरुण आर्टिफिशियल इंटेलिजन्सला नवा अर्थ देतील.

अदानी समूहाचे चेअरमन गौतम अदाणी म्हणाले, आमचा समूह या राज्यात येत्या पाच वर्षांत ५०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करेल. राज्यातील विमानतळं, एअरोसिटी, सिटी गॅस वितरण, ट्रान्समिशन, सिमेंट व रस्त्यांचे प्रकल्प, उड्डाणपुलांच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करेल.

# सरकारी कंपन्यांच्या हिस्सा-विक्रीला गती; केंद्राच्या मदतीला मर्चंट बँकरची कुमक

**मुंबई :**

सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि सूचिबद्ध वित्तीय संस्थांमधील नियोजित हिस्सा-विक्री प्रक्रियेत केंद्र सरकारला मदत करण्यासाठी मर्चंट बँकर्सची मदत घेतली जाणार आहे. यासाठी गुंतवणूक व सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभाग अर्थात 'दीपम'ने निविदा मागविल्या असल्याचे सोमवारी स्पष्ट करण्यात आले.

'दीपम'च्या प्रस्तावानुसार, मर्चंट बँकर्सची नियुक्ती तीन वर्षांसाठी केली जाणार आहे. ही मुदत पुढे एक वर्षासाठी वाढविली जाऊ शकते. सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि वित्तीय संस्थांमधील निर्गुंतवणुकीबाबत मर्चंट बँकर्स सरकारला वेळोवेळी सल्ला देतील. भांडवली बाजार नियंत्रक संस्था 'सेबी'ने मंजूर केलेल्या कार्यपद्धतीनुसार हिस्सा विक्री करण्यास हे मर्चंट बँकर सरकारला साहाय्य करतील. या कामासाठी निविदा भरण्यासाची अंतिम मुदत ही २७ मार्च अशी ठरविण्यात आली आहे.

मर्चंट बँकर्स हे दोन्ही श्रेणींमध्ये यासाठी अर्ज करू शकणार आहेत. त्यात भांडवली बाजारातील व्यवहार हाताळण्याची क्षमता हा निकष असणार आहे. भांडवली बाजारात २,५०० कोटी रुपयांहून अधिक व्यवहार हाताळणारे मर्चंट बँकर 'ए प्लस' श्रेणीत आणि त्यापेक्षा कमी व्यवहार हाताळणारे मर्चंट बँकर 'ए' श्रेणीत अर्ज करू शकतात.

# 'न्यू इंडिया'च्या निम्म्या ठेवीदारांना पूर्ण रक्कम मिळणार!

**मुंबई :**

कोट्यवधींचा अपहार झाल्याचे आढळल्याने निर्बंध आलेल्या न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ठेवीदारांसाठी अटी शिथिल करणारा दिलासा देताना, रिझर्व्ह बँकेने येत्या गुरुवार, २७ फेब्रुवारीपासून प्रत्येक ठेवीदाराला त्याच्या खात्यातून २५,००० रुपयांपर्यंत पैसे काढण्याची परवानगी देण्याचा निर्णय सोमवारी घेतला.

मुंबईस्थित या सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून, रिझर्व्ह बँकेने १३ फेब्रुवारी रोजी तिच्यावर लादलेल्या निर्बंधांमुळे खातेदारांना त्यांच्या ठेवी काढण्यावर बंदी आहे. बँकेतील घोटाळ्याशी संबंधित मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे विभागाकडून तपास सुरू असून, अद्यापपर्यंत तीन जणांना अटक करण्यात आली आहे. बँकेचे माजी अध्यक्ष हिरेन भानू




आणि त्यांच्या पत्नी व बँकेच्या माजी उपाध्यक्षा गौरी भानू हे मात्र देशाबाहेर फरार झाले आहेत.

सोमवारी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात, 'न्यू इंडिया'वर नियुक्त प्रशासकाशी सल्लामसलत करून बँकेच्या रोखतेच्या स्थितीचा आढावा घेतल्याचे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे. बँकेकडील रोख पाहता, २७ फेब्रुवारीपासून प्रत्येक ठेवीदाराला २५,००० रुपयांपर्यंत ठेव काढण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

रिझर्व्ह बँकेने बँकेचे कामकाज पाहण्यासाठी स्टेट बँकेचे माजी मुख्य महाव्यवस्थापक श्रीकांत यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे. प्रशासकांना मदत करण्यासाठी 'सल्लागार समिती' देखील नियुक्त करण्यात आली आहे. प्रशासकाच्या सल्लागार समितीची पुनर्रचना करण्यात आली असून, त्यात आता स्टेट बँकेचे माजी महाव्यवस्थापक रवींद्र सप्रा, सारस्वत सहकारी बँकेचे माजी उपमहाव्यवस्थापक रवींद्र तुकाराम चव्हाण आणि सनदी लेखापाल आनंद एम. गोलास यांचा समावेश करण्यात आला आहे.

अटीतील नवीन शिथिलतेमुळे, एकूण ठेवीदारांपैकी ५० टक्क्यांहून अधिक ठेवीदार हे खात्यातील संपूर्ण शिल्लक रक्कम काढू शकतील, असे रिझर्व्ह बँकेने स्पष्ट केले आहे.

ठेवीची रक्कम काढण्यासाठी खातेदार बँकेच्या शाखेचा तसेच एटीएमचा देखील वापर करू शकतील. तथापि, काढता येणारी एकूण रक्कम प्रति ठेवीदार २५,००० रुपये किंवा त्यांच्या खात्यात उपलब्ध असलेली शिल्लक यापैकी जी कमी असेल ती, या मर्यादेतच असावी, असे रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे.

# भारतीय तंत्रज्ञान क्षेत्रासाठी अमेरिकेची बाजारपेठ अनिश्चित

## 'नासकॉम'चे अध्यक्ष नांबियार यांचे मत

**मुंबई :**

भारतीय माहिती तंत्रज्ञान (आयटी) उद्योगासाठी सर्वांत मोठी असलेली अमेरिकी बाजारपेठेला अनिश्चिततेचा पदर आहे, असे मत नासकॉमचे अध्यक्ष राजेश नांबियार यांनी सोमवारी प्रतिपादन केले.

नांबियार म्हणाले की, अमेरिकेकडून व्यापार शुल्क लादले जाण्याचा धोका आहे. यामुळे अमेरिकी बाजारपेठेबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. व्यापार शुल्क लादले जाईल का आणि त्यातून अमेरिकी बाजारपेठेवर काय परिणाम होतील, हे अद्याप स्पष्ट नाही. आयटी क्षेत्राच्या महसुलात अमेरिकेचे योगदान ६० ते ६२ टक्के असून, ही बाब विसरता येणार नाही. सध्याच्या परिस्थितीत तरी ही बाजारपेठ अनिश्चित दिसत असून, पुढे काय घडेल हे आताच सांगता येणार नाही.

इन्फोसिसचे मुख्याधिकारी व व्यवस्थापकीय संचालक सलील पारेख म्हणाले की, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयांबद्दल भारतीय आयटी क्षेत्राने भीती बाळगण्याची आवश्यकता नाही. ट्रम्प प्रशासनाने घेतलेल्या निर्णयांमुळे अमेरिकी कंपन्यांचा फायदा झाल्यास त्यातून भारतीय आयटी कंपन्यांनाही फायदा होणार आहे. कारण याच अमेरिकी कंपन्या भारतीय कंपन्यांच्या ग्राहक आहेत. इन्फोसिसने गेल्या काही वर्षांत अमेरिकेतील मनुष्यबळात ६० टक्के



स्थानिकांना प्राधान्य दिले आहे. यामुळे कंपनीचे एच-१ बी व्हिसावरील अवलंबित्व कमी झाले आहे.

**आगामी आर्थिक वर्षात महसूल ३०० अब्ज डॉलरपुढे**

भारतीय माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचे महसुली उत्पन्न आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ५.१ टक्क्यांनी वाढून २८२.६ अब्ज डॉलर आणि आगामी २०२६ आर्थिक वर्षात ते ३०० अब्ज डॉलरचा टप्पा ओलांडण्याची शक्यता आहे, असे 'नासकॉम'चे अध्यक्ष राजेश नांबियार यांनी सोमवारी सूचित केले. महसूल वाढ योग्य मार्गावर आहे, असे ते म्हणाले. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ४ टक्के, आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ५.१ टक्के आणि आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ६.१ टक्क्यांच्या वाढीसह ३०० अब्ज डॉलरचा टप्पा गाठला जाईल, अशी अपेक्षा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ई-व्यापारासह देशाच्या तंत्रज्ञान क्षेत्राने चालू आर्थिक वर्षात १.२६ लाख नवीन नोकरभरती केली आणि २०२६ मध्ये या क्षेत्रातील एकूण मनुष्यबळ ५८ लाखांवर जाणे अपेक्षित आहे.

# पुन:प्रदर्शनानंतरही 'सनम तेरी कसम' चित्रपटाने रसिकांच्या मनावर केले राज्य

**मुंबई :**
'सनम तेरी कसम' हा २०१६ मधील रसिकप्रिय रोमँटिक चित्रपट त्याच्या मूळ प्रदर्शनाला बरोबर नऊ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधत ७ फेब्रुवारी २०२५ रोजी चित्रपटगृहांमध्ये पुन्हा प्रदर्शित झाला. पहिल्या प्रदर्शनाच्या वेळेस 'सनम तेरी कसम' बॉक्स ऑफिसवर यश मिळविण्यात यशस्वी झाला नाही, परंतु कालांतराने या चित्रपटाने कल्ट लोकप्रियता मिळविली. त्यातील भावनिक कथानक आणि भावपूर्ण संगीताशी चाहते खोलवर जोडले गेले आहेत. त्याच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे चाहत्यांनी हा चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्याची



मागणी केल्यामुळे चाहत्यांच्या प्रेमामुळे चित्रपटाला मिळालेले पुनरुज्जीवन अभूतपूर्व उंचीवर नेऊ शकते, हे त्यातून सिद्ध झाले आहे.

पुनःप्रदर्शनानंतर लगेचच हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणारा ठरला. 'सनम तेरी कसम' ने २०१६ मध्ये पहिल्यांदा ९ कोटी रुपयांची कमाई केली होती, मात्र १७ फेब्रुवारी २०२५ पर्यंत त्याने तब्बल ३६ कोटी रुपयांची कमाई केली आहे. पुन्हा प्रदर्शित झालेल्या चित्रपटाने केवळ २०२५ मध्ये २७ कोटी रुपयांची कमाई करणे हे अद्भुत आहे. चाहत्यांचा दमदार प्रभाव, दर्जेदार कथाकथनाचे महत्त्व गहन भावनिक संबंध आणि अविस्मरणीय अभिनय हे या उल्लेखनीय कामगिरीतून अधोरेखित झाले आहे. या अल्बममधील ९ पैकी ८ गाण्यांनी स्पॉटिफायवर प्रतिष्ठेच्या टॉप २०० यादीत स्थान मिळवले आहे.


# एआयमुळे 'डीबीएस बँक' करणार ४,००० कर्मचारी कमी

**मुंबई :**

बँकिंग क्षेत्रातील प्रमुख जागतिक वित्तीय समूह 'डीबीएस बँके'ने पुढील तीन वर्षांत कर्मचाऱ्यांची संख्या १० टक्क्यांनी कपातीचे नियोजन असल्याचे जाहीर केले. बँकेच्या विविध कार्यांमध्ये कृत्रिम प्रज्ञा (एआय) तंत्रज्ञानाचा खोलवर सुरू असलेला अवलंब हे नोकरकपातीमागील कारण आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी पीयूष गुप्ता यांनी सोमवारी स्पष्ट केले.

गुप्ता म्हणाले की, एआय हे भूतकाळात स्वीकारल्या गेलेल्या इतर कोणत्याही तंत्रज्ञानापेक्षा वेगळे आहे आणि त्याची परिणामकारकताही खूप मोठी असेल. सिंगापूरस्थित या बँकेच्या १५ वर्षांहून अधिक कार्यकाळात नवीन नोकऱ्या निर्माण करण्याऐवजी कपातीसाठी योजना करावी लागण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

देशाच्या माहिती-तंत्रज्ञान उद्योगाचे वार्षिक मंथन असलेल्या 'नासकॉम'मधील एका परिसंवादात बोलताना, डीबीएसचे भारतातील मुख्य कार्यकारी अधिकारी पीयूष गुप्ता म्हणाले, 'माझा सध्याचा अंदाज असा आहे की, पुढील तीन वर्षांत, आम्हाला आमच्या कर्मचाऱ्याची संख्या ४,००० किंवा १० टक्क्यांनी कमी करावी लागणार आहे.' या मनुष्यबळ कपातीमागची कारणमीमांसा करताना, एआय हे




असे शक्तिशाली तंत्रज्ञान आहे, ज्यात सृजन क्षमताही आहे आणि ते हुबेहूब (कामाची) नक्कल देखील करू शकते, असे त्यांनी नमूद केले.

गेल्या १० वर्षांत समूहाकडून केव्हाही नोकरकपात केली गेलेली नाही, असे नमूद करून गुप्ता म्हणाले, २०१६-१७ मध्ये बँकेने डिजिटल परिवर्तन सुरू केले. ज्याच्या त्यावेळी १,६०० लोकांवर परिणाम झाला होता. परंतु त्यापैकी जवळजवळ सर्व जणांना संस्थेअंतर्ग चर्चा आणि इतर प्रतिनिधींशी सल्लामसलत करून पुन्हा वेगवेगळ्या जबाबदाऱ्यांवर नियुक्त केले गेले. तथापि, एआयच्या युगातील सध्याचे आव्हान हे देखील कर्मचारी वर्गाचे पुनर्निर्माण कसे करायचे याभोवती फिरत आहे.


नंतर जारी करण्यात आलेल्या अधिकृत निवेदनात डीबीएस बँकेने स्पष्ट केले की, पुढील तीन वर्षांत ४,००० कर्मचाऱ्यांची नियोजित कपात ही प्रामुख्याने कंत्राटी आणि तात्पुरत्या कर्मचाऱ्यांशी संबंधित असेल. सेवानिवृत्ती, दुसऱ्या ठिकाणी संधी म्हणून नोकरी सोडून जाणाऱ्यांमुळे देखील कर्मचारी वर्गात नैसर्गिक कपात होईल, असे बँकेने म्हटले आहे.

येत्या काही वर्षांत तात्पुरत्या आणि कंत्राटी भूमिका सुरू होत असताना, एकूण पटावरील मनुष्यबळ कमी होईल.

डीबीएसने दोन वर्षांपूर्वी जनरेटिव्ह एआय सोल्यूशन्सची अंमलबजावणी सुरू केली आणि त्याचे संपूर्ण फायदे अद्याप दिसून आलेले नाहीत, असे गुप्ता म्हणाले. तथापि या नवतंत्रज्ञानावर पूर्णपणे अवलंबून राहण्याबाबत बँकेची सावध भूमिका आहे. सध्या समूहाकडून एआयचा व्यवसायातील वापर हा ग्राहकांशी संपर्क आणि समस्या निवारण, कर्ज मंजूरी व पत मूल्यांकन प्रक्रिया आणि भरती यांचा समावेश आहे, असे गुप्ता म्हणाले. २०१२-१३ मध्ये एआय तंत्रज्ञानाचा डीबीएसमधील प्रारंभिक अवलंब फारसा यशस्वी ठरला नव्हता.

गांवकरी प्रतिमा
नाशिक, बुधवार,
दि. २६ फेब्रुवारी २०२५

# नवे स्वप्न... नवी पहाट...



ती निघाली पुन्हा नव्या पहाटेला सोबत घेऊन...

किलबिलणाऱ्या पाखरांना न्याहाळत..

येते आठवण तिलाही स्वतः स्वैर होण्याची...

गिरक्या घेऊ लागतात विचार तिच्याही मनात....

नेहमीच्या जबाबदाऱ्यांमध्ये जखडलेली अशी, स्त्रीही पुरुषापेक्षा नक्कीच खंबीर मानली जाते. स्वतःच्या जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी नेहमी तत्पर असते. जबाबदारीचे ओझे नकोशी झाले असता ती कधी व्यसनाधीन होत नाही .. तिचे स्वतःचे स्वप्न स्वतःचे अस्तित्व संसाराच्या रहाटगाडग्याच्या ओझ्याखाली दडून जातात. हे तिचेही तिला कळत नाही इतकी समरस होती ती आपल्या मानलेल्या संसाररूपी विश्वात ...कधी या चौकटी बाहेर पडण्याचा विचारही तिला येत नसेल का? पंखांमध्ये नवी उभारी भरून नव्या उमेदीने नवे स्वप्न बघण्यासाठी तिलाही भावना नसतील का? ज्यावेळी कधी चौकटीच्या बाहेर पडताना घराचा उंबरठा ओलांडते त्यावेळी थोड्या वेळासाठी तिला स्वतःचे स्वप्न, स्वतःसाठी नवी पहाट निर्माण करायची वाटत असेलही

सौ. शुभांगी माळी
नाशिक

कदाचित. थोड्या वेळाने पुन्हा अंतरंगात डोकावून पाहता ती आपली नवी पहाट नवे स्वप्न घरट्यात चिमण पिलांसोबत सोडून आल्याचे तिला जाणवते. आणि ती पुन्हा निघते परतीच्या प्रवासाला आपल्या घरट्यात सोडलेल्या अपूर्ण स्वप्नांना रंग भरण्यासाठी. चिमणपिलांनी नांदत्या भरल्या घरट्याकडे स्वतःच्या स्वैर स्वप्नांना बाजूला ठेवत.

ती आज खंबीर होऊ लागलेली आहे स्वतःला सिद्ध करण्यासाठी. विटा उचलणाऱ्या बिगारी कामापासून तर एखाद्या ऑफिसात बसलेल्या साहिबिनपर्यंत वाटा कदाचित असू शकतात. भिन्न तिच्या वेदना मात्र त्याच सामावलेल्यात तिच्या त्या बाईपणाच्या..

या वेदनांच्या ओझ्याखाली ती जरी आज जगते आहे तरी स्वतःच्या वेदनांना फुंकर घालत तोल सावरत तीच खंबीरपणे उभी राहते. स्वतःला सिद्ध करत असते. समोर येऊन उभ्या ठाकलेल्या नवनवीन आव्हानांना आश्वासनांना सामोरे जाते.कधी रणरागिणीसारखी झाशीची राणी बनून लढते तर कधी जिजाऊ बनवून मुला बाळांना संस्कारी विनयशील करण्यासाठी प्रयत्न करते. आजच्या नव्या पिढीचा ती खंबीर आधार बनू पाहत आहे.. स्वतः बघितलेले स्वैर स्वप्न ही ती त्यांच्यात उतरवण्याचा प्रयत्न करते..त्यांच्या यशस्वीतेचा तीही सोहळा साजरा करत असते. तिने बघितलेल्या नव्या पहाटेच्या किरणांसोबत..

## स्वयंपाकघरातील टिप्स

१. लोणचे बरणीत भरण्यापूर्वी तळाशी तीन-चार चमचे व्हिनेगर घातल्यास लोणच्यात बुरशी येत नाही.
२. लोणच्यात जास्त झालेला तेलाचा वापर पराठे करताना करावा. पराठे चांगले होतात.
३. चिवड्याच्या फोडणीत आले खिसून घातल्यास चांगली चव येते.
४. तांब्यात पाणी घेऊन त्यात कोथिंबीरीची जुडी मुळासकट उभी ठेवल्यास ती दोन दिवस टिकते.
५. भाजीत कांदा घातल्यास त्यात हिंग घालू नये. भाजीला उग्रपणा येतो.
६. पराठे करताना कणकेत थोडा मैदा घालावा. पराठे मऊ व खुसखुशीत होतात.
७. भाकरीचा पिठाचे धान्य नवे असल्यास त्यात थोडे मोहन घालावे.
८. पुरणपोळीचा पुरणात निम्मा गूळ व निम्मी साखर घालावी. पुरणपोळी जास्त चविष्ट होते व रंगही छान येतो.
९. वर्षभराचा गरम मसाला एकदम करून ठेवल्यास त्यास दमटपणा येऊ नये यासाठी त्यात हिंगाचा खडा टाकून ठेवावा.
१०. नारळ जास्त काळ टिकण्यासाठी उभा करून ठेवावा.
११. फोडणी दिल्यानंतर त्यावर लगेच झाकण ठेवावे. पदार्थांची रुची अधिक वाढते.
१२. डोसे करताना पिठात साबुदाण्याचे पीठ घातल्यास ठोसे कुरकुरीत होतात.

# अशा नात्यातून स्वतंत्र व्हा...



ॲड. स्नेहल निकाळे-जाधव
वकील, उच्च न्यायालय मुंबई

''मिसेस'' चित्रपटातील घाणेरड्या पाण्याच्या बादलीचे खूप महत्त्व आहे जे मी पाहिले. सुरुवातीला तुम्हाला घाणेरड्या पाण्याचे काही थेंब जमिनीवर पडत असल्याचे दिसते, जे रिचा ताबडतोब कापडाने स्वच्छ करते. नंतर ती तिच्या पतीकडे गळतीबद्दल तक्रार करते आणि प्लंबरला बोलवायला सांगते. तो काहीही करत नाही. शेवटी ती पाणी गोळा करू लागते. आणि एके दिवशी बादली भरल्यावर ती ते दिवाकरवर फेकते. सुरुवातीचे काही थेंब तिच्या पतीकडून उदासीनतेचे पहिले लक्षण दर्शवतात ज्याकडे ती झाडून दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करते, ती तिच्या पतीशी संवाद साधून समस्या सोडवण्याचा प्रयत्नसुद्धा करते. ज्याकडे तो दुर्लक्ष करतो. नंतर अखेर वेदना आणि अविचारी वृत्ती तिची बादली भरून टाकते, जोपर्यंत ती तिचा राग गमावत नाही. यावरून स्पष्ट होते की कोणतीही स्त्री एका रात्रीत लग्न बंधन तोडून निघून जाण्याचा निर्णय घेत नाही काही आठवडे काही महिने काही वर्ष ही जातात समोरच्या मध्ये कौतुकाचा अभाव, अनादर आणि अविचारीपणा दिसायला. ती बादली प्रत्यक्षात रिचाचे हृदय दर्शवत होती, जे हळूहळू गुदमरून भरत होते. आणि एके दिवशी.. ते ओसंडून वाहते आणि ती मुक्त होते!

ही कहाणी त्या प्रत्येक स्त्रीची आहे जी घरच्यांचा विचार करून मुलांचा विचार करून नवऱ्यावर असलेल्या प्रेमाचा विचार करून त्या नात्यात गुदमरत असते.. काहीही ठीक नसताना सगळं ठीक असल्याचे भासवत असते..

अशा नात्यातून स्वतंत्र व्हा..

ज्या व्यक्तीला आपला चार लोकांमध्ये आदर करायचा माहीत नाही, जी व्यक्ती सतत घालून पाडून बोलत असेल, आपली मानसिक शांतता त्या व्यक्तिमुळे भंगत असेल तर वेळ घ्या स्वतःसाठी पण अशा नात्यातून दूर व्हायला हवं.. जे नातं आपल्याला आनंदापेक्षा दुःख देत असेल मनात भावना येत असेल तर मुक्त व्हायला पाहिजे.

महाशिवरात्र स्पेशल

# साबुदाणा इडली



यंदा करा गरमागरम उपासाची इडली, पचायला अत्यंत हलकी-रेसिपी अगदी सोपी.

प्रत्येक वेळी उपासाला काय नवीन पदार्थ तयार करायचा? असा प्रश्न उत्सव जवळ येऊ लागले की पडतो. त्या दिवशी नेहमीचेच पदार्थ तयार करण्यापेक्षा खाऊन बघा ही उपासाची इडली विथ उपासाची चटणी.

उपवासाच्या इडलीचे प्रिमिक्स तयार करून साठवून ठेवता येते. फक्त एकदम कोरड्या बरणीत ते साठवा.

प्रिमिक्ससाठी लागणारे साहित्य

१ वाटी वरी तांदूळ

१ वाटी साबुदाणा अर्धी वाटी

कृती १. एका मिक्सरच्या भांड्यात १ वाटी वरी तांदूळ, अर्धी वाटी साबुदाणा घ्या. त्याला अजिबात पाणी लागणार नाही याची काळजी घ्या.२. मिक्सरमधून व्यवस्थित पावडर होईस्तोवर फिरवा. अगदी भुगा न करता थोडी रवाळ अशी पावडर तयार करून घ्या.

इडलीसाठी लागणारे साहित्यतयार केलेले प्रिमिक्स, दही, पाणी, मीठ, खाण्याचा सोडा, तेल.

कृती १. तयार प्रिमिक्स जर दिड कप घेतले तर, त्याला अर्धी वाटी दही असे प्रमाण ठेवायचे. एका भांड्यात हे प्रमाण घ्या. दही जरा आंबट असेल तर जास्त चांगले. गोडही चालेलच. २. आता त्या मिश्रणात गरजेनुसार पाणी घाला. मिश्रण अति पातळ करू नका. साधारण १ वाटी पाणी पुरेसे आहे. त्यात मीठ चवीनुसार आणि खाण्याचा सोडा अर्धा चमचा घाला. ३. सगळं व्यवस्थित मिक्स करून दहा मिनिटे झाकून ठेवा.४. इडली पात्राला तेल लावून घ्या. त्यावर तयार मिश्रण लावून घ्या. साधी इडली जशी तयार करता, त्याच पद्धतीचा वापर करा. ५. पंधरा ते वीस मिनिटांमध्ये इडली तयार होते.

उपासाची चटणी साहित्य ओलं खोबरं, भाजलेले शेंगदाणे, हिरवी मिरची, दही, पाणी, मीठ

कृती १. एका मिक्सरच्या भांड्यात अर्धी वाटी ओलं खोबरं आणि अर्धी वाटी भाजलेले व सोललेले शेंगदाणे घ्या. त्यात २ चमचे दही घाला. १ हिरवी मिरची घाला. थोडं पाणी व मीठ घाला. २. सगळं मस्त वाटून घ्या. त्याला वरतून तूप जीऱ्याची फोडणी द्या.

उपासाची इडली चटणी तयार करणे फार सोपे आहे. उपवासासाठी किंवा नाश्त्यासाठी हा पदार्थ नक्की तयार करा.

# रजोनिवृत्ती



शिल्पा पंडित

या परिस्थितीत महिलांना काय सामोरे जावे लागते हे कोणीही समजू शकत नाही.. विशेषतः पुरुष.

होय, पेरीमेनोपॉज आणि रजोनिवृत्ती दरम्यान होणारे हार्मोनल बदल काही स्त्रियांमध्ये उदासीनता आणि मूड बदलण्याच्या भावनांना कारणीभूत ठरू शकतात. इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉनच्या पातळीतील चढ-उतारामुळे मेंदूतील न्यूरोट्रांसमीटरच्या पातळीवर परिणाम होऊ शकतो, जसे की सेरोटोनिन, जो मूड नियंत्रित करण्यात गुंतलेला असतो. याव्यतिरिक्त, शारीरिक आणि भावनिक आव्हाने जी या जीवनाच्या टप्प्यावर येऊ शकतात, जसे की शरीराच्या प्रतिमेतील बदल, नातेसंबंधातील बदल आणि वाढलेला ताणदेखील नैराश्याच्या भावनांमध्ये योगदान देऊ शकतात.

पेरीमेनोपॉज किंवा रजोनिवृत्ती दरम्यान तुम्हाला नैराश्याची लक्षणे जाणवत असल्यास, मदत घेणे आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांशी तुमच्या समस्यांबद्दल चर्चा करणे महत्त्वाचे आहे. ते तुमच्या लक्षणांचे मूल्यांकन करण्यात मदत करू शकतात, योग्य उपचार पर्याय प्रदान करू शकतात आणि तुमची नैराश्याची लक्षणे रजोनिवृत्तीशी संबंधित आहेत का किंवा तुमच्या नैराश्याला कारणीभूत असलेले इतर घटक आहेत का हे निर्धारित करण्यात मदत करू शकतात. उपचारांमध्ये जीवनशैलीत बदल, समुपदेशन किंवा आवश्यक असल्यास औषधांचा समावेश असू शकतो. लक्षात ठेवा, तुमच्या मानसिक आरोग्याला प्राधान्य देणे आणि आवश्यक असल्यास मदत घेणे नेहमीच महत्त्वाचे असते. एकदम! पेरिमेनोपॉज आणि रजोनिवृत्तीतून जात असलेल्या स्त्रियांबद्दल भागीदार, कुटुंबातील सदस्य आणि मित्रांनी समजून घेणे, समर्थन करणे आणि सहानुभूती बाळगणे आवश्यक आहे. भावनिक आधार प्रदान करणे, सक्रियपणे ऐकणे आणि धीर धरणे स्त्रियांना जीवनाच्या या टप्प्यावर येणाऱ्या आव्हानांना नेव्हिगेट करण्यात मदत करण्यासाठी महत्त्वपूर्ण फरक करू शकतात.

भागीदार काळजी आणि समर्थन कसे दर्शवू शकतात यावरील काही सूचना येथे आहेत: स्वतःला शिक्षित करा : पेरीमेनोपॉज आणि रजोनिवृत्तीबद्दल जाणून घेण्यासाठी वेळ काढा, ज्यामध्ये शारीरिक आणि भावनिक बदल होऊ शकतात. अनुभव समजून घेणे तुम्हाला अधिक माहितीपूर्ण आणि दयाळू समर्थन प्रदान करण्यात मदत करू शकते. मोकळेपणाने संवाद साधा : या काळात तुमचा जोडीदार कसा वाटतो आणि अनुभवतो याबद्दल खुल्या संभाषणांना प्रोत्साहन द्या. तिच्यासाठी कोणतीही चिंता, निराशा किंवा भावना व्यक्त करण्यासाठी तिच्यासाठी एक सुरक्षित जागा तयार करा.

**आश्वासन द्या :** तिला खात्री देताना तिच्या भावना आणि अनुभव प्रमाणित करा की, ती जे काही करत आहे ते सामान्य आणि तात्पुरते आहे. तिला आठवण करून द्या की तुम्ही तिला बिनशर्त समर्थन देण्यासाठी आहात. धीर धरा आणि समजून घ्या: पेरीमेनोपॉज आणि रजोनिवृत्ती आव्हानात्मक असू शकतात आणि मूड स्विंग, चिडचिड आणि इतर लक्षणे अनेकदा तिच्या नियंत्रणाबाहेर असतात हे ओळखा. सहानुभूतीचा सराव करा आणि तिचे मूड स्विंग्स वैयक्तिकरित्या घेणे टाळा.

**घरगुती जबाबदाऱ्यांमध्ये मदत करा :** घरातील कामे, बालसंगोपन किंवा इतर जबाबदाऱ्यांमध्ये सहाय्य करा ज्यामुळे ती अनुभवत असेल असा कोणताही अतिरिक्त ताण कमी करा. हे तुमचे समर्थन दर्शवू शकते आणि तिचे ओझे कमी करण्यात मदत करू शकते. स्वतःची काळजी घेण्यास प्रोत्साहन द्या: तुमच्या जोडीदाराला व्यायाम, ध्यान, विश्रांतीची तंत्रे आणि छंद किंवा तिला आनंद देणाऱ्या क्रियाकलापांमध्ये गुंतणे यासारख्या स्व-काळजीच्या क्रियाकलापांना प्राधान्य देण्यासाठी प्रोत्साहित करा. या उपक्रमांमध्ये एकत्र सहभागी होण्याची ऑफर द्या. गरज पडल्यास व्यावसायिकांची मदत घ्या: जर तुमच्या जोडीदाराच्या लक्षणांमुळे तिच्या दैनंदिन जीवनात लक्षणीय त्रास किंवा बिघाड होत असल्याचे दिसत असेल, तर तिला आरोग्यसेवा व्यावसायिकाकडून वैद्यकीय सल्ला घेण्यास प्रोत्साहित करा. ते मार्गदर्शन, समर्थन आणि प्रदान करू शकतात

**संभाव्य उपचार पर्याय :** लक्षात ठेवा की रजोनिवृत्तीचा प्रत्येक स्त्रीचा अनुभव अनन्य आहे आणि उघडपणे संवाद साधणे आणि तिच्या विशिष्ट गरजा आणि प्राधान्यांनुसार तुमचा पाठिंबा तयार करणे आवश्यक आहे.

जीवनातील हा एक महत्त्वाचा भाग आहे.
जिथे स्त्रिया जास्त लक्ष देत नाहीत
स्वत: ला. चांगली काळजी घेणे
स्वतःला बनवतो. या शिल्लक वर्षे
आपल्यासाठी अधिक उपयुक्त.

# हायड्रा फेशियल

ब्यूटी टिप्स
नेहा खरे
कॉस्मेटोलॉजिस्ट

**हायड्रा मशीनचे फेशियल उन्हाळ्यात करावे का ?**

उन्हाळ्यासाठी हायड्रा मशिन फेशियल हा एक उत्तम पर्याय आहे कारण ते त्वचेला स्वच्छ आणि टवटवीत करतेवेळी खोलवर हायड्रेट करते. येथे काही प्रमुख फायदे आहेत:

**१. तीव्र हायड्रेशन**

उन्हाळ्यातील उष्णतेमुळे त्वचा निर्जलीकरण होते, ज्यामुळे ती निस्तेज आणि कोरडी होते.

हायड्रा फेशियलमधील हायड्रेटिंग सीरम ओलावा भरून काढतात, ज्यामुळे त्वचा मुरगळते आणि ताजेतवाने होते.

**२. खोल साफ करणे आणि तेल नियंत्रण**

उन्हाळ्यात घाम, सनस्क्रीन आणि प्रदूषणामुळे छिद्र बंद होतात.

व्हॅक्यूम-आधारित एक्सफोलिएशन अशुद्धता काढून टाकते, ब्रेकआउट आणि ब्लॅकहेड्स प्रतिबंधित करते.

**३. सुखदायक आणि कूलिंग प्रभाव**

सूर्यप्रकाशातील त्वचेला शांत करण्यास मदत करते, लालसरपणा आणि जळजळ कमी करते.

सूर्याचे नुकसान भरून काढण्यासाठी अँटिऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे देतात.

**४. डाउनटाइम आणि झटपट ग्लो नाही**

तिखट सालांच्या विपरीत, ते कोमल आणि उन्हाळ्यासाठी योग्य आहे.

त्वचेला चिडचिड न करता चमकदार आणि ताजे ठेवते.

**५. त्वचेचा पोत आणि लवचिकता सुधारते**

कोलेजन उत्पादन वाढवते, त्वचा गुळगुळीत आणि तरुण ठेवते.

बारीक रेषा, सुरकुत्या आणि असमान त्वचा टोन कमी करते.

**हायड्रा मशीन फेशियलसाठी संकेत**

हायड्रा मशीन फेशियल त्वचेच्या विविध समस्यांसाठी योग्य आहे आणि ते खालील स्किनसाठी करावे

**१. निर्जलीकरण आणि कोरडी त्वचा**

ओलावा पातळी पुन्हा भरून काढते आणि त्वचेची लवचिकता पुनर्संचयित करते.

**२. तेलकट आणि मुरुम-प्रवण त्वचा**

अतिरिक्त तेलाचे उत्पादन नियंत्रित करते, छिद्र बंद करते आणि मुरुम फुटणे कमी करते.

**३. निस्तेज आणि थकलेली त्वचा**

मृत पेशी काढून टाकून त्वचेला पुनरुज्जीवित करते आणि तेजस्वी चमक मिळवण्यासाठी रक्त परिसंचरण सुधारते.

**४. सूर्याने खराब झालेली त्वचा**

अतिनील हानी दुरुस्त करण्यात मदत करते, सनस्पॉट्स कमी करते आणि चिडचिड झालेल्या त्वचेला शांत करते.

**५. बारीक रेषा आणि सुरकुत्या**

कोलेजनचे उत्पादन उत्तेजित करते, त्वचेची दृढता आणि लवचिकता सुधारते.

**६. असमान त्वचा टोन आणि रंगद्रव्य**

पिगमेंटेशन हलके करते, त्वचेचा टोन समसमान करते आणि संपूर्ण रंग वाढवते.

**७. संवेदनशील त्वचा**

हायड्रा मशीन कोणी करू नये ?

हायड्रा मशीन फेशियल बहुतेक त्वचेच्या प्रकारांसाठी सुरक्षित आहे, परंतु खालील परिस्थिती असलेल्या व्यक्तींसाठी ते योग्य नाही.

**१. सक्रिय त्वचा संक्रमण आणि खुल्या जखमा**

सक्रिय मुरुमांचे घाव, थंड फोड, कट किंवा जखमा असल्यास टाळा.

**२. गंभीर मुरुम किंवा**

सूजलेल्या सिस्टिक मुरुम किंवा गंभीर रोसेसियाच्या बाबतीत चिडचिड होऊ शकते.

**३. सनबर्न किंवा अतिसंवेदनशील त्वचा**

अलीकडे उन्हात जळलेल्या त्वचेला अस्वस्थता आणि चिडचिड होऊ शकते.

**४. अलीकडील रासायनिक साले किंवा लेसर उपचार**

हायड्रा फेशियल घेण्यापूर्वी रासायनिक साल किंवा लेसर प्रक्रियेनंतर किमान दोन आठवडे प्रतीक्षा करा.

**५. गर्भवती किंवा स्तनपान करणारी महिला**

जरी सामान्यतः सुरक्षित असले तरी, काही सीरममध्ये असे घटक असतात ज्यांची गर्भधारणेदरम्यान शिफारस केली जात नाही.

**६. चेहऱ्यावरील घटकांसाठी ॲलर्जी**

उपचारात विशिष्ट ॲसिडस्, सीरम किंवा वनस्पतिजन्य पदार्थांची ॲलर्जी असलेल्या व्यक्तींना ते टाळावे.

**७.एक्जिमा, सोरायसिस किंवा ल्युपससारख्या परिस्थिती सक्शन आणि एक्सफोलिएशन प्रक्रियेसह भडकू शकता**

